# समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप

डॉ. भास्कर शेळके / प्रा. शशिकांत साळवे



# समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप

**प्रा. डॉ. भास्कर शेळके**
**प्रा. डॉ. शशिकांत साळवे**

शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

• *समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप*
**प्रा. डॉ. भास्कर शेळके**
**प्रा. डॉ. शशिकांत साळवे**

• पहिली आवृत्ती
१७ ऑक्टोबर २००९

© शशिकांत साळवे
मु.पो.सुपेधर ता. आंबेगाव, जि. पुणे.

• प्रकाशक
सुमती लांडे
शब्दालय प्रकाशन,
पोस्ट बॉक्स नं. ९०, वॉर्ड ७,
श्रीरामपूर - ४१३ ७०९
मोबा. : ९८२२२१५०९९

• अक्षरजुळणी
क्रांती एजन्सीज, पुणे

• मुद्रक
स्मिता प्रिंटर्स, पुणे

• प्रकाशन क्रमांक १८८

• मूल्य : ११०/- रुपये

समीक्षा - शेळके/साळवे
ISBN : 978- 93- 80617- 0O 8

जिची सदैव स्मृती होते
त्या माझ्या चिमुकलीस
कै. शब्दश्री ऊर्फ तेजश्रीस ...

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ५ |
| २. | समीक्षेची संकल्पना | ७ |
| ३. | समीक्षा म्हणजे काय? | ११ |
| ४. | समीक्षेचे प्रयोजन | १३ |
| ५. | समीक्षेतील साहित्याचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन यांचे स्थान व कार्य | २१ |
| ६. | आदर्श समीक्षकाची साधना : (आदर्श समीक्षकाचे गुण) संवेदनशीलता, रसिकता, प्रज्ञा, तुलनाक्षमता, व्युत्पन्नता/बहुश्रुतता, विश्लेषकता, चिकित्सकता, मूल्यविवेक, भाषिक तयारी | २५ |
| ७. | समीक्षकाने पाळावयाची पथ्ये समीक्षा विषयाचे अवधान व तारतम्य, संगती व सुसूत्रता यांचे भान, नेमकेपणा व तार्किकता यासंबंधीचा विवेक | ३८ |
| ८. | वाङ्मयीनमूल्ये व जीवनमूल्ये यांचा परस्परसंबंध. | ४६ |
| ९. | समीक्षेच्या पद्धती<br>१) आस्वादक समीक्षा (५४) २) रूपवादी समीक्षा (५७)<br>३) मानसशास्त्रीय समीक्षा (६८) ४) आदिबंधात्मक समीक्षा (७५)<br>५) चरित्रात्मक समीक्षा (८१) ६) ऐतिहासिक समीक्षा (८६)<br>७) समाजशास्त्रीय समीक्षा (९०) ८) मार्क्सवादी समीक्षा (९४)<br>९) स्त्रीवादी समीक्षा (९९) | ५३ |
| १०. | मराठी समीक्षेची वाटचाल<br>१) १८७४ ते १९२० २) १९२१ ते १९४५<br>३) १९४५ ते १९७५ | १०३ |


●●●

# प्रस्तावना

साहित्य विश्वास समीक्षा व्यवहाराला अनन्य साधारण महत्त्व आहे. खूप मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाली की, त्यावर समीक्षा लेखन केले जाते. त्या समीक्षा लेखनातून साहित्यकृतीत कोणती सौंदर्य स्थळे आहेत? साहित्यकृतीत जीवनमूल्ये आणि वाङ्मयीनमूल्ये कशी आविष्कृत झाली आहेत? यांचा गुणदोषासह समीक्षक परामर्श घेत असतो. थोडक्यात वाचक आणि लेखक यांच्यामध्ये मध्यस्थांची भूमिका समीक्षक करतो. एका अर्थाने वाचक आणि लेखक यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून समीक्षकाकडे पाहिले जाते. साहित्यातील सूज आणि बाळसे काय आहे? हे वस्तुनिष्ठपणे सांगण्याचा प्रयत्न समीक्षक करतो. एकूण मराठी साहित्य विश्वाचा विचार करता मराठी साहित्यविश्वात विपूल प्रमाणात ग्रंथ निर्मिती झाली आहे. आणि तितक्याच विपुल प्रमाणात समीक्षालेखनही झाले आहे. वास्तविक मराठी समीक्षा इंग्रजी समीक्षेद्वारे विकसित झाली आहे. अनेक मराठी समीक्षक इंग्रजी समीक्षेचेच मराठी भांषातर करताना दिसतात. परंतु साहित्यकृतीतील मर्मस्थाने समजण्यास हे समीक्षालेखन निश्चितच महत्त्वाचे ठरत असते.

प्रस्तुत ग्रंथात समीक्षेची संकल्पना, समीक्षा म्हणजे काय? समीक्षेचे प्रयोजन, समीक्षा आकलन-आस्वाद-मूल्यमापन आदर्श समीक्षकाचे गुण, समीक्षकाने पाळावयाची पथ्ये, वाङ्मयीनमूल्ये आणि जीवनमूल्ये यांचा परस्पर संबंध समीक्षापद्धती आणि १८७४ ते १९७५ या काळात मराठी समीक्षेच्या वाटचालीचा संक्षेप आढावा घेतला आहे.

महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठात 'मराठी समीक्षा' हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ठ केला आहे. मराठी समीक्षेची अनेक पुस्तकेही उपलब्ध आहेत. तरीसुद्धा मराठी समीक्षेची स्थूल संकल्पना विद्यार्थ्यांना यावी हा हेतू मनात ठेवून 'समीक्षा स्वरूप आणि संकल्पना' या ग्रंथाची निर्मिती केली आहे. मराठीचे अभ्यासक -

विद्यार्थी, नेट, सेटची तयारी करणारे अभ्यासक या सर्वांना नजरेसमोर ठेवून प्रस्तूत ग्रंथाचा लेखन  प्रपंच केला आहे.

अशा प्रकारचे लेखन करण्याचा आमचा हा पहिलाच प्रयत्न आहे. कदाचित लेखन करताना त्यात काही उणिवाही राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढे मात्र निश्चित पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या मराठीच्या अभ्यासक-विद्यार्थ्यांना हा छोटेखानी ग्रंथ निश्चितच उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल. अशी आम्हांस खात्री वाटते.

•••

# समीक्षेची संकल्पना - आवश्यकता

'समीक्षा' हा शब्द 'सम' आणि 'ईक्ष' या दोन पदांनी मिळून तयार झालेला आहे. 'समीक्षा' या शब्दात 'सम' हे उपपद महत्त्वाचे असून त्याचा अर्थ समप्रमाणात सर्वांगीण दृष्टीने न्याहाळणे होय. तर 'ईक्ष' म्हणजे पाहणे होय. कलाकृतीचा खरा जन्म कलावंताच्या मनात होतो. शब्दांच्या मागे कलावंत दडलेला असतो. उदा. 'गोतावळा'-' मोट बंद, नाडा बंद, तुबी बंद, मी बी बंद', या मृत शब्दांमागे अमूर्त संकल्पना असतात. म्हणजेच मोट बनवणारे चांभार यांचा यांत्रिकीकरणामुळे व्यवसाय बंद झाला, नाडा बनवणारे मातंग यांचा व्यवसाय बुडाला. तुबी बंद आणि मी बी बंद याचा अर्थ शेतकरी आणि मजूर वर्ग यांचीही गळचेपी झाली. या सर्व बाजू समीक्षकाने सर्वांगीण दृष्टिकोणातून तपासल्या पाहिजेत. अर्थात वाचक आणि लेखक यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून समीक्षकाकडे पाहिले जाते. मॅथ्यू ॲरनॉल्डच्या मतानुसार कवीच्या काव्याचे मूल्य वाचकास प्रतीत करून देणे किंवा साहित्यकृतीतील सौंदर्यस्थळे वाचकापर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे असते. याअर्थाने समीक्षक हा वाटाड्या आहे. कलाकृतीची बलस्थाने कोणती आणि उणिवा कोणत्या? हे तो चांगल्या प्रकारे न्याहाळू शकतो. तरच त्याला कलाकृतीतील गुणदोष समजतात आणि म्हणूनच सर्व बाजूने कलाकृती आणता येते, ही समीक्षा शब्दाची संकल्पना वाटते.

एखाद्या कलाकृतीचा सहानुभूतीपूर्वक, सहृदयतेने, वात्सल्याने, आस्वाद घेणे, परिचय करून देणे म्हणजेच कलाकृतीच्या गुणदोषांची सहानुभूतीपूर्वक चर्चा करणे होय. समीक्षेला पूर्वी 'टीका' हा शब्द वापरला जात होता. 'टीका' म्हणजे झोडपून काढणे, फक्त दोष दिग्दर्शन करणे एवढाच मर्यादित अर्थ घेतला जात होता. परंतु टीका म्हणजे कलाकृतीतील गुण-दोषांची चिकित्सा करणे किंवा कलाकृतीतील मर्मस्थाने व बलस्थाने शोधणे होय. थोडक्यात कलाकृतीतील सौंदर्यस्थळांचा शोध घेऊन सुज काय आणि बाळसे काय हे रसिक वाचकाच्या नजरेस आणून देणे होय.

थोडक्यात 'सम' म्हणजे समभाव वृतीने पाहणे, सौंदर्यस्थळांचा शोध घेणे, कलाकृतीची समीक्षा करत असताना समीक्षकाने भावनेच्या आहारी न जाता किंवा भावनाशून्यही न होता समतोलवृतीने कलाकृतीकडे पाहणे यालाच समीक्षा किंवा टीका म्हणणे जास्त उपयुक्त ठरेल.

'ईक्ष' म्हणजे कलाकृतीकडे पाहणे होय. परंतु केवळ पाहणे नसून त्या कलाकृतीकडे समीक्षकाने सहानुभूतीपूर्वक पाहणे. आस्वादक वृत्तीने पाहणे. रसिकतेने कलाकृतीचा आस्वाद घेणे. कलाकृतीची वरवर दखल घेणे नव्हे तर समीक्षकाने कलाकृतीच्या गाभ्यापर्यंत प्रवेश करणे ही संकल्पना येथे अपेक्षित आहे.

थोडक्यात रसिक आस्वादकाने निरपेक्ष मनाने आणि समतोल वृत्तीने कलाकृतीतील सौंदर्यस्थळे शोधणे होय.

**समीक्षकाची कार्य :**

**१. अभिरूची घडविणे :**

आस्वादक आणि लेखक यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे समीक्षक. कारण सामान्य वाचकांची अभिरूची ही वरवरची शब्दनिष्ठ, स्थूल व भडक असते. त्यामुळे कलाकृतीच्या अंतरंगात दडलेल्या सौंदर्यस्थळाची सामान्य वाचकाला कल्पना नसते.

वास्तविक कलाकृती म्हणजे कलावंताने आपणापुढे ठेवलेले ते एक गूढ असते. ते गूढ उकलून दाखविण्याचे महत्त्वाचे कार्य समीक्षक करत असतो. आपली अभिरूची बाह्य घटकावर आधारित असते. तर समीक्षकाची अभिरूची अंतर्घटकावर अवलंबून असते. सामान्य वाचकाची अभिरूची शब्दरचनेला भाळणारी असते. परंतु समीक्षक कलाकृतीच्या गाभ्यातील सुप्त गुणांचा परामर्श घेत असतो. उदा.'संताचे अभंग टिकले' याची मीमांसा करताना समीक्षक सांगतो मानवी भावना, मानवी मूल्य यांची जपवणूक संताच्या अभंगात आहे. थोडक्यात तुमच्या आमच्या जे लक्षात येत नाही, ते समीक्षक सांगतो. समीक्षक काय वाचावे, काय वाचू नये, त्याचे संसूचन करतो. वाचकांची अभिरूची सुसंस्कारी व उन्नत बनवितो. यावरून असे लक्षात येते की, अभिरूची घडविणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे.

**२.श्रेष्ठ आणि शाश्वत स्वरूपाच्या कलामूल्यांची प्रतिष्ठापना करणे.**

समीक्षा ही श्रेष्ठ व शाश्वत स्वरूपाच्या कलामूल्यांची प्रतिष्ठापना करत असते. एखादी कलाकृती तिच्यातील बाह्यगुणांमुळे प्रचंड गाजते. उदा. आगरकर, टिळक, यांचे धनंजय कीर यांनी लिहिलेली चरित्र. या ठिकाणी एकमेकांविषयी भडकपणा आलेला असल्याकारणाने आपण ते चरित्र वाचतो. अशा वेळेस समीक्षक विवेकी दृष्टिकोणातून विचार करून प्रस्तुत कलाकृतीत टाकाऊ काय आणि टिकाऊ काय हे वाचकांच्या निदर्शनास आणून देतात. कलाकृतीमध्ये जी शाश्वत मूल्य आहेत त्यांची जोपासना केली जाते. उदा. 'ज्ञानेश्वरी', ज्ञानेश्वरी हा धर्मग्रंथ म्हणून आपण वाचतो का? तर त्यातील दृष्टांन्त, सामाजिक दृष्टी याबाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ज्ञानेश्वरीच्या रूपाने शाश्वत विचार नेमके काय आहेत. ते समाजात आज कसे टिकून

आहेत ते सांगण्याचे कार्य समीक्षक करतो. याचाच अर्थ योग्य अयोग्याची दखल घेऊन योग्य अर्थात शाश्वत मूल्यांची समीक्षक जपवणूक करत असतो.

**३. प्रयोगशीलतेचे मर्म सांगणे:**

कलाकृतीची निर्मिती कशी झाली. तिचा आविष्कार कसा झाला हे कलाकृतीच्या निर्मिती संदर्भात लेखक सांगत नाही. लेखकाचा हा मुकेपणा समीक्षक उघड करतो. उदा. 'बळी', 'पाणकळा', 'गोतावळा' या कलाकृतींच्या निर्मितीसंदर्भात संबंधित लेखक बोलत नाही. पण समीक्षक नेमकेपणाने या गोष्टी वाचकांपर्यत पोहोचवत असतात. किंवा एक कलावंत म्हणून लेखकाला अनेक अनुभव येत असतात. परंतु एकाच ठराविक साहित्यप्रकारात तो अडकून न पडता, लेखनाच्या नव्या वाटा शोधतो. नवीन वाटा धुंडाळणाऱ्या लेखकाचे साहित्य सामान्य वाचक वाचेलच असे नाही, किंवा त्याला त्याची मर्मे कळतीलच असे नाही. अशावेळी समीक्षक या प्रयोगशीलतेचे मर्म उलगडून दाखवतात. उदा. आनंद यादव यांनी सुरुवातीला 'हिरवे जग' हा कवितासंग्रह लिहिला. परंतु त्यामध्ये त्यांचे अनुभव संपूर्णता: व्यक्त झाले नाहीत. म्हणून 'मायलेकर' हा दीर्घकाव्यसंग्रह लिहिला. पण या मध्येही त्यांचे अनुभव बसले नाहीत म्हणून ते कथेकडे वळतात. कथेतही त्यांचे अनुभव बसत नाहीत म्हणून 'गोतावळा' सारखी कादंबरी लिहितात. परंतु हेही साहित्यप्रकार अपुरे पडायला लागल्यानंतर ते आत्मचरित्र वजा कादंबरी लेखन करतात. अशावेळेस सामान्य वाचक या भूमिकेचे स्वागत करतीलच असे नव्हे. अशा लेखनातील नावीन्य आणि प्रयोगशीलता यांचे स्वागत करून त्यांची मर्मस्थाने सांगण्याचे काम समीक्षा करते. किंवा एक कलावंत म्हणून लेखकाला अनेक अनुभव येत असतात.

**४. रसिक मध्यस्थाची कामगिरी :**

वाचक आणि कलाकृती (लेखक) यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे समीक्षक होय. कलाकृतीमध्ये कोणती बलस्थाने आहेत. कोणती सौंदर्यस्थळे आहेत. प्रतिमा, प्रतीकांचा वापर कसा केला आहे. कलावंताच्या निर्मितीपाठीमागे कोणती कारणमीमांसा आहे, याचा शोध समीक्षक घेत असतो. कलाकृतीतील अदृश्य रहस्ये उलगडून दाखविण्याचे महत्त्वाचे कार्य समीक्षा करत असते. म्हणजेच समीक्षेची कामगिरी रसिक मध्यस्थांची आहे हे याठिकाणी महत्वाचे ठरते. उदा. 'बळी' या कादंबरीतील नुसता आबा महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मांगगारूडी समाजाचे दर्शन लेखिकेला घडवायचे आहे. याचाच अर्थ वाचक आणि कलाकृती (लेखक) यांना जोडण्याचे महत्त्वाचे कार्य समीक्षा करते.

## ५. कलाकृतीतील गूढ आणि अद्ययावत रहस्यांचा शोध :

वास्तविक प्रत्येक कलाकृतीमध्ये गुढता असते. सामान्य वाचकाला कलाकृतीतील गुढता लक्षात येईलच असे नाही. अशावेळेस समीक्षक कलाकृतीमधील गूढ रहस्यांचा शोध घेण्यास रसिक वाचकास मदत करतो. उदा. 'नववधू प्रिया मी बावरते' या कवितेत कवी जीवा-शिवाचे मिलन सांगत असतात. वरवरची अभिरूची असलेल्या माणसाला हे समजणे सहज शक्य नाही. अशा वेळी समीक्षक कलाकृतीतील आलेली उपरोक्त गुढता आणि अद्ययावत रहस्य यांचा सऱ्ह दयपणे शोध घेत असतो.

## ६. ऐतिहासिक दृष्टीने परामर्श घेणे :

कलाकृतीची मीमांसा अनेक समीक्षा पद्धतीद्वारे करता येते. जर आपणाला एखाद्या कलाकृतीचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून परामर्श घ्यावयाचा असेल तर ती विशिष्ट कलाकृती वाङ्मय प्रकारच्या विकासावस्थेत कोठे उभी आहे हे समीक्षकामुळे कळते. ऐतिहासिक पद्धतीमुळे दोन कलाकृतींची तुलना करता येते. काळाच्या ओघात प्रस्तुत कलाकृतीचे वेगळेपण काय आहे. कलावंताचे योगदान काय आहे हे समजते. उदा. 'निबंधमाला' इंग्रजांच्या आगमनानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, लोकहितवादी यांनी निबंधांच्याद्वारे सामाजिक जागृती घडवून आणली. हे ऐतिहासिक सत्य समीक्षा स्पष्ट करते.

## ७. लेखकाला घडविणे :

कलाकृती निर्माण करणाऱ्या कलावंताचे मन परिपूर्ण असेलच असे नाही. कलाकृतीची निर्मिती करीत असताना त्याच्याकडून ओघाने अनेक चुका घडण्याची शक्यता असते. अशा वेळेस वाचन, मनन, चिंतन आणि निरीक्षण यांच्या जोरावर समीक्षक लेखकामध्ये असलेल्या उणिवांची दखल घेऊन त्या लेखकाची निर्मिती निर्दोष होण्यास मदत करतो. केवळ दोष दिग्दर्शन न करता समीक्षा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोण स्वीकारते. कलावंताला उचित मार्गदर्शन करते. आणि त्याच्यात असलेली प्रतिभाशक्ती पुलकित करण्याचे काम समीक्षा करते साहजिकच सकस साहित्यनिर्मितीस समीक्षा उपयुक्त ठरते. नवलेखक कवीमध्ये असलेले दोष उणिवा समीक्षकांमुळे नष्ट होतात. उदा. पु. ल. देशपांडे यांनी आनंद यादव यांचे आकाशवाणीवर कौतुक केले. त्यामुळे 'मी'च्या अस्तित्वाची ओळख आनंदला होते. म्हणूनच लेखकाला समीक्षक घडवितो, असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरते.

## ७. सामान्य वाचकावर संस्कार करणे :

कलाकृतीचा आस्वाद कसा घ्यावा हे सांगण्याचे कार्य समीक्षक करत असतो. काय वाचावे, काय वाचू नये हेही समीक्षा सांगते. वाचकाची अभिरूची अधिक संपन्न

करणे, अधिक उंचावणे याबाबी समीक्षक करतात. समीक्षेमुळे वाचकांवर योग्य संस्कार होतात. उदा. 'नाटक' हा वाङ्मयप्रकार प्रयोगाच्यादृष्टीने महत्त्वाचा की वाचण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा हे संस्कार समीक्षा करते. नाटकाला प्रयोगिक मूल्ये असते, हे समीक्षेने समजते.

### ८. निर्दोष भूमिका :

साहित्याच्या प्रांतात काही वाङ्मयीन वाद उपस्थित होतात. त्यामुळे अभिरूची गढूळ होण्यास सुरुवात होते. उदा. जीवनवाद विरूद्ध कलावाद. परंतु साहित्याचा आपण जर कला म्हणून विचार करत असू आणि साहित्याने आनंद दिला पाहिजे असे जर आपल्याला वाटत असेल तर कलावाद आणि जीवनवाद यांनी हातात हात घालून फिरणे जास्त उचित ठरेल. कला आणि नीती यांची योग्य सांगड घालणे आणि वाङ्मयीन वातावरण स्वच्छ ठेवणे ही भूमिका समीक्षा ठेवते.

### समारोप :

वरील विस्तृत विवेचनावरून आपल्याला समीक्षेची कार्ये काय आहेत, हे निदर्शनास येईल.

### समीक्षा म्हणजे काय?

सम+ईक्ष=समीक्षा, अशी प्रस्तुत शब्दाची निर्मिती झाली आहे. 'सम' म्हणजे सारख्या प्रमाणात आणि ईक्ष म्हणजे पाहणे होय. एखाद्या कलाकृतीची समीक्षा करत असताना समीक्षकाने त्या कलाकृतीकडे सहानुभूतीने, तटस्थपणे, वात्सल्याने, समतोलवृत्तीने आणि सर्वांगीण दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. अन्यथा जर त्याने एकांगी दृष्टिकोण बाळगला तर कलाकृतीस हानी पोहोचल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच 'समीक्षा' या शब्दाचा उपरोक्त अर्थ येथे महत्त्वाचा ठरतो.

'समीक्षा' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून 'टीका' हा शब्द वापरण्याचा प्रघात आहे. परंतु टीका म्हणजे दोष दिग्दर्शन नव्हे तर गुण दोषांची चर्चा करणे होय. थोडक्यात समीक्षा म्हणजे, भाष्य करणे, निर्णय देणे, परीक्षण करणे, मूल्यमापन करणे, न्याहाळणे, काळजीपूर्वक पाहणे, समग्रपणे पाहणे, पूर्णपणे पाहणे, योग्यप्रकारे पाहणे, चिकित्सा करणे होय. कलाकृतीत असणारी सौंदर्यस्थळे शोधून समीक्षकाने त्याचे सूक्ष्मपणे व बारकाव्यानिशी अवलोकन करणे हितावह ठरेल. समीक्षा म्हणजे उपदेश नव्हे किंवा पांडित्य प्रदर्शनही नव्हे. तर कलाकृतीला सर्वांगीण स्पर्श करणे, तिचा एक एक पदर उलगडून तिच्यातील सौंदर्य-स्थळांचा वेध घेणे. आणि रसिक वाचकांना तृप्तीचा मार्ग दाखविणे होय.

**'समीक्षा' च्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.**

१. ''विचार करण्याच्या शास्त्रीय पद्धतीला अनुसरून काही निश्चित तत्त्वांच्या आधाराने वाङ्मयाचे विवेकपूर्ण विश्लेषण करण्याची जी शक्ती तिला टीका म्हणतात.'' डॉ. रा. शं. वाळिंबे.

२. ''ललित साहित्याचे आकलन, आस्वादन, व मूल्यमापन करण्यासाठी गांभिर्याने होणारा विचारव्यवहार म्हणजे समीक्षा.'' प्रा. रा. ग. जाधव.

३. ''परिस्थिती कोणतीही असली तरी टीकावृत्ती ही उपजत असते. व्यक्तिपरत्त्वे तिचा आविष्कार कमी अधिक प्रमाणात होतो. हा भाग वेगळा या आविष्काराला विशिष्ट घाट आला की तिला 'टीका समीक्षा' असे संबोधले जाते.'' - प्रा. गो. म. कुलकर्णी.

४. ''टीका म्हणजे वाङ्मयासंबंधीचे वाङ्मय होय.''- प्रा. श्री. के. क्षीरसागर.

५. ''साहित्यनिर्माता आणि समीक्षक यांची कार्ये, परस्परपूरक आहेत. साहित्यिक आणि समीक्षक हे दोघेही समाजाच्या मानसिक आरोग्याचे अत्यंत जबाबदार रखवालदार आहेत. ते व्यक्तीच्या मानवी न्यायाचे प्रहरी आहेत. साहित्य म्हणजे मानवी उन्नयनाची जीवनसत्त्वे ! समीक्षक या जीवनसत्त्वांची आरोग्य वर्धकता तपासतो. त्यात काही भेसळ आहे काय, त्यात काही विघातक आहे काय ते तपासतो. साहित्यकृतीची अशी तपासणी म्हणजे समीक्षा होय.''- डॉ. यशवंत मनोहर.

६. ''कवीच्या काव्याचे मूल्य वाचकास प्रतीत करून देणे.'' - मॅथ्यू अ‍ॅरनॉल्ड.

७. ''पूर्वग्रह न बाळगता केलेले रसग्रहण म्हणजे टीका होय.'' - मॅथ्यू अ‍ॅरनॉल्ड.

८. ''तुलना करणे हाच टीकेचा अर्थ होय.'' - रॉबर्टसन.

९. ''विवरण करणे व निर्णय देणे हे टीकेचे प्रयोजन आहे.'' - बुनेनियर .

***

# समीक्षा कार्य व प्रयोजन

साहित्याच्याबाबत विचार करताना खूप मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाल्यानंतर त्यावर समीक्षा केली जाते, टीका केली जाते. एखाद्या-दुसरा ग्रंथ निर्माण झाल्याने लगेचच समीक्षकाला त्यातील गुण सांगता येतील, असे नाही. त्यासाठी अनेक प्रकारच्या कलाकृतीची निर्मिती होणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्यावर टीका निर्माण होते. उदा. सुरुवातीला आपल्याकडे निबंध वाङ्मयप्रकार नव्हता. परंतु त्या ठराविक काळात त्या तत्कालीन परिस्थितीत त्या-त्या प्रकारच्या प्रसंगानुसार आगरकर, टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधलेखनास सुरुवात केली आणि हा प्रकार रूढ झाला. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात कादंबरीलेखन फारसे नव्हते. एक 'कादंबरी' नावाचे पुस्तक फक्त होते. परंतु इंग्रजांचे आगमन झाले आणि कादंबरी हा नवीन वाङ्मयप्रकार आपल्याकडे रूढ झाला. खूप लिखाण झाल्यानंतर साहजिकच त्यातील चांगले आणि वाईट थोडक्यात गुण-दोष दार्खविले जाऊ लागले. आणि त्यासाठी समीक्षकाने हातभार लावला. अशा प्रकारे अनेक वाङ्मयप्रकार निर्माण होऊ लागले व त्यावर टीका होऊ लागली. जास्त प्रमाणात वाङ्मयनिर्मिती झाल्यानंतर मग साहजिकच त्या वाङ्मयाचे स्वरूप, त्याची वैशिष्ट्ये काय आहेत, हे तपासले जाते. म्हणजेच मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाल्यानंतरच त्यावर टीका होते आणि उपलब्ध साहित्याच्या भिन्न-भिन्न प्रकारचा अभ्यास सुरु होतो. व नंतर त्यातील उपलब्ध साहित्याच्या भिन्न प्रकारांचा अभ्यास करून मोठेपणाची तत्त्वे निश्चित केली जातात.

काव्य, नाटक याबाबतही असेच घडते. उदा. नाटक म्हटल्यावर त्यात संगीत असावे, ही पूर्वीची कल्पना स्थिर आहे आणि मग तो वाङ्मयप्रकार स्थिर झाल्यावर तो का टिकून आहे, हे समीक्षा सांगते. म्हणजे आपोआपच त्या वाङ्मयप्रकाराचे तंत्र निर्माण होते. हे तंत्र का निर्माण होते. तर अवलोकन आणि वर्गीकरण या आधारे होत असते. साहित्यशास्त्राने हेच केले आहे. त्यामुळे साहित्यशास्त्र व्यवस्थित व नियमबद्ध झाले. थोडक्यात साहित्याचे शास्त्रीय असे नियम आपोआप तयार होतात. त्या-त्या प्रकारचे अवलोकन, विश्लेषण, वर्गीकरण, व्यवस्थापन अथवा प्रामाणिकपणा हा जसा शास्त्राच्या विकासाचा क्रम मिल्टनने सांगितला आहे. तशाच प्रकारचा क्रम साहित्यशास्त्राच्या विकासाचा आहे.

एखादी विचारप्रणाली, त्या काळाचे परिणाम किंवा प्रभाव पडून तिला काळातील साहित्यनिर्मितीत रूजते त्याची कारणे खोलवर रूजतात आणि नंतर कथाकार, कवी त्याचे अनुकरण करतो व तो तो साहित्यप्रकार त्याच्या वैशिष्टयांच्या आधारे संपन्न होतो व नंतर समीक्षा होते.

**समीक्षा प्रयोजने**

१. परीक्षण
२. अभिप्राय
३. परिचय
४. मूल्यमापन
५. विश्लेषण
६. नोंद
७. अर्थान्वेषण
८. तत्त्वान्वेषण
९. स्पष्टिकरणात्मक टीपण -

याचा आपण थोडक्यात परिचय करून घेऊ.

**१. परीक्षण -**

साहित्यशास्त्राने अवलोकन वा वर्गीकरण या आधाराने निगमन पद्धतीने जी तत्त्वे शोधली आहे त्याचा विनियोग करणे हे टीकेचे कार्य सांगितले आहे. उदा. एक कलाकृती घेणे व तिचे अवलोकन करावयाचे तिचे सर्व घटक सुटे-सुटे करावयाचे आणि मग त्या कलाकृतीतील तत्त्वांचा शोध घ्यायचा व त्यातील सौंदर्य काय आहे हे शोधायचे आणि या ठिकाणी तो सुसूत्रपणे मांडणे. हे या ठिकाणी आवश्यक आहे. आस्वाद घेणे, निर्णय घेणे यापैकी कोणतेही कार्य टीकेला करायचे असे असले तरी या सर्वांसाठी काही निकष असावे लागतात. काही तत्त्वांच्या आधारे कलाकृतीचे समीक्षण करावे लागते. अशा प्रकारे विविध कालखंडात काही नवीन तत्त्वे निर्माण होतात. याच्या अथवा पुरस्कृत केलेल्या जुन्या तत्त्वांच्या निकषांवर तत्कालीन वाङ्मयाचे समीक्षण करणे, हे टीकेचे कार्य होय. तसेच अलीकडे वास्तववादी हेच तत्त्व साहित्यात निर्माण झाले आहे. या तत्त्वांच्या आधारे त्या कलाकृतीचे परीक्षण केले जाते उदा. 'बळी' ह्या कांदबरीमध्ये तत्कालीन समाजाचे वास्तवचित्रण रेखाटले गेलेले आहे. त्यात मांगगारूडी समाजाचे वास्तवदर्शन त्यांनी आपल्याला या कलाकृतीमध्ये घडविले आहे. तेव्हा ह्या कलाकृतीला आपण आजचे मानदंड न लावता त्या तत्कालीन कालखंडाचे निकष लावून त्यातील सौंदर्य शोधणे आवश्यक आहे. वाङ्मयाच्या मोठेपणाविषयी प्रत्येक काळात काही प्रणाली प्रचलित असतात. त्यावेळेस

आपण त्या कालखंडाशी एकरूप झाले पाहिजे. तादात्म्य पावले पाहिजे, तरच आपण त्या कलाकृतीतील सौंदर्याचे दर्शन घडवू शकू. त्यात कोणती श्रेष्ठ तत्त्वे आहेत हे आपण शोधू शकतो, म्हणजे त्या काळात ज्या प्रणालीला विशेष महत्त्व होते, त्या प्रणालीशी आपण तादात्म्य होणे गरजेचे आहे. म्हणजेच कोणत्याही कलाकृतीचे परीक्षण करीत असताना आपण त्यावेळचा काळ कोणता होता, त्या काळातील तत्त्वांच्या आधारे आपण कलाकृतीचे परीक्षण करावयाचे, समीक्षण करावयाचे. उदा. १९२५ चा कालखंड पाहू. त्यावेळी गांधीयुग होते. म्हणजे तेथे गांधीजींची सत्य, अहिंसा ही तत्त्वे महत्त्वाची होती. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये ही तत्त्वे उपयोगी पडतीलच असे नाही. म्हणजेच प्रत्येक काळात काही वाङ्मय प्रणाली निर्माण झालेल्या असतात. त्या प्रणालीचा विचार करून साहित्य समीक्षा करणे महत्त्वाचे असते. तसेच नीती-अनीती, जीवनवाद-कलावाद अशा ज्या प्रणाली निर्माण झाल्या होत्या त्याद्वारे आपण त्या कलाकृतीचे परीक्षण करणे आवश्यक आहे साहित्यात काही वेळेस नवे घटक येतात. त्यांचा आपणाला योग्यप्रकारे मेळ घालता आला पाहिजे. तरच आपण त्या कलाकृतीचे समीक्षण योग्य प्रकारे करू शकतो. म्हणजे योग्य मूल्यांच्या आधारे कलाकृती तपासणे महत्त्वाचे आहे, तिचा अर्थ लावणे किंवा ते वाङ्मय तपासणे महत्त्वाचे आहे. आणि त्या वाङ्मयाचे परीक्षण करणे, समीक्षण करणे हेच टीकेचे मुख्य कार्य आहे.

सत्य, शिव, सुंदर या मूल्यांच्या आधारे कलाकृतीचे परीक्षण करताना आपण त्यातील सत्य, शिव, सुंदर या तत्त्वामागील कल्पना समजावून घेणे आवश्यक आहे. उदा. 'शारदा' हे गो. ब. देवलांचे नाटक जर आपण परीक्षण करणार असल्यास आपणाला त्यातील मूल्य काय आहे हे पाहणे आवश्यक आहे. यात सामाजिक विषमता हे मूल्य आहे. परंतु त्या नाटकांचा किंवा कलाकृतीचा अर्थ आताच्या परिस्थितीशी लावता कामा नये कारण त्यावेळची परिस्थिती तशी होती म्हणून त्या प्रकारचा विवाद, त्या घटना त्यास आताच्या फूटपट्ट्या लावता येत नाहीत. कारण त्यातले सौंदर्य कळणार नाही. त्यासाठी त्या कलाकृतीच्या कालखंडाशी त्याचा अर्थ लावणे व त्याचे अवलोकन आणि वर्गीकरण करणे हे परीक्षणासाठी महत्त्वाचे आहे.

### २. अभिप्राय निर्णय

ललित कलांच्या मूलभूत तत्त्वांचा विचार करून कलाकृतीविषयी निर्णय देणे एवढाच टीकेचा अर्थ नाही. तर त्या कलाकृतीबद्दल निर्णय का द्यावयाचा, अभिप्राय का द्यायचा हे आपण सुसंगतपणे पाहणे आवश्यक आहे. यामुळे कलाकृतील सौंदर्य उलगडण्यास सोपे जाते. त्यातील सौंदर्यतत्त्वे समजावीत यासाठी समीक्षेद्वारे त्या कलाकृतीच्या परिणामाविषयी अभिप्राय देणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्या गोष्टीचे ज्ञान आवश्यक असेल त्या गोष्टी समीक्षकाने विस्ताराने स्पष्ट केल्या पाहिजेत,

त्यांतील सौंदर्यस्थळाविषयी सांगितले पाहिजे. त्यात टाकाऊ काय आहे आणि टिकाऊ काय आहे हे सांगितले पाहिजे तरच सर्वसामान्य वाचकाची अभिरूची नियत होण्यास किंवा घडण्यास, संपन्न होण्यास मदत होईल, आणि त्याला साहित्याविषयी एक प्रकारे अभिरूची निर्माण होईल. जर यासर्व बाबी समीक्षकाने पाळल्या तर त्याला जे काही सांगावयाचे आहे, त्याचे व त्या निर्णयाचे चीज होईल. 'टीका म्हणजे उत्कृष्ट गणल्या गेलेल्या वाङ्मयाचे उष्कृष्ठत्व कशात आहे, हे शोधून काढून त्या आधारे कलाकृतीविषयीचा निर्णय/अभिप्राय देणे'. म्हणजेच ह्या अभिप्राय वाचूनच वाचक पुस्तक वाचण्यास प्रवृत्त होतात. त्यासाठी चांगल्याप्रकारे तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. कोणती तत्त्वे या कलाकृतीत आहेत, कोणती जीवनमूल्ये आहेत, हे जेव्हा समीक्षक सांगतो तेव्हा वाचक मूळ कलाकृती वाचतात. कारण त्यांच्या मनात एक जिज्ञासा निर्माण होते, आणि ह्या जिज्ञासापूर्तीसाठी वाचक पुस्तक वाचतो, म्हणून समीक्षा अभिप्रायाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. टीका म्हणजे छिद्रान्वेषण , दोषान्वययाची भूमिका असता कामा नये. म्हणजेच दोष हुडकून काढून त्या कलाकृतीची निर्भत्सना करणे नव्हे म्हणजे फक्त दोष आहेत तेच दाखविणे यातही अर्थ नाही तर तेथे समीक्षकाची सहानुभूतीची, तटस्थपणाची भूमिका महत्त्वाची असते. तर त्या कलावंताचे दोषाबरोबरच गुणही दाखवायला हवेत. तरच ती टीका योग्य अशी वाटते किंवा एखाद्या कलावंताला उचलूनही धरण्यात अर्थ नाही तर त्याठिकाणी सहानुभूतीपूर्वक, तटस्थापूर्वक समीक्षण झाले पाहिजे किंवा नुसता पांडित्यपणाही उपयोगाचा नाही. म्हणजेच टीकेचे मूल्य काय आहे. तर कलाकृतीसंबधीचा निर्णय देणे. त्यामुळे वाचकास कलाकृतीचे अवलोकन सुलभ होईल. ग्रंथाचे वास्तवदर्शन घडावे, अधिकाधिक लोक साहित्याकडे आकर्षित व्हावेत यासाठी सूक्ष्म अभ्यासातून अभिप्राय हे समीक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे.

**३. परिचय :**

मॅथ्यू ऑरनॉल्डच्या मते कलाकृतीतील वैगुण्ये शोधून त्याची हेटाळणी करणे म्हणजे टीका नव्हे. तर कलाकृतीतील कलागुणांची ओळख करून देणे. कलाकृतीतील सौंदर्य वाचकास प्रतीत करून देणे. त्याचा जीवनाच्या दृष्टिकोणातून, सामाजिक दृष्टिकोणातून अर्थ लावणे म्हणजेच गुण वैशिष्ट्ये सांगणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे वाचक व लेखक हे दोघेही ज्याच्या त्याच्या पातळीवर सुधारतील व आपली कार्य योग्यरित्यापूर्ण करतील. कलाकृतीचे यथार्थ अवलोकन कशा प्रकारचे आहे. वाङ्मयीनमूल्ये, जीवनमूल्ये, अलंकार, प्रतिमा, प्रतीके, उपमा, उपमान कोणते आहेत याचे यथार्थ अवलोकन करून त्या कलाकृतीचा परिचय करून देणे, हे कार्य समीक्षकांचे आहे. समीक्षा करताना कलाकृतीत जे शाश्वत आहे, सर्वश्रेष्ठ आहे, याचे ज्ञान समीक्षकाने प्रथमतः करून घेणे आवश्यक आहे, आणि नंतर जे ज्ञान वाचक-

लेखक यांच्यापर्यंत द्विगुणीत करावे, हे समीक्षकाने केले पाहिजे. अशा पद्धतीने जर समीक्षकाने कलाकृतीचा परीचय वाचकास करून दिला तर कलाकृतीचा आस्वाद घेणे वाचकास सोपे होईल. ज्यावेळेस समीक्षक एखाद्या कलाकृतीचा, ग्रंथाचा परिचय करून देतात त्यावेळेस त्याने त्या कलाकृतीचे समीक्षण समतोलवृत्तीने केले पाहिजे. हे समीक्षण करत असताना त्याने बाह्य घटकाचा विचार करता कामा नये किंवा त्या साहित्यिकांच्या जीवनाशी तडजोड करता कामा नये. म्हणजे याठिकाणी शुद्ध कलावादी भूमिका आवश्यक आहे. त्या ग्रंथाचा परिचय करून देत असताना तो एकाकी परिचय नसावा. समतोल परिचय झाला तर कलाकृतीचे आकलन सुलभ होईल. सर्वच वाचकांना सर्व ग्रंथ वाचायला मिळतात, असेही नाही. अशी अनेक प्रकारची साहित्यनिर्मिती होत असल्याने सर्वच ग्रंथ वाचून घेणे हे केवळ अशक्य आहे. वाचकाला सर्वच ग्रंथ माहीत असतात, असेही नाही. त्यास अनेक अडथळे निर्माण होत असतात, म्हणून वाचकाला टीकेवर समाधान मानावे लागते. समीक्षकाने जे काही विवेचन केले आहे त्यावरच समाधान मानावे लागते. आणि जर वाचकाला हे शक्य झाले तर समीक्षा जन्मालाचं आली नसती. म्हणून समीक्षकाने वाचकास ग्रंथाचा नेटका परिचय करून देणे आवश्यक आहे. आणि समीक्षकाने अशा प्रकारे त्या ग्रंथाचे समीक्षण केले पाहिजे की वाचकास तो ग्रंथ हातात मिळेपर्यंत त्यात काय सौंदर्य आहे, हे जाणून घेण्यासाठी त्याची जिज्ञासा ताणली गेली पाहिजे. अशाप्रकारे त्या ग्रंथाचा परिचय करून देणे आवश्यक आहे असे असेल तर वाचकांची जिज्ञासा वाढेल. त्या कलाकृतीचा शोध घेऊन वाचण्याची प्रवृत्ती त्यात निर्माण होईल, हे सर्व शक्य होण्यासाठी कलाकृतीतील सौंदर्य शोधणे व वाचकास वाचनास प्रवृत्त करणे यासाठी कलाकृतीचा एकांगी परिचय नको.

थोडक्यात एखाद्या कलाकृतीविषयी कुतूहल निर्मिती करून देणे हे समीक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे.

### ४. मूल्यमापन :

कलाकृतीचे यथार्थ मूल्यमापन करणे हे सर्वात महत्त्वाचे कार्य समीक्षकांचे आहे .यासाठी समीक्षकाने त्या कलाकृतीचे मूल्यमापन करीत असताना त्या साहित्यकृतीचे सुरुवातीला योग्य प्रकारे निरीक्षण करणे आवश्यक आहे म्हणजेच आकलन-अवलोकन करणे आवश्यक आहे. आणि नंतर त्या कलाकृतीचा आस्वाद योग्य पद्धतीने घेता येईल नंतर त्यात कोणती तत्त्वे आहेत, सौंदर्यतत्त्व कशात आहे हे पाहणे आवश्यक आहे आणि नंतर त्या कलाकृतीचे मूल्यमापन झाले पाहिजे. म्हणजेच त्या समीक्षकाने त्या कलाकृतीचे मूल्यमापन करीत असताना कोणत्याही प्रकारे दुराग्रह करता कामा नये किंवा त्याचे मन पूर्वग्रहदूषित नसावे. म्हणजे पूर्वग्रहरहितता ठेवून त्या कलाकृतीचे मूल्यमापन झाले पाहिजे. तरच त्या समीक्षकाला रसग्रहण करताना कोणतेही अडथळे

येणार नाहीत यामुळे कलाकृतीचे मूल्यमापन करण्यास सुलभ होईल. उदा. एखादी कलाकृती अमुक एका लेखकाने लिहिली आहे, हा कलावंत अमुक या विचारसरणीचा आहे. उदा. गांधीवाद, मार्क्सवाद, फुले, आंबेडकरवादी, या विचारसरणीचा मला द्वेष वाटतो हा पूर्वग्रह मनात आणता कामा नये.

तर त्याठिकाणी ती कलाकृती कोणत्याही कलावंताची असो तो कोणत्याही जाती धर्माचा असो किंवा काणेत्याही विचारसरणीचा असो. त्या कलाकृतीकडे शुद्धकलावादी भूमिकेतूनच पाहिले पाहिजे. तरच त्या कलाकृतीचे मूल्यमापन योग्य पद्धतीने होईल. उदा. व. बा. बोधे एक साहित्यिक आहेत. त्यांनी अनेक कांदबऱ्या लिहिल्या आहेत. परंतु त्यांना त्याच्याच कांदबऱ्यांबद्दल विचारले तर पुन्हा नाव सांगता येणार नाही. त्यांच्या एका महिन्यात पाच-पाच, सहा-सहा कादंबऱ्या बाजारात येतात. म्हणून त्यांच्या कादंबऱ्याच वाचायच्या नाहीत. तो बाजारू लेखक आहे. म्हणून त्याचे साहित्य का वाचायचे अशा प्रकारचे त्या समीक्षकाचे मत व्हायला नको. तसेच 'इंधन' (हमीद दलवाई) या कादंबरीचे उदाहरण घेता येईल. हमीद दलवाई ही व्यक्ती मुस्लीम आहे, मग हिंदूनी ही कादंबरी वाचायची नाही? म्हणजेच आपल्या मनात मुस्लिमांविषयी द्वेष आहे म्हणून ती कादंबरी वाचायची नाही. जर आपण या ठिकाणी जातीचा विचार केला तर ती कादंबरी रसग्रहणाला मारक ठरेल, तर फक्त आपण कलाकृती म्हणून इंधनकडे पाहणे महत्त्वाचे आहे. यात हिंदू-मुस्लीम ऐक्य दाखवले आहे ते जाणून घेतले पाहिजे म्हणून समीक्षकाचे मन पूर्वग्रहदूषित नको.

समीक्षकांचा कलाकृतीविषयी विधायक दृष्टिकोण असणे आवश्यक आहे. त्या समीक्षकाने त्या कलाकृतीतील रहस्याचा शोध घेणे, त्यातील सौंदर्याचा शोध घेणे आवश्यक आहे. हा विधायक दृष्टिकोण मूल्यमापनात आवश्यक आहे. समीक्षकाने आपण फार विद्ववान आहोत, आपल्या ओंजळीने लोक पाणी पितात म्हणून पांडित्यपणाचे प्रदर्शनही करायला नको. एखाद्या लेखकाकडून काही चुका झाल्यातर त्याला त्याने झोडपूनही काढायला नको तर त्याला त्या चुका पुन्हा होणार नाहीत, असे समीक्षेतून मागदर्शन करावे. समीक्षकाने वाचकावर छाप पडावी म्हणून अनाकलनीय अशीही समीक्षा करायला नको. म्हणजेच समीक्षकाने योग्य पद्धतीने कलाकृतीचे मूल्यमापन करावे.

साहित्याची काही तत्त्वे असतात, काही प्रवृत्ती असतात. काही मूलभूत तत्त्वे असतात. त्याआधारे टीकेचा संसार मांडलेला असतो. प्रत्येक कालखंडात काही नवी तत्त्वे येतात व नव्या-जुन्याचा संकर होतो. त्या आधारेच कलाकृतीचे मोल ठरविले गेले पाहिजे हे टीकेचे प्रमुख कार्य आहे. साहित्यात येणाऱ्या प्रतिमातून लेखकाला काहीतरी सूचवायचे असते. हे तत्त्व आपणाला समजून घेता आले पाहिजे .उदा: बालकवींची 'औदुंबर' तसेच 'ताजमहल' यासारख्या कविता यात सूचकता आहे. म्हणजेच शब्द साधे असले तरी त्यातून सूचित काय केले आहे, याला महत्त्व

असते. म्हणजेच तेथील भावभावना यांचा विचार करणे आवश्यक आहे.

मूलभूत तत्त्वांच्या आधारे टीकेचा संसार मांडला पाहिजे. ही तत्त्वे प्रत्येक कालखंडात बदलत असतात. म्हणजेच नव्या-जुन्याचा संकर घालून कलाकृतीचे मोल ठरविणे आवश्यक आहे. पूर्वी साहित्याची अलंकार, रीती, वक्रोक्ती, ही तत्त्वे होती. ती काळाच्या ओघात लोप पावली आहेत. हे पूर्वी साहित्यातील सौंदर्य घटक होते. परंतु आता साहित्यात 'वास्तवता' हे तत्त्व आले आहे. सत्य-शिव-सुंदर या तत्त्वाचा उदय झाला आहे. या तत्त्वातून आदर्शवाद, शिव-सुंदर, नीती कल्पनेला महत्त्व आले आहे. जसजसा काल बदलत जातो, त्याप्रमाणे प्रत्येक कालखंडात नवीन तत्त्वे येतात. म्हणून कलाकृतीचा विचार करताना त्या-त्या कालखंडाचा विचार करायला हवा उदा: विभावरी शिरूरकरांची 'बळी' ही वास्तववादी कादंबरी आहे त्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना त्या कालखंडात गेले पाहिजे, त्यावेळेची परिस्थिती समजावून घेतली पाहिजे. तो गांधी युगाचा काळ होता. हे आपणास माहीत पाहिजे तरच ती कलाकृती मूल्यमापनास उतरेल, हे कार्य समीक्षकाचे आहे.

सौंदर्याचा पाया सत्य हाच आहे. पण ते सत्य वास्तवातील आहे की कल्पनेतील आहे, हे पाहणे गरजेचे आहे. तसेच मूल्यमापन करत असताना औचित्याचाही विचार केला पाहिजे. रस निर्मितीला पोषक असेच औचित्य ठेवून रसग्रहण केले पाहिजे तसेच पाश्चात्य संस्कृतीच्या संस्काराने प्रतिमातून येणारी दुर्बोधता आपल्याकडे आली आहे तेव्हा त्यातील व्यंजना व्यापार आपणाला समजायला हवा हा साहित्यातील स्वाभाविक बदल आहे. यातून नव्या-जुन्या तत्त्वातून साहित्याचे, कलेचे मोल ठरविणे हे खरे टीकेचे कार्य आहे. कलाकृतीच्या सौंदर्यतत्त्वाचे, कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान करून घेणे हे टीकेचे महत्त्वाचे कार्य आहे म्हणजेच जी मूल्ये मानली आहेत त्या आधारे कलाकृतीचे मूल्यमापन करावयाचे .मूल्यमापनाशिवाय समीक्षा पूर्णच सांगता येणार नाही. वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये यांचा योग्य मेळ घालणे, हे टीकेचे प्रमुख कार्य आहे.

## ५. विश्लेषण :

समीक्षक सुरुवातीला एखाद्या कलाकृतीचा परिचय करून देतो. विश्लेषण करत असताना त्या कलाकृतीविषयी नुसता अभिप्राय लेखन करून चालत नाही तर समीक्षा करत असताना त्या कलाकृतीच्या आशय आणि अभिव्यक्तीला विश्लेषणात महत्त्वाचे स्थान असते. विश्लेषण करताना त्या साहित्यकृतीचे स्वरूप, कथानक, भाषाशैली, कलाकृतीत जे बदल आवश्यक असतात ते आहेत किंवा नाहीत पाहणे गरजेचे ठरते. तसेच इतर समीक्षकांची त्या कलाकृतीविषयाची मते, लेखकाचा त्यामागील हेतू आणि ती साहित्यकृती कोणत्या वाङ्मयप्रकारात कितपत यशस्वी झाली आहे, हे पाहणे इष्ट ठरते.

## ६. नोंद - विश्वकोशसंदर्भ :

एखाद्या ग्रंथाची समीक्षा करीत असताना समीक्षकाने विश्वकोश संदर्भाची नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच लेखकानेही साहित्यकृती निर्मिती करत असताना इतर साहित्यकृतीचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. तसेच हा संदर्भ कोणाच्या साहित्यकृतीतून घेतला, किती पानावरून घेतला. उदा: 'प्रदक्षिणा' या ग्रंथात असे संदर्भ आहेत. इ. तपशील देणे महत्त्वाचे आहे. या सर्व कारणामुळे समीक्षकाच्या मतास एक पुष्टी मिळत असते आणि त्याचे समीक्षण उत्तम होण्यास मदत होते.

## ७. अर्थान्वेषण :

सर्वात प्रथम समीक्षक ज्यावेळेस ग्रंथ वाचन करतो. त्यावेळेस ती साहित्यकृती समीक्षकाने प्रथमत: समजावून घेणे आवश्यक आहे. तरच समीक्षकास साहित्यकृतीचा अर्थ समजू शकेल. एकाला भावलेला अर्थ त्याच साहित्यकृतीतून दुसऱ्याला वेगळा भावण्याची शक्यता असते. उदा : केशवसुतांची 'तुतारी' ही कविता होय.

## ८. तत्त्वान्वेषण :

समीक्षक ज्यावेळेस एखादी साहित्यकृती अभ्यासत असतो त्यावेळेस त्यात तत्त्वज्ञानविषयक काय सांगितले आहे हे पाहणे आवश्यक ठरते. उदा: केशवसुत यांच्या 'तुतारी' या कवितेत नवविचार सुधारक हे तत्त्व सांगितले आहे. हे समीक्षकच सांगतो. तसेच धार्मिक ग्रंथामध्ये जे काही आध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगितले आहे त्याविषयी समीक्षक सखोलतेने सांगतो.

## ९. समीक्षणात्मक टीपण :

एखादी साहित्यकृती का चांगली? का वाईट? यांचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. नुसती साहित्यकृती चांगली किंवा वाईट म्हणून चालत नाही तर त्यात रचना वैशिष्ट्ये, गुण वैशिष्ट्ये कोणती, हे स्पष्टीकरण देणे आवश्यक ठरते. कलाकृतीचे मूल्यमापन करताना काहींनी लेखकाचे व्यक्तिमत्त्व यावर भर दिला. तर काहींनी लेखकांचे व्यक्तिमत्त्व व भोवतालची परिस्थिती यावर भर दिला. काहींनी विश्लेषण व रसास्वादांवर तर काहींनी निर्णयावर भर दिला, पण समीक्षेचा उत्कर्ष व्हायचा असेल तर विश्लेषण, रसास्वाद, निर्णय यापैकी कोणत्याही गोष्टीची उपेक्षा होता कामा नये .गतकाळातील काव्याचा विचार चालू असता समीक्षकाने ऐतिहासिक परिस्थतीचे मर्म जाणावे. सौंदर्य तत्त्वाच्या अनुरोधाने त्यातील कलात्मकतेचा विचार करावा. निश्चित मूल्ये प्रमाण मानून त्या आधारे त्यांच्या मोठेपणाचा विचार करावा. रसास्वाद, निर्णय, ऐतिहासिक घटना यापैकी कोणाकडेही दुर्लक्ष करू नये. म्हणून भोवतालची राजकीय, सामाजिक, धार्मिक, नैतिक परिस्थिती, त्यांच्या काळातील वाङ्मयविषयक प्रणाली ,त्याचबरोबर कवींच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्म समजावून घ्यावे.

***

# समीक्षेतील साहित्याचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन यांचे स्थान व कार्ये

कोणत्याही साहित्यकृतीची समीक्षा करत असताना आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन यांच्याआधारे साहित्यकृतीतील सौंदर्यस्थळे शोधण्याचे काम टीकाकार करत असतो. सुरुवातीला साहित्यकृतीचे आपण आकलन करून घेतो. त्यानंतर ती साहित्यकृती आस्वादक्षम आहे किंवा नाही, हे लक्षात येते आणि शेवटी त्या साहित्यकृतीचे यथायोग्य मूल्यमापन केले जाते. म्हणजेच समीक्षक त्या साहित्यकृतीबद्दल निर्णय देत असतो. समीक्षेत साहित्याचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन यांचे स्थान व कार्य काय आहे, ते येथे आपण स्पष्ट करणार आहोत.

मॅथ्यू ॲरनॉल्डच्या मते, कवीच्या काव्याचे मूल्य वाचकास प्रतीत करून देणे, हे टीकेचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. पूर्वग्रह न बाळगता कलाकृतीचे आकलन करून घेणे किंवा रसग्रहण करणे ॲरनॉल्ड महत्त्वाचे मानतो. तर विचेस्टरने रसास्वादाबरोबरच मूल्यमापनालाही महत्त्व दिले आहे. कलाकृतीची समीक्षा करत असताना केवळ वैगुण्यांचा शोध घेऊन कलाकृतीची हेटाळणी करणे नव्हे तर कलाकृतीतील सौंदर्यस्थळे किंवा गुणांची स्तुती करणे महत्त्वाचे आहे. टीकाकाराने कलाकृतीतील सौंदर्याचा आस्वाद घेऊन सौंदर्याच्या आस्वादाच्या वाटा इतरांनाही उपलब्ध करून देणे जास्त,महत्त्वाचे ठरेल. बुनियरच्या मते रसास्वादानंतरच कलाकृती विषयी निर्णय देणे महत्त्वाचे ठरेल. निर्णयाशिवाय समीक्षेला मोल चढत नाही, असे त्याला वाटते. तर हेन्री जोन्सच्या मते कलाकृतीचे सूक्ष्म अवलोकन करून तिच्यातील मर्मस्थाने उलगडून दाखविणे महत्त्वाचे आहे.

**१. आकलन -**

कोणत्याही साहित्यकृतीविषयी निर्णय देण्याच्या अगोदर त्या साहित्यकृतीचे अवलोकन करून घेणे आवश्यक आहे. एखाद्या लेखकाच्या साहित्यकृतीचे आकलन करताना त्यांच्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थिती कशी होती. त्याच्या काळातील वाङ्मयीन प्रणालींचे ज्ञान

करून घेणे आवश्यक आहे अन्यथा त्याच्या कलाकृतीचे मर्म उलगडले जाणार नाही. त्याचबरोबर संबंधित लेखक कोणत्या विचारप्रणालीने भारावून गेला आहे. हेही समजणे आवश्यक आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेषही समजून घेतले पाहिजेत. भोवतालच्या परिस्थितीचा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर ज्याप्रमाणे परिणाम होतो त्याचप्रमाणे त्याच्या समकालीनांच्या विचारांचाही प्रभाव त्याच्यांवर पडल्याशिवाय राहत नाही. उदा: वि. स. खांडेकरांचे साहित्य, म. गांधींच्या 'खेड्याकडे चला' या मूलमंत्राचा धागा खांडेकरांच्या साहित्यात प्रतिबिंबित झालेला दिसतो. तसेच विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' कादंबरीत सोलापूरच्या गुन्हेगार जातीच्या वस्तीत शिक्षण व कल्याण खात्यात लेडिज सुपरिटेंडेंट म्हणून काम पाहत असताना त्यांना गुन्हेगार लोकांना जवळून पाहता आले आणि तारेच्या कुंपनात राहणाऱ्या गुन्हेगार लोकांचे जीवन 'बळी' कादंबरीतून त्या अतिशय सूक्ष्म पद्धतीने रेखाटू शकल्या. म्हणजेच सभोवतालची परिस्थिती, विचार याचे आकलन करून घेतल्यानंतरच कलाकृतीशी चांगल्या रीतीने समरस होता येते हे लक्षात येते.

साहित्यकृती समजावून घेत असताना ती साहित्यकृती ज्या प्रकारात मोडते त्या प्रकाराच्या विकासाच्या विशिष्ट अवस्थेत त्याने ते पुस्तक लिहिलेले असते. एवढ्यासाठीच लेखकाच्या सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन होणे आवश्यक आहे. थोडक्यात समीक्षेतील साहित्याचे स्थान शोधताना साहित्यकृतीचे आकलन करून घेणे ही समीक्षेची पहिली पायरी म्हणावी लागेल.

**२. आस्वाद :-**

लेखकाच्या कलाकृतीचा निर्मळ मनाने आस्वाद घेणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे. जर समीक्षकाने साहित्यकृतीकडे तुटक किंवा संशयास्पद वृत्तीने पाहिले तर त्याला त्या साहित्यकृतीच्या अंतरंगापर्यंत जाता येणार नाही किंवा त्या साहित्यकृतीपासून मिळणारा आनंद हा ब्रह्मनंदसहोदर प्रकारचा नसेल. समीक्षकाने आस्वादवृत्तीने ललितकृतीत जी जी सौंदर्यस्थळे विखुरलेली आहेत ती सूक्ष्म नजरेने हुडकून काढून त्यात तो रममाण झाला पाहिजे. तरच त्याला त्या कलाकृतीचा चांगला आस्वाद घेता येईल. उदा. एखादा ग्रंथ हातात पडताच कावळ्याप्रमाणे चोच मारून रक्तबंबाळ करण्याची त्याची प्रवृत्ती नसावी तर भ्रमराप्रमाणे कमलपत्रावरून चालत असताना पाकळ्यांना इजा होणार नाही इतक्या हळुवारपणे, दक्षतेने कलाकृतीत लपलेले लावण्य वेचून काढून भ्रमराने स्वखुशीने कमललीनेच्या पाशात अडकावे किंवा चतुरपत्नी ज्याप्रमाणे पतीच्या विचारांशी व भावनांशी समरस होण्याचा प्रयत्न करते त्याप्रमाणे कलाकृतीच्या अंतरंगाशी समरस होऊन त्या कलाकृतीचा आस्वाद घेतला पाहिजे. कलाकृतीचे मूळ सौंदर्य खुलून दिसण्यासाठी त्याने कलाचतुरदृष्टीने रसास्वाद घेणे आणि इतरांनाही रसास्वादांच्या वाटा मोकळ्या करून देणे हेच जास्त उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

### ३. मूल्यमापन :

आकलन, आस्वाद आणि त्यानंतरची महत्त्वाची पायरी म्हणजे कलाकृतीचे मूल्यमापन होय. साहित्यकृतीचे परिशीलन करून कलाकृतीच्या योग्यतेविषयी टीकाकार निर्णय देत असतो. मृगाचा पाऊस संपल्यावर आकाश जसे निर्मळ होते त्याप्रमाणे अगदी स्वच्छ निर्मळ मनाने टीकाकार कलाकृतीचे मूल्यमापन करत असतो. फ्रेंच टीकाकार बुनेनियरच्या मते वर्गीकरण करणे व शेवटी निर्णय देणे हे टीकेचे मुख्य प्रयोजन आहे. समीक्षा म्हणजे उत्कृष्ठ गणल्या गेलेल्या वाङ्मयाचे उत्कृष्ठत्व कशात आहे हे शोधून काढून त्या आधारे कलाकृतीविषयी निर्णय देणे होय. वाङ्मयीन मूल्यमापनाविषयी रेनेवेलेक म्हणतो, मूल्यांच्या कसोटीवर साहित्यकृतीचे सौंदर्यदृष्टीने विश्लेषण, वर्णन करणे म्हणजे वाङ्मयीन मूल्यमापन होय. साहित्यकृतीच्या घटकांचा अर्थ वाचकाला जेव्हा सौंदर्यदृष्टीने अर्थपूर्ण वाटतो. तेव्हा त्या अर्थाला, त्या घटकाला सौंदर्यमूल्य प्राप्त होते. प्रा. श्री. के. क्षीरसागर 'टीकाविवेक' ग्रंथात म्हणतात, "टीकेचा उद्देश कलाकृतीचा जाणकार वृत्तीने आस्वाद घेणे व आस्वादनाच्या ओघातच सहजगत्या आवश्यक तेथे मूल्यमापनासहीत न कचरणे होय." केवळ प्रतिमा, प्रतीके, किंवा अलंकार ओळखणे हे मूल्यमापनात आवश्यक नाही. तर त्यातील इष्ट-अनिष्ठता काय आहे या बाबी रसिक वाचकाच्या निदर्शनास आणून देणे होय. टीकाकाराने ललितकृतीचे मूल्यमापन करीत असताना ललितकृतीतील सौंदर्यरसाचे सेवन करून हळूवार आणि सहानुभूतीपूर्वक वृत्तीने कलाकृतीचे मूल्यमापन करायला हवे. लेखकाच्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना लेखकाला पिंजऱ्यातील आरोपी समजून जंगली पद्धतीने मूल्यमापन व्हायला नको तर लेखकाबद्दल आदर ठेऊन आणि उदार बुद्धीने ललितकृतीचे मूल्यमापन करायला हवे. अर्थात मूल्यमापन करणाऱ्या टीकाकाराची मनोवृत्ती पहाटेच्या ताज्या फुलाप्रमाणे विकसित व त्यावर चमकणाऱ्या दवबिंदूप्रामणे निर्मल असते तिच्यातून रसिकतेचा मंद-गंध दरवळत असतो. आपल्या पवित्र सौंदर्याच्या धवल दर्शनाने फुल जसे रसिकांना आल्हादित करते त्याप्रमाणे नामांकित टीकाकाराचे लेखन आपल्या कलासुंदर पद्धतीने रसिकाचे अंतकरण हर्षित केल्यावाचून राहत नाही. (टीकाकार आणि त्याचे शास्त्र पृष्ठ.५११.) थोडक्यात टीकाकाराने कलाकृतीचे मूल्यमापन करताना केवळ कलाकृतीतील दोष दिग्दर्शन करू नये तर कलाकृतीतील जी मर्मस्थाने आहेत ती ओळखून त्यांचा अन्वयार्थ लावण्यासाठी लेखक, वाचकास मदत केली पाहिजे.

ललित कलांच्या मूलभूत तत्त्वाचा उपयोग करून कलाकृतीविषयी निर्णय देणे, अर्थहीन कलाकृतीतील सौंदर्यतत्त्वाचे आकलन करणे, वाचकास कलाकृती समजण्यास सोपी जावी त्यासाठी ज्या गोष्टीचे ज्ञान आवश्यक असेल त्या गोष्टी समीक्षकाने स्पष्ट केल्या तरच त्याचे निर्णयाचे, मूल्यमापनाचे चीज होईल. कवीच्या काव्यांचे मूल्यमापन होत असताना निरंकार वृत्तीने एखाद्या गोष्टींशी समरस होणे गरजेचे ठरते. इतरांच्या

भावनांचे अवलोकन करणे, एखादा विचार आत्मसात करणे, विषयाचे अत्यंत सूक्ष्म अवलोकन करून अवलोकनाची परिसीमा गाठणे व त्याचा बुद्धिप्रधान आविष्कार करून अतिशय जिज्ञासूवृत्ती बाळगून कलाकृतीतील मर्मस्थान उलगडून दाखविणे हे मूल्यमापनाच्या दृष्टिकोणातून हितावह ठरेल. केवळ मूल्यमापन करत असताना दोष दिग्दर्शन न करता गुणदोषाची चर्चा करताना भोवतालची सामाजिक, धर्मिक, राजकीय नैतिक परिस्थिती समजावून घेणे हितावह ठरेल. त्या काळातील वाङ्मयीनप्रणाली, त्याचबरोबर कवीच्या व्यक्तित्वाची मर्मस्थाने समजावून घेणे आणि काव्यातील अंतरंगाशी समरस होऊन सौंदर्य तत्त्वांच्या अनुषंगाने काव्याचे मूल्यमापन करणे जास्त योग्य ठरेल. त्यामुळे प्रस्तुत कलाकृतीचा निर्णय एकांगी न होता, विविधांगी होऊन टीकाकारांचे मूल्यमापनातील महत्त्व प्रकट होण्यास मदत होईल.

**सारांश :**

उपरोक्त विवेचनावरून आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन यांचे समीक्षेतील स्थान व कार्य काय आहे हे समजण्यास मदत होईल. थोडक्यात आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन यांच्या समन्वयाने समीक्षा आदर्श व परिपूर्ण होईल.

***

## समीक्षकाची साधना किंवा समीक्षकांचे गुण

समीक्षा हा बौद्धिक व्यापार आहे. एखाद्या कलाकृतीविषयी निर्णय देणे, योग्य अभिप्राय देणे हे कार्य समीक्षकाचे आहे. त्यासाठी त्याला पूर्वतयारी करणे आवश्यक असते. हे काम सामान्य वाचकाला शक्य नाही. सामान्य वाचकाचा निर्णय केवळ वरवरचा असतो. पण त्या संस्काराचे स्वरूप लक्षात घेऊन त्याला ज्ञानाची जोड देऊन टीकाकार आपला निर्णय देतो, हा बौद्धिक व्यापार असतो. सामान्य वाचकाची अभिरूची ही शक्यतो बाह्य घटकावर आधारित असते. तर समीक्षक हा कलाकृतीच्या गाभ्याशी जाऊन भिडतो. तो कलाकृतीतील सौंदर्य सामान्य वाचकाला उलगडून सांगतो. नुसते 'वाटणे' याला महत्त्व नाही संयुक्तिक वाटणे महत्त्वाचे आहे. निर्णय घेण्यासाठी युक्तिवाद लागतो. त्यासाठी बुद्धीत कणखरपणा असणे आवश्यक आहे. दोन घटक वेगळे काढता आले पाहिजेत म्हणजेच विश्लेषण व वर्गीकरणासाठी बुद्धी हवी असते. तसेच समीक्षकाचे अवलोकनही विवेकपूर्ण पाहिजे. टीकेचेही काही शास्त्र आहे, काही नियम आहेत. त्या शास्त्राच्या विकासाच्या अगदी पहिल्या पायऱ्या ओलांडण्यास विवेचनात्मक ज्ञानाची गरज आहे. म्हणूनच समीक्षेसाठी लागणारी बौद्धिक तयारी समीक्षकाजवळ असावी. समीक्षकाच्या अंगी पुढील गुण असणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संवेदनशीलता | २. | रसिकता |
| ३. | प्रज्ञा | ४. | तुलनाक्षमता |
| ५. | व्युत्पन्नता/बहुश्रुतता | ६. | विश्लेषकता |
| ७. | चिकित्सकता | ८. | मूल्यविवेक |
| ९. | भाषिकतयारी | | |

**१. संवेदनशीलता :-**

कलावंत आपल्या अनुभवाच्या आधारावर स्पष्ट चित्र आपल्या मनापुढे उभे करतो. उदा :- लेखक, चित्रकार, शिल्पकार हे आपल्या प्रतिभेच्या जोरावर स्वत:समोर चित्र उभी करतात आणि तिच चित्रे वाचकासमोर ठेवतात. उदा :- कलावंत प्रथम

कलाकृती निर्माण करीत असतो आणि नंतर ती कलाकृती चांगली किंवा वाईट हे समीक्षक किंवा वाचक ठरवतो. म्हणजेच कलावंत या ठिकाणी त्याला जे जाणवलं, भावलं तेच तो आपल्या कलाकृतीच्या साह्याने वाचकांसमोर उभे करत असतो. म्हणजेच पहिली कलाकृती निर्माण होते आणि मग त्यावर नंतर समीक्षा होते.

उदा:- 'पाणकळा' या र. वा. दिघे यांच्या कादंबरीच्या आधारे आपणास स्पष्ट करता येईल. र. वा. दिघे यांनी यामध्ये भिल्ल समाजाचे जीवनचित्रण रेखाटले आहे. या कादंबरीत रंभाजी नावाचा रंगेल पाटील उभा केला आहे. विशेष म्हणजे तो टांगा घेऊन गावात फिरतो. भुजाबा आणि रंभाजी यांच्यामध्ये वैर असते. भुजाबाविषयी रंभाजीच्या मनात भिती असते म्हणून तो भिल्लाकरवी त्याचा सूड उगवतो. यासाठी तो या भिल्ल लोकांची मदत घेतो. हे लोक चोऱ्या करतात, लूटालूट करतात आणि सर्व रंभाजीजवळ आणून देतात. त्यातले थोडेफार रंभाजी त्यांना देतो आणि विशेष म्हणजे भुजाबाच्या मुलीचे पाटलाच्या मुलाबरोबर प्रेम असते. म्हणजेच एकीकडे भुजाबा आणि रंभाजी यात संघर्ष तर त्याच्या मुलामुलींचे प्रेम दुसऱ्या बाजूने. कालांतराने या भिल्ल समाजावर उपासमारीची पाळी येते आणि त्यावेळेस पाटील त्यांना नाकारतो. तो म्हणतो, "तुम्ही तर आता काही आणून देत नाही. तर मी काय देऊ? काय तुमच्या बापाने आणून ठेवले आहे का?" आणि त्याच वेळेस भुजाबा धान्य घेऊन मुंबईला जायला निघतो. भिल्ल लोक अन्नावाचून व्याकूळ झालेली असतात. ते भुजाबाच्या विहिरीजवळ थांबलेले असतात. परंतु आपण तर भुजाबाला पाटलाच्या सांगण्यावरून त्रास दिलाय आपण कसे धान्य मागावेत. तर ते त्या गाडीजवळ जातात. भुजाबाच्या लक्षात येते. तो म्हणतो "कोण आहे रे तिकडे, काय पाहिजे." या जातीतील सुकऱ्या म्हणतो की, आम्ही तुझ्या घराला आग लावली ते आहोत तरीही भुजाबा त्यांना धान्य देतो. त्यांचा पोटाचा प्रश्न सोडवितो. त्यावेळेस या भिल्ल जातीतील लोकांना वाटले अरे, ज्यांना आपण देत राहिलो त्यांनी आपल्याला नाकारले आणि ज्याचे घेत राहिलो, त्याने दिले.

आणि त्यांच्या मनात रंभाजीविषयी सूडाची भावना उठते. रंभाजीला ते मारतात आणि त्यावेळेस भुजाबाच रंभाजीला सोडवतो. 'कोणाची हिम्मत असेल तर हात लावून दाखवा रंभाजीला' या ठिकाणी आपणाला असे जाणवते की, आपल्या शत्रूविषयीसुद्धा भुजाबा सहानुभूती दाखवतो. या ठिकाणी र. वा. दिघे दोन घराण्यातील संघर्ष उभा करतात. त्यावेळेस ते या अनुभवाशी एकरूप झालेले असतात.

कथाकार, कादंबरीकार, आपणासमोर चित्र उभे करतो आणि त्याचे समीक्षण समीक्षक करतो. उदा: 'पाणकळा' मधील भुजाबा आणि रंभाजी यांच्यामधील संघर्ष दाखवताना भुजाबा हा रंभाजी पाटलाला गावाबाहेर शिवळाने मारतो. परंतु तरीही पाटील रडत नाही वा ओरडत नाही. भुजाबा त्याला शिवळाने मुका मार देतो आणि तोही मुक्यानेच मार खातो. या ठिकाणी पाटील जर ओरडला, बोंबलला तर त्याला

वाटते आपली इज्जत जाईल, लोक काय म्हणतील. एक पाटील असूनही मार खावा लागतो. म्हणजेच आपली इज्जत जाईल म्हणून तो ओरडत नाही. सर्वसामान्य वाचकाच्या हे लगेच लक्षात येणार नाही परंतु समीक्षकाच्या लक्षात येते. परंतु समीक्षक जर संवदेनशील असेल तरच त्याला हे चटकन लक्षात येईल.

टीकाकार सुद्धा ग्रंथाशी तादात्म्य पावताना मूळ ग्रंथकाराला झालेल्या अनुभवांच्या काही असाधारण भावनात्मक संवेदना आपल्या अंत:करणात साठवतो. म्हणजेच समीक्षक हा लेखकाच्या अनुभवाशी समरस होतो त्याने एकरूप झाले पाहिजे. उदा : 'इंधन' या कादंबरीमध्ये जातीयतेचे इंधन कसे पेटते आहे, हे लेखकाने सांगितले आहे. यामध्ये सवर्ण, मुस्लीम आणि नवबौद्ध यामध्ये संघर्ष निर्माण होतो. यांमध्ये एक मुस्लीम स्त्री लक्ष्मीला 'नवस' करते की मला मूल व्हावे. परंतु या यात्रेत तिच्यावर बलात्कार होतो. तिची मानहानी होते. हिंदू मुस्लीमांनी एकत्र यावे. ते माणूस म्हणून वेगळे नाहीत हे हमीद दलवाई यांना सांगावयाचे आहे. यामध्ये इंधन म्हणजे भडका होणे, पेट घेणे हे त्या समीक्षकाला समजणे आवश्यक आहे. हे सर्व केव्हा समजेल. तो जर संवेदनशील असेल तर.

उदा: - 'गोतावळा' मध्ये लेखकाने नारबाचा गोतावळा सांगताना कासव, विहीर, गुरेढोरे, बांध, त्यावरील झाडे, कुत्री, मांजरे, निसर्ग, मळा हा मोठा गोतावळा नारबाचा आहे. हा गोतावळा मालक त्याला सोडून जायला सांगतो त्यावेळेस त्याला कारणीभूत ज्या गोष्टी आहेत त्या म्हणजे ट्रॅक्टर, यांत्रिकीकरण हे सांगण्याचे काम समीक्षक करतो म्हणजेच कलाकृती भावण्यासाठी समीक्षक संवेदनशील हवा.

लेखकाच्या कल्पनाविलासाला शब्दरूप देण्याचे कार्य समीक्षक करतो. उदा :- 'पाचोळा' या कादंबरीत शिंपी कुटुंबाची वाताहत आहे. यामध्ये गरीब व्यक्तीचे कसे शोषण होते, ते दाखवले आहे. कुशल कामगारांमुळे अकुशलांचे कसे हाल होतात हे दाखवले आहे. म्हणजेच पाचोळ्याप्रमाणे या गरीब समाजाला कोणीही झटकून टाकावे असे चित्रण आहे. हे समीक्षकच बरोबर पकडू शकतो. म्हणजेच तो त्या अनुभवाशी एकरूप होतो. म्हणून समीक्षकाला कलाकृती भावणे आवश्यक आहे. यासाठी संवेदनशील वृत्ती असावी. दुसऱ्याच्या दु:खाने दु:खी होणे हे संवेदनशील माणसाचे लक्षण आहे. उदा:- आपल्या भारतदेशाला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. तरीही त्याविरूद्ध कोणी आवाज उठवत नाही. म्हणजेच या ठिकाणी सरकार संवदेनशील नाही. म्हणजेच संवदेना बोथट झाली आहे. लेखक असा अनुभव का मांडतो हे समजण्यासाठी संवेदना महत्त्वाची आहे. म्हणजेच लेखकाच्या भावनाशी एकरूप होण्याची संवेदनशीलता समीक्षकाजवळ हवी.

प्रतिभाशाली लेखकाच्या अंत:करणातील प्रवृत्ती व भावना अत्यंत संवेदनाक्षम असतात. टीकाकारांची मनोवृत्ती ही या प्रवृत्तीमुळे व भावनेच्या आंदोलनामुळे कंपित होते. त्याचे मन संवेदनाशील असल्याशिवाय समरसता शक्य नसते. ललित वाङ्मयात

विचारांतील भावनांचे प्राबल्य अधिक असते टीकाकाराचे अंत:करण जर संवेदनाक्षम नसेल तर टीका विषयाशी तो समरस होणारच नाही. टीकाकारही एक कलावंत असतो. कलावंताला आलेला अनुभव जसा स्वयंसिद्ध तसाच टीकाकाराला अनुभवाशी एकरूप होताना जो अनुभव येईल तोही स्वयंसिद्ध असतो. याचाच अर्थ टीकाकाराच्या ठिकाणी संवेदनशीलता असते. ज्यावेळेस समीक्षक हा एक कलावंत म्हणत असताना तो लेखकाच्या नवनिर्मितीवर निर्मिती करत असतो उदा : - 'ज्ञानेश्वरी' ज्ञानेश्वरांनी गीतेवर भाष्य करून ज्ञानेश्वरीची निर्मिती केली म्हणजेच या ठिकाणी नवनिर्मिती घडून आली. टीकाकारही स्वत:च्या अनुभवांशी एकरूप होतो यासाठी त्याचे मन संवेदनशील असले पाहिजे व त्याचा हा अनुभव लेखकाच्या कलाकृतीशी असतो.

उदा :- 'खळाळ' या कथासंग्रहामध्ये लेखकाने माणसे कशी स्वत:च्या पोटासाठी कष्ट करतात, आपलं शील जपतात, अब्रूचे रक्षण करतात, हे सांगितले आहे. तसेच अरविंद गोखले वेश्यांचे जीवनचित्रण रेखाटताना समाज त्यांना कसे नाकारतो परंतु त्यांचे दु:ख त्यांनाच माहीत असते आणि ते सर्व हे पोटासाठी करतात. म्हणून त्यांना नाकारू नका म्हणजे एखादी 'स्त्री' शील, अब्रू रक्षण करणारी असली तरी काही मर्यादा असतात हे समजण्यासाठी आपले मन संवेदनाक्षम असले पाहिजे. आणि जर संवेदना बोथट झाल्या तर त्या माणसाला ती कलाकृती समजणार नाही. म्हणून समीक्षकाजवळ संवेदनशीलता असावी.

**२. रसिकता :**

टीकाकार हा सन्हृदय असावा. त्याच्याजवळ सहानुभूती आवश्यक आहे. त्याच्याजवळ तटस्थपणा पाहिजे. म्हणजे काही ठराविक अंतरावरूनच त्याने एखाद्या साहित्यकृतीचा आस्वाद घेणे आवश्यक आहे. जर तो भावनावेगात बुडाला तर त्याच्याकडून रसनिष्पती होणार नाही. त्याच्या टीकेमध्ये अनेक दोष निर्माण होतील. तसेच तो जर रसिक असेल तर कलाकृतीशी एकरूप होईल. जरी एखाद्या कलाकृतीचा आणि त्याचा संबंध नसेल तर त्याने म्हणू नये की, माझा आणि या कलाकृतीचा संबंध नाही. म्हणजे असे न म्हणता त्यातील त्याने सौंदर्याचा शोध घेणे आवश्यक आहे. टीकाकारांचे ज्ञान हे सर्वांगीण असणे आवश्यक आहे. त्याला वाङ्मयीन विविध प्रणालीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. ऐतिहासिक, शास्त्रीय ज्ञान असणे आवश्यक आहे. कोरड्या ज्ञानाचा उपयोग नाही आणि या ज्ञानाचा उपयोग झाला तरी काव्यातील मर्म ओळखून, त्यातील सौंदर्याची ओळख करून घेणे व रसाचा आस्वाद घेणे या गाष्टी अभिरूची शिवाय शक्य नाही. टीकाकाराची अभिरूची संपन्न पाहिजे आणि त्याद्वारे त्याने वाचकांच्या अभिरूचीला वळण लावणे आवश्यक आहे. सह्रदयतेशिवाय काव्यातील सौंदर्यतत्त्वाचे ज्ञान टीकाकाराला होणे शक्य नाही. टीकाकाराजवळ काव्यात्म दृष्टी पाहिजे. टीकाकाराने एखाद्या कलाकृतीचा आस्वाद

घेताना त्या कलाकृतीशी तादात्म्य पावणे आवश्यक आहे. काही ठराविक अंतरावरून त्या कलाकृतीतील सौंदर्य जाणून घेतले पाहिजे. उदा: १) 'पाचोळा' या कादंबरीतील जो काही संघर्ष दाखविला आहे त्यात गरीबांचे शोषण आहे. पार्वती आणि गंगाराम यांच्या कुंटुबाची कशी वाताहात झाली आहे. या आधुनिकतेमुळे त्याच्या वाट्याला फक्त पाचोळापणच येते. यावेळेस टीकाकाराने त्यात बुडून जाता कामा नये. नाहीतर त्याची टीका ही आस्वादक्षम होणार नाही २) हरिभाऊची 'पण लक्षात कोण घेतो' ही कांदबरी यमूच्या दु:खाने ओतप्रोत भरली आहे. अशावेळी समीक्षकाने गहिवरूनही जाता कामा नये. नाहीतर त्यात साहजिकच रसनिष्पती होणार नाही. त्यातील मर्म समजणार नाही. उदा :- एखाद्या फुलाचा आस्वाद घेताना त्या फुलाला कोणत्याही प्रकारे इजा होणार नाही या दृष्टीने आस्वाद घेणे आवश्यक आहे. म्हणजेच भ्रमरवृत्तीने आस्वाद घेणे आवश्यक आहे. कोरड्या ज्ञानाचा उपयोग नाही तर त्या ठिकाणी त्याला त्या गोष्टीतील मर्म शोधता आले पाहिजे. उदा :- आपण गाडी चालवतो. यावेळेस जर आपणाला फक्त गाडीचे गिअर, क्लच, ब्रेक, एक्सलेटर या क्रिया माहीत असल्या म्हणजे काही लगेच गाडी येणार नाही. या ठिकाणी सरावाची आवश्यकता आहे. किंवा जर आपणाला कपडे खरेदी करावयाचे असतील आणि आपण जर मळखाऊ कपडेच पाहिजे हा निकष आपल्या डोळ्यासमोर ठेवला तर सहाजिकच आपली अरसिकतेची वृत्ती दिसते. रसिकाजवळ सौंदर्यदृष्टी असते तर अरसिकाची सौंदर्य दृष्टी बोथट झालेली असते. टीकाकाराने आपली अभिरूची प्रथम घडविली पाहिजे तरच तो दुसऱ्याची अभिरूची घडवू शकतो. यासाठी तो सह्रदय असावा. त्याच्याजवळ रसिकता असावी. उदा : 'फुलप्रदर्शना' मध्ये प्रयोगशाळेत फुले ठेवली आहेत. त्यासाठी अनेकजण ते पाहण्यासाठी येतात. परंतु एकजण त्याचा वास घेऊन पाहतो. परंतु वास येत नाही तर दुसरा म्हणतो की, ती सरकारी फुले आहेत. म्हणजे त्याला सांगायचे असते की, सरकारी धोरणेच अशी आहेत की, ती एकही विधायक नाही किंवा ती निसर्गातील फुले नाहीत हे त्याला सांगायचे असते. या ठिकाणी त्याची रसिकदृष्टी दिसून येते. म्हणजेच त्याच्या ठिकाणी रसिकवृत्ती असणे आवश्यक आहे. टीकाकाराचे मन पूर्वग्रहदूषित नको. तरच त्याला जे काही ज्ञान मिळाले आहे, आनंद झाला आहे तो ते दुसऱ्यापर्यंत द्विगुणित करू शकेल.

टीकाकाराचा काव्यातील सौंदर्याचा आस्वाद सह्रदयतेअभावी अपुरा राहील. वनस्पतीच्या अभ्यासाने फुलांच्या जाती व अवयव समजतील पण गुलाबाच्या मोहक रंगाने व सुगंधाने संतुष्ट होण्यास रसिकता आवश्यक आहे. तेव्हा ज्ञानाची महती मान्य करूनही रसिकतेची जोड टीकाकाराला असली पाहिजे हे स्पष्ट आहे. रसिकतेच्या जोडीला सहानुभूती असावी. सहानुभूतीचा अभाव रसिकतेच्या आड येतो. त्यामुळे कलाकृतीविषयीचा निर्णय एकतर्फी व अशास्त्रीय होण्याचा संभव असतो. दूषित

पूर्वग्रहामुळे रसास्वादात वैगुण्य उत्पन्न होते. म्हणून तटस्थता हा गुणसुद्धा टीकाकाराच्या ठिकाणी असावा, असे अर्नोल्डचे मत आहे.

**३. प्रज्ञा :**

समीक्षा हा बुद्धिव्यापार आहे आणि साहित्यनिर्मिती करणे हे प्रज्ञावंताचे काम आहे. म्हणजेच समीक्षा करीत असताना बुद्धीला महत्त्व आहे. समीक्षकाला बुद्धीच्या जोरावर निर्णय देणे आवश्यक असते म्हणून समीक्षकाला त्याविषयी काही पूर्वतयारी करावी लागत असते. उदा : एका कादंबरीवर टीकाकाराला समीक्षा करायची आहे यासाठी त्याला कादंबरीतील जे काही घटक आहेत ते माहीत पाहिजे तसेच त्या कांदबरीला कलाटणी कशी मिळत गेली, तसेच कादंबरीतील कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, भाषाशैली, सामाजिक सत्य, ऐतिहासिक सत्य, वाङ्मयीन सत्य काय हे माहीत पाहिजे. तसेच ग्रामीण साहित्य, दलित साहित्याविषयी जर त्याला समीक्षा करावयाची असेल तर त्याला त्या वाङ्मयाविषयी संपूर्ण ज्ञान पाहिजे तसेच प्रादेशिक साहित्याचे स्वरूप, व्याप्ती, मर्यादा हे सर्व ज्ञान पाहिजे.

प्रादेशिक साहित्याला 'प्रादेशिक' का म्हणावयाचे हेही त्याला माहीत पाहिजे यासाठी त्याच्याजवळ बुद्धी व्यापार पाहिजे. प्रत्येक वाङ्मयीन घटना समजून घेताना त्याच्याजवळ बुद्धी पाहिजे. यासाठी त्याला पूर्वतयारी करावी लागते. पूर्वतयारी करणे हे काम सामान्य वाचकाचे नाही. कारण सामान्य वाचकाचा निर्णय हा फक्त संस्कारजन्य असतो. तो फक्त आनंद मिळविण्यासाठी साहित्यकृती वाचतो. घराच्या व्यापातून बाहेर पडण्यासाठीच तो ते वाचन करतो आणि त्यातही त्याची जिज्ञासा ताणली गेली तरच तो वाचन करील. परंतु समीक्षकाजवळ बहुश्रुतता हवी आपल्याला जे काही ज्ञान झाले आहे ते संयुक्तिक स्वरूपात मांडता आले पाहिजे. परंतु यासाठी जो युक्तिवाद करावा लागतो त्यासाठी त्याच्याठिकाणी बुद्धीचा कणखरपणा असणे आवश्यक असते. उदा: ग्रामीण साहित्याचा विचार करताना समीक्षक आपल्या बुद्धीच्या जोरावर मतप्रदर्शन करत असतो. तो सांगतो, जो माणूस खेड्यात राहतो, गरिबी सतत त्याच्यामागे आहे. खेड्यात जो माणूस रस्त्यावर हमाली करीत होता. जो रानातवनात फिरत होता तो माणूस आता साहित्याचा केंद्रबिंदू बनला आहे. हे फक्त समीक्षकच सांगू शकतो. यावरून असे म्हणता येईल की, पूर्वतयारीमुळेच ज्ञानाच्या जोडीला हा विचार देणे त्याला शक्य होते. समीक्षकाजवळ बौद्धिक व्यापारात नुसते वाटणे याला महत्त्व नाही तर समीक्षा म्हणजे समतोलवृतीने जाणीवपूर्वक पाहणे, आपल्याला जे काही काव्यमूल्याचे, ज्ञान झाले आहे ते वाचकाला सांगणे, समतोलवृत्तीने सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने जिवंत व्यक्तिरेखा उभ्या केल्या पाहिजेत.

उदा:- 'पडघवली' मधील अंबू वहिनी ही गावची सेवा करणारी आहे. ती गावची धनीण आहे. एकेदिवशी हैदरचिच्याचा मुलगा सुलेमान रायफल घेऊन गोळी

घालण्याचा प्रयत्न करतो. परंतु अंबू वहिनी पुढे जाते. आणि म्हणते, माझ्यावर गोळी झाड त्या प्रसंगापूर्वी देवी एकेदिवशी तिच्या स्वप्नात येते आणि सिमेंटचा बंधारा फोडण्यासाठी सांगते. या ठिकाणी तू मेली तरी चालेल असे सांगितले जाते. आणि ती सर्व कोळीवाड्यासह बंधारा फोडते. तेव्हा गोळी झाडण्याचा प्रसंग उद्भवतो. आणि त्यावळेस सुलेमानचा बाप पुढे येतो आणि म्हणतो ही तर गावची मालकीण आहे.

हे सर्व पाहताना समीक्षकाजवळ युक्तिवाद पाहिजे. एखादी गोष्ट पुराव्यानिशी सांगता आली पाहिजे. जर एखाद्या लेखकाला दुखविलेतर त्याला काय वाटेल हे या ठिकाणी महत्त्वाचे नाही. त्या ठिकाणी भावनिक बाजू, वैयक्तिक संबंध किंवा स्नेह महत्त्वाचा नाही. यासाठी समीक्षकांची बुद्धी अवलोकन आणि वर्गीकरण करणारी असावी. त्याचे अवलोकन हे विवेकपूर्ण पाहिजे म्हणजेच त्याचा विवेक शाबूत असावा. नवी कलाकृती तपासत असताना तिला जुन्या कलाकृतीचे किंवा जुन्या मूल्यांचे निकष लावता कामा नये. म्हणजे सोन्याला-सोने आणि पितळाला-पितळ म्हणण्यासाठी समीक्षकाजवळ बुद्धिव्यापार पाहिजे. उदा:- विडंबन काव्य तपासत असताना त्याबद्दलची माहिती असणे आवश्यक आहे. ज्यावेळेस प्र. के. अत्रे यांनी रविकिरण मंडळावर 'झेंडूच्या फुलां'द्वारे ताशेरे ओढले त्यावेळेस त्यांच्यावर अनेक आरोप झाले. ते दारू प्राशन करीत होते, त्याच्यावर गांधीवादाचा पगडा होता, ते काँग्रेसजन होते असे अनेक आरोप घेतले जात होते. परंतु ते या ठिकाणी महत्त्वाचे नसून रविकिरण मंडळातील कवितांमध्ये संस्कृत प्रचुर शब्द येते होते. ते सर्वांना समजत नव्हते. ते दुर्बोध होते. म्हणून त्यांनी रविकिरण मंडळावर टीका केली. म्हणजेच रविकिरण मंडळ आणि झेंडूची फुले यांचे काही नाते आहे हे यथार्थ अवलोकन या ठिकाणी आवश्यक आहे. तसेच टीका एकांगी नको कारण अशी टीका लोक विसरतील. यासाठी टीकाही समतोल वृत्तीने पाहिजे. उदा :- र. वा. दिघे यांची 'पाणकळा' ही कादंबरी त्यांनी स्वखर्चाने प्रसिद्ध केली परंतु तरीही या कादंबरीला वाचकवर्ग मिळाला नाही. म्हणून त्यांनी आपल्या मित्र मंडळीमध्ये ह्या कादंबरीच्या प्रती सप्रेम भेट दिल्या. परंतु तरीही या कादंबरीचे वाचन झाले नाही. व पुन्हा या कादंबरीच्या प्रती निम्म्या किंमतीत विकण्यासाठी बाजारात आल्या. काही वाचक म्हणायचे की, काय हे नगर भागातील चित्रण आहे आणि तो भाग आपल्याला परिचयाचा आहे. नंतर या कादंबरीला गोवा या ठिकाणी पुरस्कार प्राप्त झाला. तरीही रेल्वेने जाताना जयवंत दळवी आणि वि. स. खांडेकरांनी त्यावर गाडीत बोलणे केले. परंतु कालांतराने ही टीका लोप पावली. जर एखादी कलाकृती खरच जर चांगली असेलच तर ती नावारूपाला आल्याशिवाय राहात नाही. उदा:- कोंबड्याला झाकून जरी ठेवले तरी पहाट ही होतच असते किंवा उजेडतच असते. तर त्या दशकात 'पाणकळा' ही कादंबरी मैलाचा दगड ठरली त्याकाळामध्ये या कादंबरीने नवा बदल

घडवून आणला यासाठी समीक्षकाजवळ विवेचन करण्याची पात्रता असावी. आणि असे विस्तृत विवेचन करण्यासाठी त्या साहित्यातील सर्व विषय ज्ञात असणे आवश्यक आहे त्याचे निर्णय हे वस्तुनिष्ठ असावेत. हे निर्णय देत असताना समीक्षकाजवळ बुद्धिव्यापार पाहिजे.

समीक्षकाजवळ विश्लेषण आणि वर्गीकरण करणारी बुद्धी असावी. त्याचे अवलोकन विवेकपूर्ण असावे. केवळ वाङ्मयाच्या विकासाच्या टप्प्यात कादंबरीचे स्थान ठरविणे आवश्यक आहे. यासाठी विवेचनात्मक ज्ञानाची गरज आहे. साहित्याच्या सर्व विषयाचे ज्ञान त्याच्याठिकाणी असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा निर्णय हा वस्तुनिष्ठ असावा म्हणजे समीक्षकाजवळ बुद्धिव्यापार पाहिजे.

## ४. तुलनाक्षमता :

समीक्षकाच्या अंगी दोन वस्तूतील तुलना करण्याचा गुण आवश्यक आहे. म्हणजे आपल्या सामर्थ्याच्या जोरावर श्रेष्ठ आणि कनिष्ठ ठरविण्याची पात्रता समीक्षकाजवळ पाहिजे. परंतु यासाठी विद्यमान आणि गतकाळातील परंपरेचे ज्ञान असेल तरच त्याला तुलनात्मक अभ्यास करता येतो. साम्य दाखवता येते. उत्कृष्ट कलाकृतीशी इतर कलाकृतीची तुलना करून तिचे उत्कृष्टत्व ठरविता येते. या न्यायाने टीका करणे म्हणजे तुलना करणे. असा अर्थ होतो. एकच वाङ्मयप्रकार लिहिणाऱ्या लेखकाची किंवा एकाच प्रकारात अंतर्भूत होणाऱ्या वाङ्मय प्रकाराची किंवा एखाद्या विशिष्ट प्रकारात गुणासाठी प्रसिद्ध असलेल्या लेखकाची, तशाच दुसऱ्या लेखकाशी त्याला तुलना करता येते. उदा :- 'धग' आणि 'पाचोळा' या कादंबऱ्यांचा विषय एकच आहे. शिंपी समाजाचे जीवनचित्रण या कांदबऱ्यामध्ये आलेलं आहे. या कांदबऱ्यांमध्ये औद्योगिकरणात, यांत्रिकीकरणात त्याच्या कुटुंबाची कशी वाताहात झाली आहे, हे दाखवले आहे. 'धग' मधील 'कौतिक' ही अन्यायाशी लढणारी आहे तर 'पाचोळ्या' मधील 'पार्वती' ही सर्व काही मुक्याने सहन करणारी आहे. तर 'पाचोळा' मधील गंगाराम हेकट वृत्तीचा आहे. 'मोडेन पण वाकणार नाही' अशी त्याची वृत्ती आहे. तर 'धग' मधील महादेव हा आळशी आहे पण जातीबद्दल अभिमान बाळगणार आहे. म्हणजेच या दोन्ही कादंबऱ्यांचे विषय जवळ-जवळ सारखेच आहेत.

उदा :- मधू मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी' आणि जयवंत दळवी यांची 'चक्र' या दोन्ही कांदबऱ्यांचे विषय सारखेच आहेत. त्यांनी आपल्या कादंबऱ्यामध्ये झोपडपट्टीतील जीवनचित्रण रेखाटले आहे. परंतु या ठिकाणी त्यांच्या मांडणीमध्ये आणि आशय व अभिव्यक्ती यांच्यामध्ये फरक आहे. परंतु आपण तुलना करत असताना त्या ठिकाणी, भाषा, वातावरणनिर्मिती कशी आहे, हे पाहणे आवश्यक आहे. म्हणजे समीक्षक ज्यावेळेस तुलना करत असतो त्यावेळेस त्या दोन कादंबऱ्यांची जवळीकता असणे आवश्यक आहे. तसेच त्या दोन्हीही कादंबऱ्या त्या - त्या

कालखंडात निर्माण झालेल्या असल्या पाहिजेत.

तसेच निरनिराळ्या गुणांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या लेखकांची तुलना होऊ शकणार नाही. उदा : १) ग्रामीण साहित्याची तुलना शहरी साहित्याशी करू नये. कारण व्यक्तिपरत्वे, प्रदेशपरत्वे, संस्कृतिपरत्वे साहित्य हे बदलत असते तेव्हा ग्रामीण साहित्याचे निकष नागरी साहित्याला लावता येणार नाही किंवा नागरी साहित्याचे निकष ग्रामीण साहित्याला लावता येणार नाहीत. तसेच ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांच्या साहित्याची तुलना होऊ शकत नाही. कारण या दोन्ही लेखकांमध्ये मतमतांतर आहे आणि दोघांचीही विचारसरणी वेगळी आहे. खांडेकर यांनी जीवनवाद प्रमाण मानला तर फडके यांनी कलावाद प्रमाण मानला तेव्हा त्यांच्या विचारप्रणालीत फरक आहे.

२) प्र. के. अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी' आणि दया पवार यांचं 'बलुत' या दोघांच्या कलाकृतीची तुलना करणे शक्य नाही. कारण दोघांच्याही विचारप्रणाली वेगवेगळ्या आहेत. पडणारा प्रभाव वेगवेगळा आहे. दोघांनीही भिन्न कालखंडात साहित्यनिर्मिती केलेली आहे. तेव्हा या दोन साहित्यकृतीची तुलना करणे अशक्य आहे. म्हणजेच आपण ज्यावेळेस दोन कलाकृतीची तुलना करत असतो तेव्हा आपणाला त्याच्या सर्व बाजू, प्रणाली माहीत असतील तरच तुलना करता येणे शक्य आहे. तसेच ३) 'सर्जा' या कादंबरीची आणि 'कुणाच्या खांद्यावर' यांची तुलना करता येईल. या दोन्ही कांदबऱ्यांमध्ये बैल हीच व्यक्तिरेखा आहे. परंतु कालखंड भिन्न आहे. एकाच काळात एकच विषय घेऊन आलेल्या कलाकृतीची तुलना करता येते. परंतु उत्कृष्ट कलाकृतीची इतर कलाकृतीशी तुलना करणे आणि त्यात उत्कृष्टत्व शोधणे आवश्यक आहे.

४) 'पावनाकाठचा धोंडी' आणि 'पडघवली' यांचा विचार करता येईल. उदा:- 'गारंबीचा बापू' आणि 'गारंबीची राधा' या दोन्ही कादंबऱ्या श्री. ना. पेंडसे यांच्याच आहेत. त्यात बापूला लोकप्रियता मिळाली आणि राधाला नाही. यासाठी या दोन कांदबऱ्यांची तुलना करणे आवश्यक आहे. तुलनेशिवाय कोणत्याही कलाकृतीचे श्रेष्ठत्व कळणार नाही. उदा :- 'पाचोळा' जर श्रेष्ठ असेल तर रा. रं. बोऱ्हाडे श्रेष्ठ. दोन कलाकृतीत साम्य असेल तरच आपणाला तुलना करता येईल. कारण समानत्व सापडले तरच तुलना करता येते. अन्य देशातील वाङ्मयाचा परिणाम इतर देशातील वाङ्मयावर होतो याचे भान ठेवून टीकाकाराने परंपरांचा अभ्यास करावा. तुलना व साम्य दाखवताना या अध्ययनाची गरज आहे. थोडक्यात परंपरेचा अभ्यास केला तरच तुलना शक्य आहे.

### ५. व्युत्पन्नता-बहुश्रुतता :

समीक्षकाजवळ ज्ञानाचा संचय असावा कारण विज्ञानाच्या शाखा खूप मोठ्या

प्रमाणावर विस्तारत आहेत. केवळ एखाद्या कलाकृतीचा अभ्यास करून भागणार नाही तर कलाकृतीमध्ये / साहित्यमध्ये सामूहिक मनाला महत्त्व असते. कलाकृतीचे विश्लेषण करत असताना, समीक्षण करत असताना मानसशास्त्राला महत्त्व असते. म्हणजेच कलावंताला मानसशास्त्राचे, विज्ञानाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हल्ली ज्ञानाच्या शाखा विस्तारत आहेत. शास्त्रीय ज्ञानात रोजच्या रोज भर पडत आहे. तसेच ज्ञानाची साधने विस्तारली आहेत. म्हणून वेगवेगळ्या गोष्टीचे ज्ञान मिळवणे आवश्यक आहे. आपल्याला वेगवेगळ्या गोष्टीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उदा: १) जर आपल्याला मार्क्सवाद समजून घ्यावयाचा असेल तर आपणाला मार्क्सवादाचा अभ्यास केला पाहिजे. २) इरावती कर्वे यांनी 'परिपूर्ती' नावाचे पुस्तक लिहून त्यात वेगवेगळे अनुभव चित्रित केले आहेत. यावरून त्यांचे ज्ञान किती विस्तृत आहे हे आपल्या लक्षात येते. ३) त्यांनी प्रेमाची रीत कशी असते. हे सांगताना पाश्चात्यांची उदाहरणे दिली आहेत.

आज ज्ञानाच्या शाखा विस्तारल्या आहेत. यासाठी समीक्षकाजवळ बहुश्रुतता पाहिजे तरच तो समीक्षा करू शकतो. म्हणजेच व्यापक ज्ञानचा संचय त्याच्याजवळ पाहिजे. उदा :- १) मनोविश्लेषक कादंबरी शिकवत असताना त्याविषयी माहिती पाहिजे. शास्त्रीय ज्ञानात सतत भर पडत असल्यामुळे सर्व ज्ञान मिळणे केवळ अशक्य आहे. म्हणून एखादी शाखा निवडून त्याचा आपण सर्वांगीण अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या गोष्टींचे ज्ञान मिळविले पाहिजे. साहित्याच्या ज्ञानक्षेत्रातील आपण हुकमी एक्का पाहिजे. यासाठी समीक्षकाजवळ बहुश्रुतता हा गुण असणे आवश्यक आहे.

## ६. विश्लेषकता आणि चिकित्सकता :

एखादी कलाकृती श्रेष्ठ आहे की कनिष्ठ आहे हे पाहणाऱ्याच्या दृष्टीवर अवलंबून असते. काही व्यक्ती दुसऱ्याचे विचार स्वतःच्या नावावर खपवत असतात किंवा दुसऱ्याचे विचार स्वतःचे मानतात. यामुळे त्यांची अहंकारीवृत्ती वाढायला लागते आणि मलाच सर्व काही समजते अशी त्यांची वृत्ती होते. उदा :- १) बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, 'वृत्तपत्रे, मासिके हिच सर्वात प्रभावी अशी साधने आहेत की, त्यामुळे समाजजागृती घडून येते'. परंतु काही लोक हे सांगत असताना हे आपण म्हटले आहे, हा आपलाच विचार आहे अशा पद्धतीने उसना आव आणत असतात.

पाश्चात्य समीक्षक अलंकार वगैरे सारख्या अवघड संकल्पना समजून घेत असतात तसे आपल्याकडील समीक्षक घेत नाहीत. ज्याचा विस्तार जास्त प्रमाणात मराठी समीक्षेत झाला नाही. त्याची माहिती आपणाला पाश्चात्य देशाात समजते किंवा ते समीक्षक सांगत असतात. उदा:- 'दसरा' या सणाच्या दिवशी आपट्याची पाने

वाटली जातात हा एक आदिबंध आहे. हे मराठी समीक्षक नीटपणे मांडत नाही परंतु पाश्चात्य समीक्षक मांडतो.

थोडक्यात विश्लेषकता म्हणत असताना सर्व प्रणालीचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. आणि तेही सुसूत्रपणे करणे आवश्यक आहे. जेणेकरून ते ज्ञान सामान्य वाचकाला होईल, असे स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे आणि हे फक्त चिकित्सक समीक्षकच करू शकतो. परंतु आपल्याकडील बहुतेक समीक्षक हे चिवित्सकपणे एखाद्या कलाकृतीचे स्पष्टीकरण करीत नाहीत. परंतु पाश्चात्य समीक्षक करतात. उदा :- १) माधव आचवल 'नटसम्राट' चे समीक्षण करत असताना त्याचे प्रयोगातून समीक्षण करत नाहीत. मात्र तेच पाश्चात्य समीक्षक करतात. म्हणजेच समीक्षकाने मूलग्राही ज्ञान आत्मसात केले पाहिजे. २) क्रिकेटबाबत विचार करताना बॉलर बॉलिंग टाकत असतो, हे आपण पाहतो. परंतु त्याकडे आपले फक्त लक्ष असता कामा नये, तर त्याची बॉलिंग टाकण्याची पद्धत, बॉलिंगचा प्रकार याविषयी ज्ञान आवश्यक आहे. ३) स्वयंपाक घरात एखादी गृहिणी एकदम रूचकर जेवण बनवत असेल तर आपण तिला 'सुगरण' म्हणतो हे ज्ञान समीक्षक सांगत असतो त्यालाच चिकित्सकता असे म्हणतात. हे सर्व चिकित्सक वृत्तीतून आपणाला समजते.

साहित्य शास्त्रातील सर्व तत्त्वप्रणाली समीक्षकाला माहीत असणे गरजेचे आहे. तरच त्याला त्याचा आस्वाद घेता येईल उदा:- १) रसप्रकार समजावून घेत असताना शृंगार रोद्र, बिभत्स, वीर, हास्य, अद्भूत, करूण, भयानक या भरताने मांडलेल्या आठ रसांची समीक्षकाला माहिती असणे गरजेचे आहे. एखाद्या काव्यात रसाचा आविष्कार झाला आहे की नाही हे समजणे आवश्यक आहे. भरतमुनीनी सांगितलेले आठ सात्त्विक भाव माहीत पाहिजेत उदा :- स्वेद (घाम), स्तंभ (शरीर ताठवणे), रोमांच (स्वर भंग होणे), स्वरभंग, वेप्यू (शरीराला कंप सुटणे) प्रत्यय (निश्चेष्टा पाहून उसळणे) तसेच रसविघ्ने समजली पाहिजेत तरच रसनिष्पती समजेल. म्हणून समीक्षकाने साहित्यातील सर्व संप्रदाय समजून घेतले पाहिजेत. संकोचित वृत्तीचा नाश होऊन, करून सर्वसमावेशक वृत्ती वाढीला लागली पाहिजे. म्हणून साहित्यकृती समजावून घेण्यासाठी विश्लेषकता आणि चिकित्सकता अंगी असणे गरजेचे आहे.

**९. मूल्यविवेक :**

समीक्षकाला एखाद्या कलाकृतीविषयी निर्णय घ्यावा लागतो म्हणून समीक्षकाला 'जीवनमूल्ये व वाङ्मयीनमूल्ये' यांचे ज्ञान असणे गरजेचे असते. जीवनमूल्ये वाङ्मयमूल्यांच्या दृष्टीने पोषक आहेत की नाहीत हे पाहणे आवश्यक आहे. सत्य-शिव-सुंदर ही मूल्ये आहेत. ती त्या काळाच्या पार्श्वभूमीवर तपासावीत उदा : 'साक्षरता प्रसार' हे आजच्या काळाचे मूल्ये आहे. म्हणजेच त्या-त्या काळातील जीवनमूल्ये व वाङ्मयीन मूल्यांचा विचार करणे हे कार्य समीक्षकांचे आहे.

कलाकृती कोणत्या प्रकारातली आहे, त्याचा विचार समीक्षकाने केला पाहिजे. त्यातील सौंदर्यघटक त्याला माहीत असणे आवश्यक आहे. सौंदर्याचे घटक हे वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारावरून बदलत जातात. त्याचा विचार करून समीक्षकाने निर्णय दिला पाहिजे. उदा : १) 'फुलराणी' या कवितेतून समीक्षकाला काय जाणवले, त्यात कोणते घटक आहेत हे त्याने वाचकांसमोर ठेवले पाहिजेत. २) 'मायलेकरं' या दीर्घकाव्यात लेखकांने आपल्या आईविषयी बहिणीविषयी वर्णन केले आहे. पण त्यात कोठेही त्यांच्या म्हणजेच बहिणीच्या गोऱ्या काळेपणाविषयी किंवा आईबद्दल शेण भरते असा उल्लेख नाही. फक्त आईविषयी निव्वळ ममतेची भावना व्यक्त केली आहे. म्हणजेच कलाकृतीतील जे सौंदर्य घटक विद्वानांनी मान्य केले आहेत. ते माहिती पाहिजे. समीक्षेत निर्णय करावा लागतो त्यासाठी काव्यमूल्यांचा विचार घ्यावा लागतो. वाङ्मयीन आस्वाद घेऊन त्याचे मूल्यमापन करण्यासाठी काही तत्त्वे प्रमाण मानावी लागतात. ही तत्त्वे एकदम निर्माण होत नाहीत तर कलाकृतीच्या सूक्ष्म अभ्यासाने, विगमन पद्धतीने तयार होतात. चांगल्या, उत्तम काव्यातील तत्त्वाचा उपयोग इतर काव्यातील परिणामाकरिता होतो. कलाकृतीकडे केवळ वस्तुनिष्ठ वृत्तीने पाहिल्यास या तत्त्वांचा आधार घ्यावाच लागतो. रसग्रहण असो, मूल्यमापन असो या तत्त्वांचा आधार घेतला नाही तर टीका उत्तम होणार नाही. सौंदर्य शोधणे सर्वसामान्यांचे काम नसते. तेथे गुणांचे, सौदर्यांचे संशोधन असते. बौद्धिक कुवतीप्रमाणे मूल्यमापनात फरक पडेल, म्हणून टीकाकाराचा निर्णय हा वैयक्तिक विचारावर अवलंबून असतो म्हणून आपण प्रमाण मानलेली मूल्य योग्य प्रकारे पारखून घेतली पाहिजेत. त्या कलाकृतीकडे कोणत्या दृष्टीने पहावे हे समीक्षक सांगतात. त्याचे उल्लंघन केले तरी फारसा बाधा येत नाही. पण असे करताना त्याने आपला मूल्यविवेक जागृत ठेवून न्यायाधीशाप्रमाणे आपला निर्णय द्यावा इतकेच. हेच समीक्षकाच्या बाबतीत आहे. थोडक्यात समीक्षकाला खडतर साधना करावी लागते.

**९. भाषिकतयारी :**

जे जाणवलं, भावलं ते सांगणे ते सांगताना आपण नेटकेपणाने, नेमकेपणाने बिनचूक, अचूक, वस्तुनिष्ठपणे सांगणे हा गुण समीक्षकाच्या अंगी पाहिजे. यासाठी त्याला भाषिक तयारी करावी लागते. आपला अनुभव मांडत असताना तो सुसूत्र असावा, नेमका असावा म्हणून भाषिक तयारी आवश्यक आहे. रिचर्डस्च्या मते समीक्षकात तीन गुण आवश्यक आहेत. १) ज्या अनुभवांचे आकलन करावयाचे आहे त्यासाठी तो चतुर असावा. त्याच्या ठिकाणी तऱ्हेवाईकपणा असू नये. ज्या पुस्तकाचे परीक्षण करावयाचे आहे त्यास अनुरूप अशी त्याच्या मनाची अवस्था असली पहिजे (मला जे पाहिजे ते मी शोधीन अशी भूमिका नको) जे अनुभव त्याला आलेले असतील त्याच्यातील अंतस्थांचा शोध घेतला पाहिजे. २) तत्त्वाचे किंवा

मूल्याचे स्वरूप योग्य प्रकारे जपण्याचा त्याला अधिकार प्राप्त झाला पाहिजे. टीकाकार ज्याला म्हणून घ्यावयाचे असेल त्याच्या अंगी आणखी एक गुण असावा असे रिचर्डस म्हणतो. तो म्हणजे 'टीकाकाराचे डोके ठिकाणावर असले पाहिजे'.

**सारांश :**

समीक्षकाला वरीलप्रमाणे खडतर साधना करावी लागते. समीक्षक हा सर्जनशील कलावंत असतो. त्याने आपली समीक्षा निर्दोष व्हावी, याची खबरदारी घेतली पाहिजे. लेखकाच्या कलाकृतीचा त्याने समीक्षा मूल्यांच्या आधारे चिकित्सक अभ्यास केला पाहिजे. हे सर्व आपणाला वरील विस्तृत विवेचनावरून लक्षात येईल.

***

## वाङ्‌मयीन समीक्षेची पथ्ये

साहित्यकृतीचे समीक्षण करत असताना समीक्षा विषयाचे अवधान व तारतम्य असावे लागते तरच समीक्षा ही निकोप होईल. तिच्यामध्ये दोष आढळणार नाही. समीक्षकाने जो विषय निवडला आहे त्या संदर्भात कोणते निकष लावावेत. समीक्षा विषय कोणता आहे. तसेच ती साहित्यकृती कोणत्या कालखंडातील आहे याचा काळानुरूप विचार करणे आवश्यक आहे. तसेच कालखंड पाहाताना ती कलाकृती स्वातंत्र्योत्तर काळातील आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे याचे समीक्षकाने तारतम्य, भान ठेवले पाहिजे. तसेच वाङ्‌मयप्रणाली कोणत्या, हे ही त्याला माहीत पाहिजे. उदा : 'संगीत शारदा' हे गो. ब. देवल यांचे नाटक आहे. त्यामध्ये संगीत पदे आहेत. परंतु आताच्या नाटकामध्ये पद्यमय रचना नाही तसेच संगीत आपणाला दिसत नाही. म्हणून आपण आताची नाटके हलकी फुलकी मानायची का? किंवा जुन्या नाटकाचे निकष नव्या नाटकांना लावायचे का? थोडक्यात कालखंडाप्रमाणे कलाकृतीत बदल होतो. २) गो. ब. देवल यांचे 'संगीत संशय कल्लोळ' यात संगीत आहे, पदे आहेत म्हणून ते श्रेष्ठ आणि जयवंत दळवी यांचे 'बॅलिस्टर' हे कनिष्ठ समजायचे का? तर ज्या त्या काळात निकष हे बदलत असतात.

उदा : 'पाचोळा' या कांदबरीमध्ये खलनायक प्रत्यक्षात भेटत नाही गरड हा आपणाला पडद्यामागील खलनायक वाटतो. पूर्वी खलनायकाला महत्त्व होते. परंतु आता खलनायकाला महत्त्व नाही. तर यांत्रिकता, आधुनिकता या ठिकाणी औद्योगिकीकरण महत्त्वाचे आहे. म्हणजेच पूर्वीची खलनायकाची जागा यांत्रिकीकरणाने, औद्योगिकीकरणाने घेतली आहे. म्हणून आपणाला पूर्वीचे निकष लावता येणार नाही. समीक्षकाने जो विषय निवडला आहे त्याविषयीची तत्त्वे निश्चित करावीत. जुन्या मूल्यांच्या आधारे नवीन साहित्यकृतीचे मूल्यमापन करू नये. पूर्वी अलंकार, रीती, वक्रोक्ती, अतिशयोक्ती, औचित्य यांच्याआधारे साहित्यकृतीचे मूल्यमापन व्हायचे. परंतु आता त्या मूल्यांना म्हणावे तितके महत्त्व उरले नाही. कलाकृतीला केवळ गुणदोषाचे निकष लावू नयेत किंवा फक्त कलाकृतीचे गुणदोषच दाखवू नयेत. म्हणजेच कलाकृतीबाबत शेरेबाजी पोपटपंची करण्याची गरज नाही. साहित्य समीक्षेत जी काही मूल्ये आहेत त्यांच्या आधारे त्या साहित्यकृतीचे समीक्षण करणे आवश्यक आहे. कोणत्या मूल्यांमुळे

कलाकृती श्रेष्ठ ठरली, हे पाहणे आवश्यक त्या-त्या काळात कलाकृती श्रेष्ठ का ठरल्या, याचे भान समीक्षकाला पाहिजे.

उदा :- आता साहित्यात 'वास्तवता' हे मूल्य आहे. पूर्वी सत्य, शिव, सुंदर ही मूल्ये होती. मधू मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी' आणि जयवंत दळवी यांची 'चक्र' ही कादंबरी. यामध्ये त्यांनी झोपडपट्टीचे जीवन दर्शन रेखाटले आहे. वास्तवता सांगितली आहे. म्हणजेच आताच्या परिस्थितीत 'वास्तवता' हेच तत्त्व, मूल्य साहित्यात प्रस्तापित झाले आहे. म्हणजेच त्या-त्या कालखंडाच्या आधारे व त्या काळात जी तत्त्वे प्रस्थापित झाली आहेत, त्यांच्या आधारे त्या कलाकृतीचे मूल्यमापन करणे हितावह ठरेल.

तसेच समीक्षकाची अभिरूची उच्च दर्जाची पाहिजे तरच तो कलाकृतीला योग्य न्याय देईल.

उदा : 'रामायण', 'महाभारत' याकडे आपण धार्मिक ग्रंथ म्हणून पाहतो आणि जर ते ग्रंथ आपणाला आवडले तर आपण म्हणतो या ग्रंथासारखे दुसरे ग्रंथ निर्माण होणे नाही. या ठिकाणी आपल्या हे लक्षात येते की? तो समीक्षक हा अभिरूची संपन्न नाही, धर्माने पछाडलेला आहे पण यापेक्षाही अनेक श्रेष्ठ कादंबरी, नाटके आहेत. त्यांच्यामध्ये धार्मिक विषय नाहीत. म्हणून त्या कलाकृती श्रेष्ठ नाहीत का? आणि ज्यावेळेस समीक्षक आजच्या कलाकृतीपेक्षा रामायण किंवा महाभारत श्रेष्ठ आहे असे म्हणतो त्या अर्थी तो समीक्षक एकांगी आहे. यांचा अर्थ तो अनियंत्रित समीक्षक आहे. त्याला स्वत:चा तोल सावरता येत नाही. ज्या समीक्षकाला आस्वाद, मूल्यमापन करावयाचे आहे त्याने अनेक कलाकृती अभ्यासून त्यातील सारखेपणा शोधला पाहिजे व त्यातून एक तत्त्व शोधले पाहिजे.

उदा : एकनाथ, मोरोपंत या सारख्यांच्या काव्यात गेयता होती. म्हणजेच समीक्षकाने वैयक्तिक आवड-निवड बाजूला ठेवली पाहिजे. त्यापेक्षा वस्तुनिष्ठता महत्त्वाची आहे. कलाकृतीचे ज्यावेळेस आपण मूल्यमापन करतो. त्यावेळेस त्यातील तत्त्व सर्वांना आवडले पाहिजे. अपवाद एखादा असेल, प्राचीन समीक्षक वामन, दण्डी, भरतमुनी, कुंतक, क्षमेंद्र या सर्वांनी साहित्याच्या श्रेष्ठपणाविषयी काही गुण शोधले. सर्वांना व्यंजना / व्यंगार्थ महत्त्वाचा वाटला. सूचकतेला त्यांनी महत्त्व दिले. म्हणजेच समीक्षा करत असताना काही जुन्या अभ्यासकांनी, काही निकष सांगितले आहेत.

साहित्यात जी तत्त्वे मांडली आहेत. त्यांचा आधार घेऊन समीक्षण करावे. जुन्या साहित्य अलंकाराचा आधार वस्तुनिष्ठपणे घ्यावा तर तो आधार आत्मनिष्ठ पातळीवर नको. मला काय वाटते या प्रमाणे समीक्षण नको किंवा मीच शहाणा मलाच सर्व काही समजते या पद्धतीने समीक्षण नको. उदा : औचित्य तत्त्व स्वीकारणे योग्य आहे म्हणूनच त्याचा विचार झाला पाहिजे.

कलाकृतीचे आकलन, आस्वाद यांचा वस्तुनिष्ठतेने विचार केला पाहिजे.

उदा :- प्लेटोने सत्य हा सौंदर्याचा पाया मानला हे समीक्षकाला माहीत पाहिजे. नुसत्या सौंदर्याला त्याने महत्त्व दिले नाही. ॲरिस्टॉटलने काही जुनी तत्त्वे सांगितलेली आहेत. याचाही विचार झाला पाहिजे (भाव विरेचन) पण समीक्षा करत असताना केवळ जुन्याच तत्त्वाना चिकटून बसता कामा नये तर नव्या आणि जुन्या तत्त्वांचा सुंदर मेळ/समन्वय घातला पाहिजे.

साहित्यकृतीला पूर्वी जे निकष लावले जात होते ते आजच्या साहित्याला उपयोगी पडतीलच असे नाही. समीक्षा करताना किंवा समीक्षेत साहित्य शास्त्रात जे काही निकष आले आहेत, ते माहीत पाहिजे.

समीक्षक हा जिज्ञासू, बुद्धिमान व अभ्यासू पाहिजे उदा:- सॉनेट हा काव्य प्रकार शिकवायचा असेल तर त्याला शेक्सपिअर अभ्यासला पाहिजे.

समाजजीवन जसे बदलते तसे साहित्य ही बदलत असते उदा :- एकच मूल्य त्रिकालाबाधित सत्य होऊ शकत नाही. उदा :- आईची थोरवी सांगत असता तिची आणि तिच्या मुलाची नाळ जोडलेली असते तिचे त्यावर जीवापाड प्रेम असते पण आताची आई ही चैनीवृत्तीची आहे. हे देखील त्याने परखडपणे सांगायला हवे.

उदा: पूर्वी साहित्यात परोपकाराची मूल्य होती. आता भष्ट्राचाराची मूल्य साहित्यात रूढ होऊ पाहात आहेत. म्हणजेच जुन्या मूल्यांचा नाश होवून नवी मूल्य प्रस्थापित होतात. परंतु काही पाश्चात्य देशात लोक जुन्या मूल्यांकडे जावू पाहात आहेत. म्हणजेच जुन्या मूल्यांचा नाश होवून नवी मूल्ये प्रस्थापित होतात. म्हणजेच समाजात काळाच्या ओघात परिवर्तन होते. परंतु काही वेळेस मधल्या काळातील ही मूल्य लागू होतात.

म्हणजेच एखाद्या साहित्यकृतीचे समीक्षण करत असताना समीक्षकाने त्या-त्या काळाचा विचार केला पाहिजे. समीक्षकांची बहिरंगापुरतीच मर्यादित दृष्टी असता कामा नये. उदा: पुस्तक पाहताना फक्त त्याचे कवर, त्यावरील चित्र किती छान आहे अशा प्रकारची दृष्टी नको आहे. तर समीक्षकाने त्या पुस्तकातील अतरंग समजून घेतले पाहिजे.

उदा : साहित्यात पूर्वी ओजस गुणाला फार महत्त्व होते. वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे यांच्या साहित्यात आपणाला हा गुण दिसून येतो. त्यांच्या लिखाणात लांब पल्ल्याची वाक्ये, थोड्याशा शैलीदार पद्धतीने मांडलेली असत. परंतु आता दलित साहित्यात, ग्रामीण साहित्यात हा गुण आपणाला दिसत नाही. प्रखर वास्तवता दिसते. मग आपण हे साहित्य निकृष्ठ मानायचे का? पण समीक्षकाने किंवा आपण आजच्या काळाचा विचार केला तर हा गुण किंवा मूल्य या ठिकाणी योग्य वाटते. उदा : 'पाचोळा' मधील भाषाशैली पाहिल्यानंतर आपल्या हे लक्षात येईल की, आताच्या साहित्यात वास्तवता कशी सांगितली आहे. या ठिकाणी कोणतीही अलंकारिक

भाषा नाही.

उदा : बरं चाललं होतं, कुणाचं एक नव्हत की दोन नव्हतं किंवा 'श्यामची आई' या पुस्तकातही लिखाणात साधेपणा आहे. येथे जर आपण ओजस गुणाचा शोध घ्यावयाचे ठरविले तर ते शक्य नाही. म्हणजेच पूर्वी ध्वन्यार्थाला, सुचितार्थाला, महत्त्व होते. परंतु आता साहित्यात वास्तवता हे मूल्य रूढ झाले आहे.

व्यवहारातील फुटपट्ट्या समीक्षेत उपयोगाच्या नाही तर त्यासाठी तारतम्य ठेवावे. कारण साहित्याचे निकष हे काळाप्रमोणे बदलत असतात. नव्या जुन्या मूल्यांचा संगम व्यवहारात आहे. तसेच साहित्यातही तो विचार झाला पाहिजे.

उदा : नऊवार साडी किंवा सहावार साडी याला आपण मीटर म्हणत नाही.

काणेतीही तत्त्वे अबाधित नसतात तर ती काळाच्या ओघात बदलत असतात. तेव्हा समीक्षकाने सर्व मान्य मूल्यांच्या आधारे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. समीक्षकाजवळ एकांगीपणा नको. उदा : पूर्वी टिळक, आगरकर यांचे चरित्र लिहिले जायचे. परंतु आता सर्वसामान्य व्यक्तीची चरित्रे लिहिली जातात. प्रत्येक कलाकृतीचे समीक्षण करत असताना प्रत्येकाला एकच निकष लावता येणार नाही उदा:- मोरोपंत आणि बा. सी. मर्ढेकर यांना कोणतेही निकष लावून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ म्हणता येणार नाही. तर कालखंडांचा विचार आवश्यक आहे.

समीक्षकाचा दृष्टिकोण हा सर्वसमावेशक पाहिजे. समीक्षकाजवळ वस्तुनिष्ठपणा पाहिजे. हे सर्व निकष डोळ्यासमोर ठेवून, तारतम्य ठेवून समीक्षण झाले पाहिजे. उदा : मार्क्सवादी तत्त्वामध्ये, विचारसरणीत मालक-मजूर संबंध आहे. म्हणून ते कनिष्ठ असेही म्हणू नये. उदा : रामायण, महाभारतात हे प्रकार नाहीत म्हणून ते श्रेष्ठ असेही नाही. तर सर्व साहित्यप्रकार आहेत. त्यांची वेगवेगळी तत्त्वे आहेत. निकष आहेत त्या आधारेच त्यांचे मूल्यमापन झाले पाहिजे. वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये यांचाही विचार झाला पाहिजे.

**समीक्षकाने पाळावयाची पथ्ये :**

१. समीक्षा विषयाचे अवधान व तारतम्य
२. निकषाचे तारतम्य
३. व्यक्तिनिष्ठता व वस्तुनिष्ठता यांचे तारतम्य
४. मांडणी आणि शैली या संबंधी प्रस्तृत अप्रस्तृतविवेक
५. सुसंगती आणि सुसूत्रता यांचे भान
६. नेमकेपणा, स्पष्टपणा, तार्किकता या संबंधीचा विवेक.

**१. समीक्षाविषयाचे अवधान व तारतम्य :**

समीक्षकाने साहित्यकृतीच्या गुणदोषाचे विवेचन चालू असता केवळ अनुकूल

किंवा प्रतिकूल अशा वैयक्तिक अभिप्रायापेक्षा काही महत्त्वाची तत्त्वे त्या साहित्य कृतीत आली आहेत किंवा नाहीत हे पाहणे आवश्यक आहे. म्हणजेच ज्याची समीक्षा करावयाची आहे. त्याचे भान समीक्षकाला ठेवणे जरूरीचे आहे.

उदा :१) 'संगीत शारदा' या गो. ब. देवलांच्या नाटकाचे समीक्षण, परीक्षण करत असताना त्या नाटकांची निर्मिती प्रक्रिया, तसेच ते नाटक केव्हा प्रकाशित झाले किंवा १०० वर्षा पूर्वीचा काळ कसा होता तसेच या नाटकाचा विषय कोणता आहे. हे पाहणे आवश्यक आहे.

२) पूर्वी स्त्रिया 'सती' जात असतं किंवा समाजाच्या दडपणाखातर हे त्यांना करावे लागत असे हे पाहताना तो काळ कोणता होता, त्याचा विषय काय आहे हे भान ठेवणे आवश्यक आहे.

३) 'रामायण' किंवा 'महाभारत' हे ग्रंथ पाहताना समीक्षकाने त्या काळच्या परिस्थितीचे अवधान ठेवले पाहिजे. कालखंड, त्याचा विषय काय आहे, हे समजून घेतले पाहिजे. किंवा नलदमंयती यांचे प्रेम लेखकाने वर्णन केले आहे. तेव्हा त्याचा विषय कोणता आहे? हे तारतम्य समीक्षकाने ठेवले आहे. म्हणजे निर्मिती, काळ, त्यावेळची साहित्य परिस्थिती, संकेत, रूढी तसेच त्याचा विषय कोणता आहे? हे समीक्षकाला समजले पाहिजे.

४) 'अमृतवेल' मध्ये वि. स. खांडेकरांनी माणसांच्या जीवनामध्ये अनेक दु:खावर दु:ख आणि एका पाठोपाठ एक संकट येत असतात. त्या संकटावर कशा पद्धतीने मात केली आहे, हा विषय या ठिकाणी महत्त्वाचा आहे. अलकनंदाला इतर मैत्रिणी भेटतात किंवा ती पीएच. डी. चा अभ्यास दासबाबूजवळ जाऊन करते हे या ठिकाणी महत्त्वाचे नाही. किंवा बा. भ. बोरकर यांची 'भावीण' ही कांदबरी आहे. यात त्यातील समस्या कोणत्या आहेत म्हणजेच विषय भाविणीचा असो की जोगतीणीचा: त्यातून काय प्रतीत झाले आहे हे समीक्षकास तारतम्याने आणि विषयाचे भान ठेवून पाहणे आवश्यक आहे.

५) स्वातंत्र्यपूर्व काळात 'निबंध' हा वाङ्मय प्रकार प्रसिद्ध होता. कारण त्यावेळची परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे. या काळात समाजात जागृती घडवून आणावयाची होती. साक्षरता प्रसार करावयाचा होता. लोकांना रूढी, परंपरापासून सोडवयाचे होते. मग साहजिकच निबंधात प्रचारकी येणारच. मग तो निकृष्ठ कसा होऊ शकेल आणि त्या काळात निबंध हा वाङ्मयप्रकार फार जोरकस बनला होता. जुन्या काळात हा प्रचार करणे आवश्यक होते हे समीक्षकाला मांडता आले पाहिजे. यासाठी त्या विषयाचे भान व तारतम्य आवश्यक आहे.

समीक्षेला भारदस्तपणा प्राप्त करून द्यावयाचा असेल तर वैयक्तिक मतापेक्षा विश्वसनीय मूल्यांचा त्याने आधार घेणे आवयक आहे. अमूक नाटक चांगले नाही किंवा अमुक कांदबरी रद्दी आहे, असे शेरे मारणे म्हणजे टीका नाही. तर साहित्य

समीक्षेत ज्यांना मूल्ये म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अशा तत्त्वांचा त्याने तारतम्य भावाने विचार करणे आवश्यक आहे. समीक्षकांची अभिरूची ही उच्च दर्जाची असावी लागते. ''राजा शिवाजी'' या महाकाव्यापेक्षा 'रामायण' व 'महाभारत'ही महाकाव्य शतपटींनी श्रेष्ठ आहेत. असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा केवळ अनियंत्रित अभिरूची या आपल्या निर्णयाच्या मुळाशी असते. हे मान्य करणे महत्त्वाचे आहे.

वाङ्मयाचा आस्वाद घेवून त्याचे मूल्यमापन करणे यासाठी अनेक कलाकृतीना सारखेपणाने लावता येतील अशी काही तत्त्वे टीकाकाराने प्रमाण मानलीच पाहिजेत. वैयक्तिक आवडी-निवडीपेक्षा कलाकृतीकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहावयाचे असेल तर काही प्रस्थापित तत्त्वांचा आधार घेणे आवश्यक आहे.

तसेच जुन्या साहित्यात क्षेमेंद्राने औचित्य भंग हा दोष दाखविला आहे. हा आजच्या समीक्षकालाही उपयोगी पडणारा आहे. प्लेटोने काव्यातील सत्य या कल्पनेला महत्त्व दिले. ॲरिस्टॉटल सारख्या शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या निकषाचा तारतम्याने विचार झाला पाहिजे. या सर्वासाठी समीक्षकाचे डोके जाग्यावर असणे आवश्यक आहे. तरच त्याला विषयाचे अवधान व तारतम्य टिकवता येईल.

**सारांश :**

आपण ज्या वाङ्मयप्रकारची समीक्षा करत आहोत त्याचे ज्ञान समीक्षकास पाहिजे. नाटक, कांदबरी, कथा, चरित्र हे समीक्षकास समजले पाहिजे. तो काळ कोणता होता, विषय कोणता आहे हे पाहून समीक्षा झाली पाहिजे.

**२. निकषांचे तारतम्य :**

समीक्षकाने एखाद्या साहित्यकृतीचे समीक्षण करत असताना निकषांचे तारतम्य बाळगले पाहिजे. जुन्या कांदबरीला किंवा नाटकाला नव्या कांदबरी किंवा नाटकाचे निकष लावू नयेत. कारण जुन्या वाङ्मयप्रकाराला नवीन निकष लागू पडतीलच, असे नाही.

साहित्यामध्ये शिव, सुंदर, सत्य ही तत्त्वे मान्य केली आहेत. त्यात वास्तववादाचा विचार आला आहे. त्या ठिकाणी रूढी, परंपरा किंवा धार्मिकता विचारात घेतली गेलेली नाही. तर त्या ठिकाणी गेयता, अश्लीलता, दुर्बोधता का आली हे पाहणे इष्ट आहे. उदा :- 'पिपात मेले ओले उंदीर' अशा प्रकारची दुर्बोधता का आली हे पाहणे आवश्यक आहे.

पूर्वी कोणत्याही कलाकृतीचा शेवट गोड केला जात असे. उदा : शेक्सपियरची नाटके पण आताच्या कलाकृतीचे तसे केले जात नाही. तर याचा अर्थ हे चूक का? तर त्या ठिकाणी निकषांचे तारतम्य ठेवणे आवश्यक आहे. कारण सहाजिकच काळाच्या ओघात मूल्य ही बदलत असतात. म्हणून निकषही काळाच्या ओघात बदलत जातात. तेव्हा हे तारतम्य आवश्यक आहे.

तसेच क्षेमेंद्राने औचित्य भंग हा दोष सांगितला आहे. आजच्या समीक्षकालाही तो उपयोगी पडणारा आहे. प्लेटोने सत्य या तत्त्वाला महत्त्व दिले. ॲरिस्टॉटल सारख्या जुन्या साहित्य शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या निकषांचा तारतम्याने समीक्षकाने विचार करणे आवश्यक आहे. परंतु केवळ जुन्या मूल्यांना चिकटून बसून त्याच्या अनुरोधाने साहित्याचे मूल्यमापन केल्यास काही घोटाळे निर्माण होण्याचा संभव आहे. म्हणून त्या-त्या काळातील साहित्याला जे निकष उपयुक्त ठरतीलच असे नाही. शिवाय समीक्षा शास्त्रात आजच्या काळात अधिक भर पडल्यामुळे काही नवीन निकषही निर्माण झाले आहेत. या सर्वांचा समीक्षकाने अभ्यास केला पाहिजे. जुन्या काळातील निकषाचा इष्ट असेल तेवढाच भाग त्याने ग्राहय मानावा. गैरलागू भाग सोडून दयावा. ॲरिस्टॉटलने आपली तत्त्वे त्या काळात प्रणित केली ती त्या काळाच्या दृष्टीने उचित होती. त्याने काव्याच्या बहिरंगापुरतीच मर्यादित दृष्टी ठेवली होती. पण केवळ तेवढाच व बहिरंगाचा विचार आजच्या काळात उपयोगी पडणार नाही.

## ३. व्यक्तिनिष्ठता व वस्तुनिष्ठता यांचे तारतम्य :

समीक्षकाने एखाद्या कलाकृतीचे समीक्षण करीत असताना त्याने वैयक्तिक मतांचा अवलंब न करता सर्वांगीण दृष्टिकोणातून विचार केला पाहजे. साहित्यात जी मूल्य किंवा तत्त्वे मांडली आहेत. त्यांच्या आधारे कलाकृतीचे समग्र मूल्यमापन केले पाहिजे त्या ठिकाणी व्यक्तिनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठपणाने आणि विवेकबुद्धीने विवेचन केले पाहिजे. म्हणजे मला काय वाटते यापेक्षा आपण समीक्षण करताना हे तत्त्व सर्वांना भावले आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी स्वत:चा विचार करायला नको. नाहीतर ती टीका एकांगी झाल्याशिवाय राहणार. उदा :- जुन्या पिढीतील एखाद्या माणसाने म्हटले की अलीकडील मुले कार्यक्षम नाहीत, चांगली नाहीत. पण पूर्वी सातवी शिकल्यानंतरही नोकरी मिळत होती. परंतु आता एम. ए. झाले तरी नोकरी मिळत नाही. तेव्हा या ठिकाणी समीक्षकाने जुन्या माणसाचेच मत प्रमाण मानू नये तर त्याने जर अशा पद्धतीने मत मांडले तर त्या ठिकाणी त्याची अभिरूची हीन दर्जाची वाटेल. म्हणजेच त्याने जुन्यालाही चिटकून बसता कामा नये. नव्या-जुन्याचा मेळ घातला पाहिजे. यासाठी समीक्षकाजवळ विवेकबुद्धी पाहिजे. यासाठी समीक्षकाने वस्तुनिष्ठपणे विचार करणेच योग्य ठरेल.

## ४. मांडणी आणि शैली या संबंधी प्रस्तृत अप्रस्तृत विवेक :

समीक्षक ज्यावेळेस एखाद्या कलाकृतीचे समीक्षण करत असतो. त्यावेळेस त्याने समग्रपणे विचार करून त्या कलाकृतीचे परीक्षण केले पाहिजे. समीक्षकाला कलाकृतीतून जे काही भावले आहे ते सुसंगतपणे मांडले पाहिजे. समीक्षकाने त्या

कलाकृतीची मांडणी करीत असता त्याची भाषा शैली ही महत्त्वाची आहे. उगीच वाचकाला संभ्रम होईल अशीही भाषा वापरू नये.

समीक्षण करत असताना समीक्षकाने वाचकावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कारण पुन्हा ते समीक्षण वाचकापर्यंत गेले पाहिजे आणि ते समीक्षण जर साध्या सोप्या भाषेत असेल तरच ते वाचकाला भावेल.

समीक्षकाने उगीच पांडित्य प्रदर्शन करू नये. आपण जे काही मांडले आहे ते सर्व सामान्यांना, इतरांना समजले पाहिजे अशा पद्धतीने समीक्षण केले पाहिजे.

**५. सुसंगती आणि सुसूत्रता यांचे भान :**

समीक्षकाने एखाद्या वाङ्मयप्रकारचे समीक्षण केल्यानंतर ती मांडणी सुसंगत केली पाहिजे. उदा :- एखादा कांदबरीकार निसर्ग विषय आपली मते मांडत असताना एखाद्या प्रादेशिक कांदबरीत निसर्ग एकरूप होवून आला आहे. दुसऱ्या ठिकाणी नायिकेचा निसर्गाशी संबंध नाही. असे म्हणून चालणार नाही. कारण त्या ठिकाणी दोन्हीही गोष्टींचा सुसंगतपणे विचार झाला पाहिजे. तसेच समीक्षकाने समीक्षण करत असताना वैयक्तिक संबंध लक्षात घेतले जावू नये.

उदा : एखाद्यी मुलगी नकटी आहे तिला नकटी म्हटली पाहिजे. उगीच सरळ नाक असते तर बरे असते असे नको. तर त्या ठिकाणी नेमकेपणा आवश्यक आहे.

**६. नेमकेपणा, स्पष्टपणा, तार्किकता या संबंधीचा विवेक :**

समीक्षकाने कलाकृतीचे समीक्षण करत असताना नेमकेपणाने आपली मते मांडली पाहिजेत. उदा : स्वयंपाक छान झाला आहे पण बायको सुगरण असती तर छान झाले असते. थोडक्यात ती सुगरण नाही हे त्याला सांगायचे आहे. पण हे सरळ अर्थाने सांगितले तर ते लवकरच सर्वांना भावेल.

म्हणजेच आपल्याला जे सांगायचे आहे ते नेमकेपणाने मांडले पाहिजे.

१) शर्ट चांगला आहे पण जरा मोठा शिवलाय. या ठिकाणी तो शोभत नाही हे नेमकेपणाने सांगितले पाहिजे. आपण जे मांडत आहोत ते तार्किकपणे मांडले पाहिजे. आपण समीक्षाद्वारे जे काही मांडले आहे. ते आपल्या बुद्धीला पटले आहे का? हे पाहणे गरजेचे आहे.

२) रामायण, महाभारत या महाकाव्याचा विचार करताना रावण ही व्यक्तिरेखा दुष्ट आहे. पण रावणाची भूमिका त्या व्यक्तीने किती प्रभावीपणे रेखाटली आहे. हे पाहणे आवश्यक आहे. रावण वाईट असेल तर भूमिका करणारा वाईट नसेल. तर त्या कलाकृतीच्या नायक आणि नायिका कशा असाव्या हे तर्क असावे. यासाठी याचा विवेक ठेवला पाहिजे. आपण जे मांडणार आहोत त्याचे खंडन होणार नाही हे पाहणे आवश्यक आहे.

***

## १. वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये यांचा परस्पर संबंध

वाङ्मय आणि जीवन यांच्या परस्पर संबंधाची चर्चा करताना वाङ्मय हे फक्त जीवनासाठीच आहे आणि वाङ्मय ही एक कला आहे. कला ही फक्त कलेकरिताच आहे असे दोन सिद्धांत पुढे आले.

जीवनमूल्यांचे आपणाला चार प्रकारे वर्गीकरण करता येईल. १. आर्थिक २. राजकीय ३. धार्मिक ४. सामाजिक समाजाचे चार वेगळे विभाग कल्पिता येतील. यांचा प्रत्येकाशी घनिष्ठ संबंध आहे. एकेकाळी (पूर्वी) समाजात प्रौढ विवाह, साक्षरता प्रसार ही मूल्य मानली गेली होती. धर्मकारणात शिवम् सारखी मूल्य मानली गेली होती. धार्मिकतेच्या बाबतीत साहित्याचा विचार केला तर साहित्यात केवळ चांगुलपण, नीती किंवा जनकल्याण या गोष्टीचे जर काही चित्रण झाले तरच ते चांगले समजले जात होते. उदा :१) प्लेटो या शास्त्रज्ञाने तर चक्क आपल्या राज्यातून कवींची आणि लेखकांची हकालपट्टी केली होती. त्यांच्यामते ज्यातून काही धार्मिक, देव देवताविषयी साहित्य असेल तेवढेच चांगले. बाकी प्रकारच्या साहित्यातून अनिष्ठ असे परिणाम घडतात. म्हणजेच शिवम म्हणजे ज्याला जे पाहिजे ते आचरण करा. सर्वांचे जनकल्याण होईल या दृष्टीने धार्मिकतेला महत्त्व होते. शिवम्‌ला महत्त्व होते.

**२. आर्थिक** - अर्थकारणात मूळच्या स्वामित्वाचे मूल्य मानण्यात आले होते. अर्थकारणात स्वामित्वाची कल्पना होती. २) भांडवलदार मजूर यांचा संघर्ष यामध्ये मजूरांवर भांडवलदार वर्गाचे वर्चस्व होते. तसेच पती हाच परमेश्वर म्हणजे पती कसा असला तरी देवासमान मानणे. परंतु आता समानतेचा विचार आला आणि स्वामित्वाची ही कल्पना बदलली आहे. आजही मालक आणि मजूर हा संघर्ष आहे. पण सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे त्यात थोडेफार बदल झाले आहेत.

**३. राजकारण** - राजकारणात लोकशाही, राजेशाही अशी मूल्य मानली

गेली. स्थलकालपरत्वे यांचे स्वरूप बदलत गेले. परंतु आता स्वार्थासाठी राजकारण केले जाते. पूर्वी स्वार्थासाठी राजकारण करण्याची पद्धती नव्हती. जीवनमूल्ये ही स्थलकालपरत्वे बदलतात. म्हणजेच जीवनमूल्य ही स्थलकालबद्ध असतात. त्या-त्या काळाशी बांधलेली असतात. उदा : पूर्वी बलिदान करणारे क्रांतिवीर होते. गांधीजी सारखे महापुरुष होते. त्यांच्यात त्यागाची भावना होती. परंतु आता आपणाला क्रांतिवीर, त्यागी असे राजकारणी किंवा विचारांचे स्वातंत्र्य असणारी व्यक्ती राजकारणात दिसणार नाही. तर सर्वत्र स्वार्थी राजकारण दिसेल.

**४. सामाजिक :** आता आपणाला समाजात स्वार्थाची भावना पाहावयास मिळेल. अनीती पाहावयास मिळेल. आताची मूल्ये स्वार्थाची आहेत. स्वकल्याणाची आहेत. थोडक्यात सामाजिक स्थिती आता कोलमडून पडली आहे. म्हणजे जीवनमूल्य शाश्वत नाहीत. काळाच्या ओघात ती बदलतात. अशाप्रकारे जीवनमूल्य ही स्थलकालबद्ध असतात. विशिष्ट सामाजिक परिस्थितीत त्यांचे महत्त्व असते. पुढे त्यांना श्रद्धेचे स्वरूप प्राप्त होते. ही मूल्ये किंवा रूढी इतक्या प्रभावी बनतात की, त्यांचा आविष्कार करणारे वाङ्मय हे वाङ्मयच ठरत नाही.

२. जीवनमूल्यांचे निष्कर्ष वाङ्मयीन मूल्यमापनास उपयोगी पडत नाही. उलट काही वेळा जीवनमूल्ये कलावंताच्या निर्भेळ निर्मिती प्रक्रियेला अडथळाच आणतात. म्हणून आमक्या सामाजिक मूल्यांचा मी प्रचार करीत आहे असे म्हणून कलावंताने निर्मिती करू नये. तसेच विशिष्ट जीवनमूल्य त्या कलाकृतीत नाहीत म्हणून ती कलाकृती निकृष्ठ असेही मानू नये. कारण विशिष्ट समाजव्यवस्थेतील जीवनमूल्य कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी व आस्वादासाठी अपुरी पडतात.

३. जीवनमूल्याच्या जपवणुकीसाठी अभिजात वाङ्मयीन मूल्यांची अवहेलना करू नये. कारण त्यामुळे कलेचे स्वरूप प्रचारकी बनेल. उदा : हरिभाऊच्या कादंबऱ्या यामध्ये स्त्री-पुरुष समानता दाखवताना सामाजिकतेचा विचार आला आहे. किंवा महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा ही मूल्य मानली होती. परंतु यांच्यासाठीच फक्त लिखाण झाले तर ते प्रचारकी ठरेल, बाजारू ठरेल. साहित्यातून असा विचार कळत नकळत आला तर चालेल. केवळ ध्येयवादासाठी साहित्य नको.

४. कोणत्याही एका विशिष्ट सामाजिक जीवनमूल्यातून वाङ्मयकलेची निर्मिती करणे उपयोगाचे नाही. म्हणजे कलेचे मूल्यमापन करत असताना वाङ्मयीन मूल्याकडे पाहणे आवश्यक आहे. तसेच त्यात सामाजिक मूल्यांच्या आधारे त्या कलाकृतीचा दर्जाही ठरविणे उपयोगी नाही. कारण कलाकृतीचे मूल्यमापन करताना जीवनमूल्य असमर्थ ठरतात. म्हणून कलाकृतीची मांडणी महत्त्वाची आहे. आशय आविष्कार कसा झाला आहे, तसेच त्यातील रचना वैशिष्टये महत्त्वाची असतात. नुसती कलाकृती श्रेष्ठ असून उपयोगी नाही.

५. प्रतिभावंत, कलावंत हा मानवी जीवनाच्या अंतिम सत्याचे दर्शन घडवितो. त्याला सामाजिक मूल्यांचे बंधन नसावे. त्याने वाङ्मयीनमूल्ये पाळली की, त्याला त्यातून योग्य निवड करून काही मूल्ये पाळता येतील व त्याला त्यातून निर्मिती करता येईल. ही पाळलेली मूल्ये अर्थात जीवनात अंतिम शाश्वत असतात त्यांची त्याने भक्ती करावी.

६. वाङ्मयीन मूल्ये व्यावहारिक व सामाजिक मूल्यांहून स्वतंत्र असावीत. मात्र जीवनाच्या अंतिम मूल्यांशी एकरूप होऊन वाङ्मयातून भावसत्याचे दर्शन घडवित घडवित "ब्रह्मानंद सहोदर" आनंद देत-देत कलाकृतीने परिपूर्णत : राखावी. अर्थात जाता-जाता तिने सामाजिक मूल्याची कदर करावी. उदा : 'थँक यू मिस्टर ग्लाड' या बर्वेच्या कादंबरीचे उदाहरण घेता येईल. वीरभूषणला त्याची बायको भेटायला येते. ती अनवाणी येते. मूल रडत असते. त्यावेळेस ग्लाड साहेबांनाही गहिवरून येते. तसेच ती पती सुटकेसाठी याचना करत नाही. तर घटना म्हणून यातील सामाजिकतेतून आपणाला हे सांगता येईल की, ती देशासाठी अनवाणी फिरते. स्वतःचे मूल रडत असतानाही, हे यातील वाङ्मयीन मूल्य होय.

७. विशिष्ट तत्त्वाबद्दल, मतप्रणालीबद्दल अभिमान घट्ट धरून वाङ्मयाकडे पहावे. खऱ्या अर्थाने वाङ्मयीन मूल्यांचा व जीवनमूल्यांचा कोणी संबंध लावून दाखविला तर खऱ्या रसिकाला अगर टीकाकाराला आनंद होईल. कलेच्या क्षेत्रात काय किंवा जीवनाच्या क्षेत्रात काय मूल्ये असावी लागतात, या मूल्यांनी एकमेकांशी सुसंगत वागावे. कलामूल्यांनी जीवनमूल्यापायी आपली गळचेपीही होऊ देऊ नये.

८. जीवनमूल्ये वाङ्मयीन दृष्टीने विचारात घ्यावी की नाहीत. साहित्यातील व जीवनातील 'सत्यम-शिवम्-सुंदरम् ही जीवनमूल्ये ही रूपे देखील शाश्वत मूल्य धारणा करताना दिसतात. जीवनातील सत्यम्-शिवम्-सुदंरम् आणि साहित्यातील सत्यम-शिवम्-सुंदरम् यांची रूपे वेगळी नसली तरी वेगळी असतात. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी सत्यम-शिवम्-सुंदरम् या मूल्यांचा एकमेकांशी सुंदर समन्वय घालून दिला. त्यांच्या मते सत्यम-शिवम्-सुंदरम् यांच्या मुळाशी असलेली तत्त्वे मुलत : एकच आहे आणि ते तत्त्व म्हणजे सुसंगती होय. वाङ्मयाचा हेतू सौंदर्यनिर्मिती करणे, सौंदर्य प्रतीत करून देणे हा आहे. सत्य ह्या तत्त्वाचा विचार करताना सत्य हा पाया आहे. आणि त्यातून नीती ही कल्पना आली आहे. सत्य या कल्पनेत नीतीतत्त्व सांगितले, तरी मांडणी व्यवस्थित पाहिजे तर ती कलाकृती सर्वश्रेष्ठ ठरते. उदा :- ज्ञानेश्वरीचा अभ्यास करताना फक्त धर्मग्रंथ म्हणून त्याकडे पाहावयाचे नाही. तर त्या पलीकडील रूप पाहणे आवश्यक आहे. त्यातील वाङ्मयीन वैशिष्ट्यांना महत्त्व असते. म्हणजे 'सत्य' या मूल्यांचा विचार करताना वाङ्मयीन तत्त्वापासून दूर जाता कामा नये म्हणून कलावादाला महत्त्व आहे. परंतु काही वेळेस जीवनासाठी जीवनानुभव

देत असेल तर तो स्वीकारणे ही आवश्यक आहे. परंतु जीवनमूल्यांच्या आधारे कलाकृतीचे मूल्यमापन करू नये.

९. वाङ्मयातील सत्य आणि प्रत्यक्षातील सत्य हे आजकाल तरी काही कलाकृतींच्या बाबतीत एकरूप झालेले दिसते. जीवनातील कारूण्य, अश्लीलता, वास्तवता ही साहित्यातून मांडण्याचा काही साहित्यिकांनी निश्चय केला आहे. काही कलाकृतीतून जे काही सत्य आहे ते जसेच्या तसे आलेले आहे. उदा : ग्रामीण साहित्य, दलित साहित्य यात विद्रोहाची भावना आहे. दलितांवर जो काही अन्याय झाला आहे, ते सांगितले आहे. यामध्ये अनेक आत्मचरित्रे उदाहरण म्हणून सांगता येतील. यात वास्तवता आहे. उदा: 'माहिमची खाडी' या कांदबरीमध्ये मधू मंगेश कर्णिक यांनी झोपडपट्टीतील वास्तव जीवन रेखाटले आहे. तसेच कोणतीही ग्रामीण कादंबरी या वास्तव अनुभवापासून दूर नाही. उदा : 'गोतावळा' मध्ये यादवांनी नारबाचे जीवनचित्रण रेखाटले आहे. हे जीवन आपणाला सर्वत्रच दिसते. म्हणजे सत्य हे कलाकृतीत वाङ्मयात प्रत्यक्षात दिसते /असते. तसेच अश्लीलताही अनेक साहित्यात दिसते. उदा :- 'पडघवली' या कादंबरीत गेंगाण्या आपल्या खोतांना नाव ठेवताना अनेक अश्लील शब्द वापरतो. परंतु ती कादंबरी कलाकृती म्हणून प्रथम श्रेष्ठ असणे आवश्यक आहे. तसेच मर्ढेकराचे साहित्य यातही अश्लीलपणा आहे. परंतु नुसते सत्य आले म्हणजे ती कलाकृती श्रेष्ठ होत नाही. तर त्यात कादंबरीचे जे घटक आहेत ते असणे आवश्यक आहे तरच सौंदर्यनिर्मिती होऊ शकते. उदा: 'शारदा' हे नाटक पाहताना त्यातील घटना याला महत्त्व असते. नुसती त्यातील शाश्वता आवश्यक नाही तर सौंदर्यमूल्ये आवश्यक आहेत. म्हणजेच केवळ अनुभव सत्य असून ती कलाकृती सुंदर होत नाही तर मांडणी, रचना, वैशिष्ट्ये व वाङ्मयीन घटक आवश्यक आहेत. "टीकाविवेक" मध्ये श्री. के. क्षीरसागर म्हणतात "कलेचे सौदर्य हेच अंतिम मूल्ये आहे. सत्य हे सौंदर्याच्या इमारतीला केवळ पाया म्हणून वापरले आहे. ते (सत्य) वाङ्मयाचे अंतिम मूल्य मानू नये".

१०. साहित्याच्या क्षेत्रात शिवम् या मूल्याचा वारंवार वापर होतो. शिवम् म्हणजे कल्याण, पावित्र्य. संत व पंडिती काव्यात शिवत्वाची भावना आहे. म्हणजेच महत्त्वाचा भाग हा की, साहित्य हे जीवनासाठी की कलेसाठी. जीवनामध्ये जे सत्य आहे ते शिवाच्या पातळीवर गेले पाहिजे. कलावंताने कल्पनाविलास करण्यापेक्षा माणसाचे विचार, विकार यांचा विचार केला पाहिजे. पण हा विचार कलाकृतीच्या पातळीवर होणे आवश्यक आहे. शिवत्वाची कल्पना आपणाला ' संगीत शारदा' या नाटकात पाहावयास मिळते. तसेच बोरकर यांची 'भावीण' या कादंबरीतही पाहावयास मिळते ऋषी नावाचा तरुण या भावीणीचा उद्धार करतो. म्हणजेच समाजाच्या हितासाठी जे-जे काही आहे ते शिव होय. कलेचे कलापण आबाधित ठेवून त्यातून पावित्र्याची, शिवत्वाची कल्पना येत असेल तर हरकत नाही.

'दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्य पाहो ।
जो जे वांच्छिल तो ते लावो, प्राणिजात ।'

या पसायदानात जे-जे अशिव आहे ते नाहीसे व्हावे ही उदात्त कल्पना समाविष्ट आहे. प्राचीन काळी धर्म कल्पनेचा पगडा लोकमाणसांवर असल्याने शिवत्वाला खूप मान्यता मिळाली. दुसऱ्यांच्या भावनांचा, विचारांचा आदर करावा. एकमेकाने सद्‌भावनेने वागावे म्हणजे शिवत्व. तसेच कोणाच्या स्वातंत्र्यावर घाला घालू नये.

११. साहित्याकडे केवळ कलावादी भूमिकेतून किंवा दृष्टिकोणातून पाहणारे अनेक वाचक व समीक्षक असतात. साहित्य जीवनोपयोगी आहे किंवा नाही या गोष्टी कलावंताच्या दृष्टीने निरर्थक असतात. याउलट समाजास योग्य वळण लावणे, दीन-दलितांची दु:खे आणि उपेक्षितांचे अंतरंग साहित्यात चित्रित व्हावे असे कलावादी लोकांना वाटते. साहित्य हे जीवननिष्ठांपासून वेगळे होऊ शकत नाही. कारण आपला अनुभव व भावना उत्कटतने साहित्यिक साहित्यात मांडतात. त्यामुळे जीवननिष्ठांना डावलून सामाजिक जीवनाशी फटकून वागून त्याला चालणार नाही. त्याने आपल्या साहित्यातून दैनंदिन जीवनातील समस्यांकडे समतोलतेने पाहण्याची प्रेरणा वाचकाला दिली पाहिजे. कलावादाची भूमिका जीवनाविरोधी आहे. कारण साहित्य हे जीवनापासून दूर राहू शकत नाही. उदा : श्री. म. माटे यांचे 'उपेक्षिताचे अंतरंग' यामध्ये उपेक्षित, दु:खी, पीडित लोकांचे जीवनचित्रण आले आहे. चोरी करणाऱ्या माणसांचे जीवन साहित्यात आले. ज्यांना साहित्याचा विषय म्हणून मान्यता नव्हती त्यांचे जीवनचित्रण आले आहे. साहित्यात नुसते प्रेम नको तर जीवनसंघर्ष आवश्यक आहे. उदा : 'बारी' मध्ये बेरड समाजाचे जीवनचित्रण आहे. त्यात नुसती प्रेम भावना नाही. कलावादी जीवनवादाला मानत नसले तरी त्यांचे सर्व अनुभव हे समाजातील आहेत. उदा : पु. ल. देशपांडे यांचे 'बटाटयाची चाळ', 'खोगीरभरती' किंवा पुणे, मुंबई या ठिकाणच्या मध्यमवर्गीयांचे जीवनचित्रण आहे. तेव्हा मूल्यमापनाच्या दृष्टीने वास्तवाचा आधार घ्यावा.

१२. ज्याचे स्वत:चे आचरण शुद्ध नाही तो श्रेष्ठ वाङ्‌मय लिहू शकत नाही. साहित्य हे संस्कृतीचे अंग आहे. साहित्य आणि नीती यांचा परस्पर संबंध आहे. तर या दोन्ही बाजू मांडणे आवश्यक आहे. एखाद्याचे खाजगी जीवन चांगले नाही म्हणून चांगली निर्मिती नाही असे नाही. (उदा:- राम जोशी तमाशामध्ये लावणी म्हणत त्यांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. नंतर त्यांनी मोरोपंतांना गुरू मानले आणि त्यांनी दोन बायका ठेवल्या कारण त्यातील बयाबाई लावणी गाते म्हणून ती समाजापर्यंत्न पोहचते. त्यांनी बायका ठेवल्या. म्हणून त्यांची लावणी निकृष्ठ मानायची का?) शिवाजी सावंत चोवीस तास मद्यपान करतात मग त्यांचे साहित्य निकृष्ट समजायचे का? म्हणजे लेखकाचे व्यक्तिगत जीवन आणि साहित्यकृती यांचा मेळ घालू नये. काही -काही वेळेस ते समाजामुळेच व्यसनाधीन होतात. दुसऱ्या बाजूने आचरणशुद्ध आणि नीतीतत्त्वाचा विचार करीत असेल तर उदा: संत, पंडित यांच्या साहित्यात

देवधर्मपणाला महत्त्व आहे. साहित्यामुळे समाजातील परिवर्तन पाहावयास मिळते. कलाकृती म्हणून साहित्याकडे पहावे व्यक्ती म्हणून नये. तर समीक्षा चांगली होते.

१३. साहित्याच्या परिशीलनाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार ही पुरुषार्थ प्राप्त होतात. माणूस म्हणून आपणाला काही मर्यादा असतात. आपणाला जगातील सर्वच व्यवहार माहीत असतील असे नाही. साहित्यामुळे जीवनाला सखोल अर्थ प्राप्त होतो. उदा : 'झाडाझडती', 'बारी', 'जोगतीण', 'भावीण', हे वाचल्यानंतर आपणाला हे जग माहित होते. हे सर्व आपणाला केंव्हा कळते तर कलाकृतीच्या वाचनामुळे हे आपणाला कळते. साहित्य हे जीवनातील मूलभूत प्रश्नांचा वेध घेते. त्यामुळे साहित्याचे वाचन करताना सुद्धा तेथील जीवनदर्शनामुळे एकरूप होतो. स्वास्थ्य, मत्सर, द्वेष हे आपणाला साहित्यामुळे कळते. म्हणजे साहित्य आपणांला परिपूर्ण करते. उदा : जाईजूई (य. गो. जोशी) मध्ये लेखकाने एका म्हताऱ्या व्यक्तीचे जीवनचित्रण रेखाटले आहे. पैसा, तारूण्य संपते तेव्हा त्याला कोणी विचारत नाही. सर्व ठिकाणी त्याची अवहेलना होते. यावेळेस तो माणूस मंदिरात जाऊन बसतो त्यावेळेस त्याला कोणी बोलू शकत नाही. हे साहित्याच्या वाचनाने आपण शिकू शकतो. उदा : 'ज्ञानेश्वरी' वाचनामुळे रज, तमोगुण समजतात. म्हणजे साहित्यामुळे आपणाला कसे वागावे हे समजते तर आपण ते निरूपयोगी कसे समजावे.

आर्थिकता हेही साहित्यात महत्त्वाचे आहे. जर आपण सुरवातीला आर्थिकतेला तोंड दिले तरी नंतर आपला फायदाच होत असतो. उदा : आपण वाचनीय पुस्तके खरेदी केली आणि पुन्हा खूप अभ्यास केला, संशोधन केले तर आपला फायदाच होतो.

काम आणि मोक्ष हे पुरुषार्थही साहित्याच्या वाचनामुळे आपणला समजतात. कामभावनेने अथवा लैंगिक भावनेने अतृप्त असलेला माणूस हा शिव्या देतो व शिव्यातून आपली लैंगिक भावना भागवतो. हे आपणाला साहित्य वाचनाने माहीत होते. म्हणजे साहित्य हे जीवनाला महत्त्व प्राप्त करून देते. अशा अर्थाने या चारही पूर्ती आपणाला साहित्य वाचनामुळे होतात. उदा: य. गो. जोशी यांच्या 'मांजर' या कथेतील घेता येईल. एक स्त्री असते. तिला तीन मुले होतात आणि तीनही वारतात. त्यावेळेस त्यांना विसरायचे कसे यासाठी ती बाई किंवा त्यांची आई हे दु:ख विसरण्यासाठी सर्व वेळ कामात घालवते. अशा परिस्थितीत तिच्या नवऱ्याला कॅन्सर हा आजार होतो. पण तो सांगत नाही. तो म्हणतो, डायबेटीस सारखे श्रीमंतांचे आजार गरीबांना होतात असे डॉक्टर म्हणाले, असे तो सांगतो. कारण त्याला माहीत असते की ती अगोदरच चिंतित झाली आहे आणि तिला पुन्हा हे सांगितले तर ते हे सर्व आपणाला साहित्यकृतीच्या वाचनाने समजते. तसेच 'पडघवली' मध्ये हवरटपणाचे उदाहरण सांगितले आहेत. एका व्यक्तीला धोंगडीभर जागा मिळते. पण त्याला विचारले असता तो म्हणतो की, या धोंगडीचे एक टोक काढून ते फिरवत राहायचे आणि ती जेवढी जागा व्यापील तेवढी जागा पाहिजे.

जीवनाचा सखोल अर्थ साहित्यामुळे समजतो. उदा: X.Y हे गुणसूत्र पुरुषांमध्ये असतात तर स्त्रीमध्ये Y.Y ही गुणसूत्र असतात. परंतु X.Y असे मिलन झाल्यानंतर मुलगा प्राप्ती होते हे आपणाला साहित्यामुळे समजते. जीवनाचा अर्थ कळणे म्हणजे काय? हे आपणाला साहित्यामुळे समजते. साहित्याकडे पाहताना त्यामध्ये समाजहिताचा विचार केलेला दिसून येतो. सर्व अनुभव आपण साहित्यातून पाहू शकतो. इंग्लंड, अमेरिका, पेशवाई किवा ५०० वर्षपेक्षा जास्त मागे जाऊन त्यातील माहिती मिळवू शकतो, हे सर्व आपणाला साहित्यामुळे कळते. म्हणजे साहित्यकृतीच्या वाचनाने त्याच्या चित्रकृती विस्तारतात. जे साहित्य अशी चित्रकृती विस्तारते ते शिवत्व अंगिकारते.

सारांश, जीवनाच्या वेगवेगळ्या छटा या साहित्यातून मिळतात. जीवन अर्थ पूर्ण होते. आणि साहित्य वेगवेगळ्या चित्रकृती उभ्या करते. ५०० वर्षे मुली जन्मल्या नाही तर हे सर्वच नष्ट होईल. म्हणजेच साहित्यवाचनाने चित्रकृती विस्तारतात. आणि विचारांचे सामर्थ्य साहित्यामुळे निर्माण होते.

१४. श्रेष्ठ साहित्य मानवी जीवनाची पातळी उंचावते. त्यांच्यातील प्रभुत्व नाहीसे करते आणि त्याला शाश्वत स्वरूपाचा आनंद प्राप्त करून देते. अशा साहित्यात बुद्धी व भावना यांचा सुंदर समन्वय साधला आहे. उदा : प्रत्येक धर्माचे ग्रंथ पाहिले असता प्रत्येक धर्म ग्रंथाची अपेक्षा हीच असते की, आपल्या धर्मातील लोकांनी चांगले वागवणे, शिकवण देणे. पुराणामध्ये अहिंसा हे तत्त्व सांगितले तर 'बायबल' मध्ये मानवाने चांगले वागावे हेच सांगितले आहे. तसेच गीतेतही हेच सांगितले आहे. उदा: भगवा ध्वज हे त्यागाचे प्रतीक आहे. म्हणजे जीवनाची पातळी उंचावणे म्हणजे आपण जे वर्तन करतो ते सामाजिक वर्तन करतो. जीवन त्यागात आहे की भोगात आहे, हे साहित्यातून कळते. बऱ्याच गोष्टी अशा असतात की, त्या सांगून पटत नाही पण तेच आपण सिनेमा, नाटक यामध्ये पाहिले तर खोल संस्कार होतात. जीवन हे त्यागात आहे. उदा : 'अमृतवेल' दुःखाने खचू नका हे सूत्र आहे. म्हणजेच जीवनाची पातळी उंचावणे. थोडक्यात संकटावर मात करणे म्हणजेच जीवन. माणसातील जे प्रभुत्व आहे ते साहित्यामुळे लोप पावते. साहित्यात प्रत्येक माणूस माणूस आहे. उदा: 'जाईजूई' मध्ये एका सैनिकाचे दर्शन घडते. इंग्लंड शहरावर तो सैनिक विमानातून बॉम्ब वर्षाव करत असतो. परंतु तो अचानक विमान कोसळून पडतो आणि त्याला पकडतात. तेव्हा तो घाबरत नाही. तो म्हणतो-तुम्हीही फौजी आहात आणि मीही फौजी आहे. तुम्ही मला मारणार आहात आणि तरीही तुम्ही जर मला काही खायला दिले तर ते मी खाणार. खरे सांगू मला मरायची भितीच वाटत नाही. माणूस धडपडतो ते पोटाची खळगी भरण्यासाठी. या सर्वांतून विचारांची पातळी उंचावते. साहित्यातून माणसाची प्रभुत्वाची भावना नाहिसी होते. तसेच कलावाद आणि जीवनवाद यांचा सुमेळ साधणे आवश्यक आहे.

***

## ८. समीक्षेच्या पद्धती :

### १) आस्वादक समीक्षा

समीक्षा ही ज्याप्रमाणे शास्त्र असते त्याप्रमाणे ती कलाही असू शकते. कलारूप समीक्षेचा नमुना म्हणून आपण आस्वादक समीक्षेकडे पाहू शकतो. आस्वादक समीक्षा नावांनी ओळखली जाते. १) संस्कारवादी २) काव्यात्म ३) आस्वादक ४) कल्पकताप्रधान ५) सृजनशील किंवा पुनर्निर्माणक अशी तिची वेगवेगळी नावे आहेत. ही नावे आस्वादक समीक्षेचे एक वैशिष्ट्ये नेमकेपणाने आपणाला सांगतात.

**पार्श्वभूमी -**

या समीक्षेमागे संस्कारवादी भूमिका आहे. हा संस्कारवाद मुळात चित्रकलेतून आला. संस्कारवाद चित्रामध्ये एखाद्या वस्तूच्या कलाकारावर झालेला परिणाम तो कागदावर व्यक्त करीत असतो. २० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात संस्कारवाद ऐन भराला आला. त्याचा आरंभ १८३० मध्ये झाला. मुने या फ्रेंच चित्रकाराच्या Impression नावाच्या चित्रावरून १८७२ पासून विचारसरणीसाठी हा शब्द रूढ झाला.

वस्तूवर प्रकाश पडल्यावर त्या दिसू लागतात. आपल्या अक्षी पटलावर तिचे प्रतिबिंब उमटते. चित्रकार वस्तूचे चित्र काढत नाही तर त्या प्रतिबिंबाचे चित्र काढतो. वस्तूपासूनचे अंतर प्रकाशवायू आणि दृष्टिकोण यामुळे वस्तू अक्षीपटलावर उमटवणारा प्रभाव सतत बदलतो. त्यातील एखाद्या क्षणाचा प्रभाव चित्रकार गृहण करू शकतो. व्यक्त करू शकतो. त्यास संस्कारवादी शैलीतील चित्र म्हणता येईल.

त्यामध्ये वस्तूचा अक्षीपटलावर उमटवणारा ठसा, संस्कार अभिप्रेत होता. स्वच्छंदवादाच्या विरोधी संस्कारवादाची भूमिका होती. संस्कारवादी प्रवृत्ती वस्तुनिष्ठ व वास्तववादी होती.

पुढे अक्षी पटलावरील प्रभावाबरोबर मन:पटलावरील प्रभावालाही महत्त्व आले. त्यामुळे त्यात व्यक्तिनिष्ठाही आली.

व्यक्तीच्या विशिष्ट सामाजिक स्थितीत वस्तूचा तिच्या मनावर अंकित झालेला संस्कार व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या प्रतिक्रिया यांना त्यात स्थान लाभले त्यामुळे आस्वादक समीक्षेत आस्वादकाचे मन, प्रकृती, दृष्टी यांना महत्त्वाचे स्थान मिळाले.

प्रबोधन युगामध्ये माणसे सामूहिकतेकडून व्यक्तिवादाकडे वळली त्यात संस्कारवादाचा उगम आहे.

**आस्वादक समीक्षेचे स्वरूप :**

आस्वादक समीक्षेमागे संस्कारवादाची भूमिका आहे. विज्ञान एक ज्ञान किंवा संदेश देते. कला मात्र व्यक्तिगणिक वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटविते, असे या समीक्षेत गृहीत धरले आहे. मुळ लेखकांच्या मूळ कलाकृतीचे निमित्त करून तिच्या वाचनाने आपल्या मनावर उमटणारे विविध भाव, भावना, तरंग आणि संवेदना व्यक्त करणे. हे या समीक्षेचे वैशिष्टये आहे.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक असणाऱ्या आणि मारक असणाऱ्या गोष्टी आणि साहित्यकृतीला जन्म देणारी परिस्थिती साहित्यकृतीचे मर्म, लावण्यखुणा समीक्षक समजावून घेतो. समरसता, सहृदयता व कल्पकता यासह तो लेखकाने निर्माण केलेल्या अनुभव सृष्टीमध्ये प्रवेश करत असतो. जे न्यून आहे ते पूर्ण करीत जे अधिक आहे, ते वजा करीत कलाकृतीच्या मर्माचा व स्वत:च्या प्रत्ययाचा तो शोध घेत असतो.

कलाकृतीच्या अनुभवाचा अनुभव इतरांसमोर ठेवणे, हेच आस्वादक समीक्षक आपले काम समजतो.

साहित्यकृतीच्या वाचकांच्या, रसिकांच्या मनपटलावर उमटलेला ठसा हिच या समीक्षेची अभ्यास सामग्री असते. अनुभूतीच्या एका क्षणाला कलेच्या माध्यमातून स्थायी रूप देणे, हाच तिचा हेतू असतो. व्यक्तीच्या संवेदनेवर अनुभवाचा क्षण अवलंबून असतो. म्हणून त्याला स्थिर नियमांनी बंदिस्त करता येत नाही. एका क्षणाचे दर्शन दुसऱ्याक्षणी घडतेच असे नाही. त्या अनन्यक्षणांचे आत्मकेंद्रित प्रकटन करणे हाच आस्वादक समीक्षकांचा ध्यास असतो.

कलाकृतीचे रहस्य सहृदयतेने समरस होऊन समजावून घेणे, हे समीक्षकाचे काम आहे. त्यामुळे या टीकेत निर्णय देणे हे टीकेचे कार्य मानले जात नाही. तर ते आस्वादनाचे उदिष्ट मानले आहे. कलावंताचे व्यक्तिमत्त्व त्याने उभारलेली चैतन्यपूर्ण कलाकृती यांच्या स्वत:च्या मनाला आलेला चैतन्यपूर्ण प्रत्यय ही समीक्षा व्यक्त करते. बाह्य दृष्टीचे अनुभव व लेखकाचे अंतरविश्व यांच्या मिश्रणातून साहित्यकृती घडत असते. तर साहित्यकृती आणि समीक्षकांचे संस्कारक्षम, सौंदर्यपिपासू, व्यक्तिमत्त्व यांच्या मिश्रणातून काव्यात्म समीक्षेचा जन्म होतो. त्यामुळेच एकार्थाने ती एका निर्मितीची पुनर्निर्मिती ठरते.

कवी ज्याप्रमाणे सौंदर्यचे विश्लेषण न करता आपला प्रत्यय व्यक्त करतो. त्याप्रमाणे आस्वादक टीकाकार आपला सौंदर्यप्रत्यय व्यक्त करण्यावर समाधान मानतो. जीवनादर्शनाने स्फूरलेल्या वाङ्मय दर्शनाने स्फुरलेले वाङ्मयही स्वतंत्र व ललित

असू शकते. कवीशी समरस होऊन त्याचा आशय व्यक्त करणे व त्याने अपूर्ण ठेवलेल्या कल्पना त्यांच्याच पद्धतीने पूर्ण करणे हे संस्कारवादी समीक्षेचे ध्येय होय.

आस्वादक टीकेचे स्वरूप स्पष्ट करताना स्पीनगार्ड अधिक सखोलपणे विवेचन करतो. त्याच्या मते "कलाकृतीबद्दल निर्णय देणे, नव्हे तर ती आपणाला कशा प्रकारे प्रभावित करते. ते सांगणे एवढेच टीकाकाराचे कार्य आहे. एखादी कविता वाचून आपण रोमांचित होतो. तेच कवितेविषयीचे आपले काम असते. व रोमांचित होणे हाच निर्णय असतो. यापेक्षा दुसरा निर्णय समाधानकारक असू शकत नाही. ही कविता मला कशाप्रकारे प्रभावित करते. ती कोणत्या संवेदना मला देते. एवढेच मी तिच्याविषयी सांगू शकतो. दुसरे वाचक दुसऱ्या संवेदना मिळवतील व दुसऱ्या पद्धतीने व्यक्त करतील. जो कोणी साहित्यकृतीचा प्रभाव गृहण करण्याची व व्यक्त करण्याची क्षमता बाळगतो तो मूळ रचनेवरून एक नवीन कलाकृती तो निर्माण करू शकतो. हीच समीक्षा कला होते याहून समीक्षेची अधिक मजल जाऊ शकत नाही.

**आस्वादक समीक्षेची गुण- वैशिष्ट्ये -**

१. आस्वादक टीका हा विधायक टीकेचा प्रकार आहे.

२. साहित्यकृतीतील अज्ञात गूढ सौंदर्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य तिच्यात असते.

३. साहित्यकृतीतील उणिवा भरून काढणे व नको तो भाग ओघळणे असे विधायक काम ही टीका पद्धती करते.

४. मूळ लेखकाच्या अपुऱ्या चित्राला पूरक पण सुसंगत असा टीकाकाराचा कल्पनाविलास असतो. त्यामध्ये स्वैरता नसते. त्या कल्पनाविलासात हळूवारपणा समानधर्मीत्व अंतर्मुखता व कल्पकता असते.

५. आस्वादक टीका श्रेष्ठ कलाकृती पुरतीच मर्यादित असते. लेखक व त्याची साहित्यकृतीविषयीच्या आदरभावनेतून तिची निर्मिती झालेली श्रेष्ठ कलाकृती व तितक्याच तोलामोलाचा मर्मज्ञ आस्वादक सम-समासंयोग आस्वादकामुळे ही समीक्षा एक उंची गाठू शकते.

रविंद्रनाथाची टीका या पद्धतीची आहे. दोषास्पद साहित्यकृतीच्या विडंबनालाही या प्रकारची समीक्षा मानता येईल. असे प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी सुचविले. प्र. के.अत्रेची 'झेंडूची फुले' ही रविकिरण मंडळाच्या कवितेवरील याप्रकारची मर्मभेदक टीका आहे. माधव आचवल हे आस्वादक समीक्षेचे ज्येष्ठ समीक्षक 'रसास्वाद कला आणि स्वरूप' 'जास्वंद' ही त्यांची पुस्तके कलारूप समीक्षेचे उत्तम नमूने आहेत. श्री. के. क्षीरसागर यांचे 'उमरखय्यामची फिर्याद' हेही या प्रकारचे चांगले पुस्तक होय. विजया राजाध्यक्ष,  अरूणा ढेरे, यांचे लेखन हीच वाट चोखाळत आहे. पण ते अपेक्षित दर्जा गाठू शकत नाही.

**मर्यादा :-**

१. आस्वादक टीका ही एक प्रकारची कलानिर्मिती होय. साहित्यकृतीच्या आधाराने निर्माण झालेली ती कला आस्वादक टीका पुनर्निमाण कला असे म्हणता येईल या अर्थाने समीक्षा ही कला आहे, असे म्हणता येईल. तथापि समीक्षेला कला मानण्यात काही अडचणी संभवतात.

साहित्यकृतीचे मनावर उमटणारे संस्कार विस्कळीत, तुटीत, असंबंध असतात. ते जसेच्या तसे व्यक्त करणे अशक्य ठरते. ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करायला लागले की, त्याचे विश्लेषण करणे, मांडणी करणे भाग पडते, ती करताच संस्कार जसेच्या तसे व्यक्त करणे यातून या पद्धतीचा पायाच डळमळीत होतो.

२. मूळ लेखकाचे मनोगत कोठे संपते आणि समीक्षकाचे मनोगत कोठे सुरू होते. हे कळत नाही. पुष्कळवेळा मूळ कलाकृती बाजूला राहून टीकाकार त्या काव्यामुळे जागृत होणाऱ्या स्वतःच्या भावनात रंगून जातो.

३. त्यामुळे या समीक्षेत व्यक्तिचित्रण येते. ती वस्तुनिष्ठ राहत नाही त्यामुळे तिला प्रमाण मानता येत नाही.

४. मूळ कलाकृतीच्या आधारे आस्वादक समीक्षक तिची वेगळी पुनर्निर्मिती करतो अशा प्रकारे ही टीका द्वितीय सर्जन असते. फार तर तिला एका कलाकृतीचे दुसऱ्या कलाकृतीत केलेले रूपांतर म्हणता येईल. हे रूपांतरही मूळाच्या तुलनेने दुय्यम दर्जाचे असते.

५. वाचकाच्या आस्वादकाचा अभ्यास करताना ही समीक्षा महत्त्वाचे अभ्यास साधने पुरविते. एवढाच काय तो तिचा साहित्य मीमांसेला उपयोग होऊ शकतो.

६. या प्रकारच्या पुनर्निर्मितीला ललित गद्याचा प्रकार मानता येतो पण समीक्षेचा प्रकार म्हणून तिला मान्यता येणे योग्य ठरणार नाही. अशा प्रकारे समीक्षा जेव्हा कला ठरते तेव्हा ती समीक्षा राहत नाही, असे आपणास म्हणावे लागते.

***

## रूपवादी समीक्षा (कलावाद, सौंदर्यवाद)

मराठी साहित्यात १९४५ नंतर रूपवादी समीक्षा आकार घेवू लागली. वास्तविक मराठीत रूपवादी समीक्षा फार कमी झाली आहे. इतर समीक्षा पद्धतीत जुजबी स्वरूपाची शैली सांगणे, कलाकृतीचे वरवरचे विश्लेषण केले जाते. मात्र रूपवादी समीक्षा कलाकृतीच्या गाभ्याला, आशयाला जावून भिडते. परंतु मराठी साहित्यात १९६० नंतर साहित्य चळवळी सुरू झाल्या. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी, देशीसाहित्य इ. संकल्पना पुढे आल्या व साहित्याकडे पाहण्याचा जीवनवादी, दृष्टिकोण वाढला. जीवनवादी समीक्षा अधिक प्रभावी ठरल्या आहेत. मार्क्सवादी, कलावादी या दोन्हींमध्ये समीक्षा पद्धती असलेल्या दिसतात.

आशयाच्या अंगाने समीक्षा करत असताना जीवनमूल्यांचे विषदीकरण केले जाते. यामध्ये कोण चित्रित झाले आहे. याला महत्त्व असते. आशयाच्या अंगाने ज्याठिकाणी समीक्षा केली जाते तेथे जीवनवादाला महत्त्व असते. वाङ्मयाच्या अंगाने जी समीक्षा केली जाते ती कलावादी होय. यामध्ये मांडणी, शैली, आविष्कार या घटकांना महत्त्व असते. आशयाच्या अंगाने ज्याठिकाणी समीक्षा केली जाते त्याठिकाणी जीवनवादाला महत्त्व प्राप्त होते. उदा : विभावरींची 'बळी' या कादंबरीत मांग-गारूडी किंवा गुन्हेगारी किंवा दलित समाजाचे चित्रण आहे. ते सर्व काही करतात ते पोटासाठी हा विचार या ठिकाणी येथे अभिप्रेत आहे. उदा : 'अक्करमाशी' या आत्मकथनात शरणची आई आपल्या मुलासाठी, त्यांच्या पालनपोषणासाठी शरीर देते हे सर्व करते ती शरणच्यासाठी, स्थूल पातळीवर वाङ्मयीन मूल्यांची दखल आपण घेतो.

**रूपवाद :**

रूपवाद युरोपीयन विचारवंत कांटच्या विचारातून प्रस्तुत झाला. कांटने जीवनमूल्यांची व्यवस्था आपल्या पद्धतीने केली. सत्य-शिव-सुंदर ही जीवनमूल्ये युरोपातून आपल्याकडे आली आहेत. आपली पारंपरिक मूल्ये वेगळी आहेत. ज्ञान, कर्म, भक्ती हे मार्ग जीवन मूल्यांच्या अंगाने आले. ही भारतीय जीवनमूल्ये आहेत. या दोघांचे घनिष्ठ असे नाते आहे. शिव म्हणजे कर्म. याठिकाणी समाजहित, समाज कल्याणाचा विचार केला जातो. शिव म्हणजेच आचारसंहिता. उदा: शिव या मूल्यांमध्ये नीतिला महत्त्व

दिले जाते.

भक्ती हे मूल्य श्रद्धेशी निगडित आहे तर सुंदरता हा श्रद्धेचा भाग असतो. श्रद्धेचा धार्मिकतेशी संबंध नसतो. उदा. माझी सरांवरची श्रद्धा किंवा पतीवरची श्रद्धा. सत्य-शिव-सुंदर हे एकमेकांपासून काटेकोरपणे अलग केले. 'कांट' याने अठराव्या शतकात या मूल्यांचा उदय केला.

१. सत्य-सत्-प्रत्यक्ष अस्तित्वात असते त्याला सत्य म्हणावे. प्रत्यक्षात अस्तित्वात आहे ते सांगणे, शोधणे याला शास्त्र-विज्ञान म्हणतात. शास्त्र हे नेहमी सृष्टीचक्राचे स्थिर स्वरूप सांगते.

प्रत्यक्षात जी वस्तू असते तिला सत्य म्हणावे. उदा 'जड' वस्तू खाली पडते. हे सत्य आहे. कारण पृथ्वीमध्ये गुरूत्वाकर्षण शक्ती असते हे आपणाला नाकारता येत नाही. उदा :- ५+५=१० येथे १५ उत्तर येणार नाही. याठिकाणी नियम बदलत नाहीत ते त्रिकालाबाधित असतात. थोडक्यात या ठिकाणी अस्तित्वात आहे ते सांगणे. शोध घेणे याला शास्त्र-विज्ञान म्हणतात, आणि हे सत्य जे शोधते त्याला विज्ञान म्हणतात.

शास्त्र हे नेहमी सृष्टीचे स्थिर स्वरूप सांगते. उदा: माणसाने जे काही अनुभवले, सांगितले ते साहित्य होय. आपण जेव्हा याचा पुरावा देऊ शकतो तेव्हा याचा संबंध आपण सत्याशी लावू शकतो. उदा: कोकणात सैनिक नाहीत याचे जेव्हा आपण पुरावे देतो तेव्हा सत्याशी संबंध सांगू शकतो. कारण त्याठिकाणी मुबलकता आहे किंवा विदर्भातील माणूस आळशी आहे कारण परिस्थिती याला कारणीभूत आहे. किंवा कोकणात खूप पाऊस पडला पण त्या ठिकाणी पाणी प्यायला नाही असे होत नाही.

निसर्ग व्यवस्थेत निश्चितता असते. त्याची कार्यकारणमीमांसा करता येते. उदा: रात्रीनंतर दिवस येणारच किंवा भरतीनंतर ओहटी समुद्राला येणारच हा क्रम सातत्याने निश्चित स्वरूपात चालू असतो. किंवा आपण जमीनीत 'बी' पेरल्यानंतर ते उगवून वर येणारच हे निश्चित किंवा संकट आल्यावर माणूस ओरडणारच. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे ऋतु येणारच हिमालयात बर्फ नाही असे होणार नाही. त्याठिकाणी बर्फ पडणारच. म्हणजेच निसर्ग व्यवस्थेत वास्तवाला स्थान असते.

प्रेम, क्रोध, शाश्वत आहे. निसर्गत: त्याची कारणमीमांसा करता येते. म्हणून शास्त्राचा विचार करणारा असतो त्याला शास्त्रज्ञ म्हणतात. शास्त्र ही गोष्ट निसर्गाशी संबंधित आहे. कलावंत हा निसर्गातील सत्य सांगत असतो. उदा : बालकवी यांची 'औदुंबर' कविता उदा: एखाद्या मुलीने म्हाताऱ्या व्यक्तीला मदत केली त्या ठिकाणचा स्पर्श, संवेदना वेगळी असते. ते दयेच्या, सहानुभूतीच्या पातळीवरचे प्रेम असते. म्हणजेच प्रत्यक्षात अस्तित्वात असावे त्याचा शोध घेणे म्हणजेच सत्य उदा: 'प्रेमाची रीत' मध्ये इरावतीबाईंनी म्हटले आहे की, ज्या आईने आपले लहानपणी चुंबन

घेतले त्याच आईचे इरावती कर्वे मोठे झाल्यावर चुंबन घेतात. त्यांचे बाबा म्हणतात, 'हे पाश्चात्यांचे चाळे येथे नको.'

२. शिव-शिवाचा संबंध निसर्गाशी नसतो तर माणसाने निर्माण केलेल्या समाजाशी असतो. समाजकल्याण, समाजधारणा, 'शिवत्व' सुचविते. नीतीला महत्त्व असते. एकपत्नित्व हे सामाजिक सत्य. पण पाप, पुण्य, नीती, धर्म, रूढी, परंपरा, यातून शिव मूल्याचा आविष्कार होतो. उदा. चोरी करणे हा गुन्हा आहे. चोरीला मान्यता नाही किंवा समाजाच्या काही धारणा असतात. त्यानुसार आपले आचरण होणे आवश्यक आहे. उदा. एकपत्नित्व ही धारणा अस्तित्वात आहे आणि जर एखाद्याने अनेक विवाह केले तर त्याला मान्यता मिळणार नाही. येथे समाजबंधने येतात किंवा एखाद्याला बायको सांभाळता येत नाही. तेव्हा आपण म्हणतो की त्याला शिवत्व सांभाळता येत नाही. किंवा सत्तांतरामध्ये मादी-नर यांचे संबंध दाखविले आहेत. तेथे नर म्हातारा झाला की मादी निघून जाते जर एखाद्या स्त्रीचा नवरा म्हातारा झाला आणि तिला त्यापासून जर मुले झाली तर ती त्यास सोडून देत नाही. कारण येथे समाजाचा विचार करावा लागतो. समाजबंधने पाळावी लागतात. म्हणजेच शिवत्वामध्ये पाप, पुण्य, नीती, धर्म, रूढी परंपरा या कल्पना असतात. धर्मश्रद्धा असतात. याठिकाणी नीतीमूल्यांची जोपासना याचा आविष्कार पाहायला मिळतो. उदा: घरातील खोबरे खाणे आणि देवाचा प्रसाद म्हणून खोबरे खाणे. राख, कोळसा बुक्का म्हणून लावणे. याठिकाणी कल्याण होण्याची भावना आहे. किंवा दान केले की पुण्य लाभते. या ठिकाणी शिवमूल्याचा आविष्कार पाहताना ज्याला आपण दान केले आहे त्या मोबदल्यात त्याने भस्म तरी आपणाला दयावे ही अपेक्षा असते. हे सर्व समाजकल्याण आणि समाजहितासाठी चाललेले असते.

समाज मानवाच्या हितासाठी आहे. याचे अस्तित्त्व समाजांतर्गत असते. यात पाप, पुण्य, नीती, धर्म, रूढी, परंपरा यात शिवमूल्याचा आविष्कार होतो. म्हणजेच शिवमूल्य हे समाजहितासाठी कल्याणासाठी असते म्हणून मनुष्यप्राणी सर्व सृष्टीचा ट्रस्टी (विश्वस्त) आहे. सृष्टींचे रहस्य मानवाशिवाय इतर प्राण्यांना सापडत नाही. निसर्गाचे अस्तित्व टिकवण्याची क्षमता माणसामध्ये असते. तसेच झाडे, झुडपे, फुले, फळबाग, असावीत, असे त्याला वाटते. कारण कोणतीही गोष्ट नष्ट होऊ नये ही समाजधारणा आहे. ही भावना मानवात असते. प्राण्यामध्ये नसते. नष्ट होणाऱ्या गोष्टीची जाणीव असते. विश्वस्थाच्या भावनेतून शिवमूल्यांची स्थापना व्हावी, सर्व छान चालावे ही भावना आहे. उदा : "जो जे वांछिले तो ते लाहो प्राणिजात ।" या पसायदानापासून ज्ञानेश्वर असा संदेश देतात की, ज्याला जे पाहिजे तसे आचरण करा. उदा : 'जे जे देखिजे भूत ते ते जाणिजे भगवंत' येथे कल्याण करण्याची धारणा आहे. ही धारणा शिवत्वाची आहे. शिवाचा सत्याशी संबंध आहे, असतो आणि नसतोही.

सर्वांच्या कल्याणाचा विचार शिवात असतो. समाजाचे कल्याण करते ते शिवत्व होय. उदा.: शाकाहार, मांसाहार याबाबत आपण विचार मांडतो. शिवत्वाशी याचे नाते मांडतो कारण मांसाहार करणे म्हणजे जीव घेणे तर शाकाहार याचा विचार करता एखादी भाजी जर घेतली तर ती नाशिवंत तर आहेच शिवाय आरोग्याला चांगली म्हणजेच येथे ती बळी जात नाही म्हणून शाकाहार घेणे. शिवत्वाचा संबंध आचारसंहितेशी आहे. थोडक्यात सत्य निसर्गाशी निगडित असते तर शिवत्व समाजाशी निगडित असते.

### ३. सुंदरता :

सत्य, शिव ही दोन्ही मूल्ये बांधली गेली आहेत. सत्य निसर्गाशी बांधले गेले आहे. उदा : $H_2O$ यात फरक नाही. सत्य बंदिस्त असते. शिवमूल्य समाज व्यवस्थेशी, कल्याणाशी बंदिस्त आहे. माणूस शिवमूल्यातून सुटका करण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच सुंदरता. सुंदरता म्हणजे दुसरे तिसरे काही नाही मुक्त होण्याची स्थिती. थोडक्यात सुंदरता या मूल्यातून आनंद मिळतो. त्यामुळे माणूस निरोगी राहतो. शिवमूल्य, संस्कृतीमूल्याचा आविष्कार करतात मानवी जीवनातील महत्त्वाचे मूल्य-सत्य-शिवत्वातून मुक्त होऊ पाहते. म्हणजे सौंदर्य होय. स्वप्न, चमत्कार पाहणे यातून सौंदर्यमूल्याचा जन्म झाला आहे. सुंदरतेची कल्पना व्यक्तिसापेक्ष आहे. सुखसंवेदना निर्माण करणारे आहे. एकाच क्रियेबद्दल अनुकूल प्रतिकुल संवेदना असतात. उदा. रावणाने सीतेला पळविणे. येथे आपले मत प्रतिकूल आहे. कारण रावण हा दुष्ट होता तर सीता ही राणी होती. उदा: रूक्मिणीला श्रीकृष्णाने पळविले या ठिकाणी आपले मत अनुकूल येते. येथे एकाच गोष्टीबद्दल अनुकूल, प्रतिकूल संवेदना असतात. उदा. नवऱ्याने टाकले. प्रतिकूल मत उदा: श्यामची आई आदर्शमाता तर भरताच्या आईमुळे रामाला वनवास आला. पुत्र वियोगामुळे दशरथ मेला. श्रावणबाळाला बाण लागला. जय-पराजय हे प्रवृत्तीवर अवलंबून असतात. कोणता कलावंत चांगला कोणता वाईट हे आपणांवर अवलंबून असते. उदा: व. बा. बोधे, बाबा कदम यांच्या लेखनाचे जो वाचक वाचन करतो तो साहजिकच त्याच्याविषयी अनुकूल संवेदना व्यक्त करील एखादी गोष्ट कालपर्यंत चांगली वाटणारी, कुरूप वाटते. म्हणजेच सौंदर्याच्या कल्पना वयपरत्त्वे, कालपरत्त्वे बदलतात उदा : एखाद्या तरुणीला तरुणपणात प्रेमविषयक वाचनात रस असेल तर त्याच तरुणीला वृद्धपणात त्या वाचनात रस न राहता धार्मिक ग्रंथवाचनात रस निर्माण होईल. म्हणून सत्य-शिव, सुंदर ही तिन्ही मूल्ये वेगवेगळी आहेत. सुंदरतेचे मूल्य कलेमध्ये बांधून ठेवता येते. कलेच्याद्वारा ते साकार करता येते. माणसांच्या जीवनात समतोल राखायचा असेल तर ही तिन्ही मूल्ये आत्मसात करावी. आपण ही तिन्ही मूल्ये जितकी आत्मसात करून तितके आपले जीवन संतुलन होते. जीवनाचे संतुलन या मूल्यांमुळे होते. म्हणून या तिन्ही

मूल्यांची जोपासना किंवा उपासना केली पाहिजे.

मर्ढेकरांपासून सर्वसाधारणत : १९५० नंतर कलावादाचा उदय झाला. मर्ढेकरांपासून कला विचार मांडायला सुरुवात झाली. वामनराव जोशी, डॉ. केतकर, श्री. म. माटे, यांनीही सौंदर्यमीमांसा केली. साहित्याचे 'सत्य' हे कारणस्थानी असावे, परिणाम शिव असतो. उदा: बा. भ. बोरकरकृत भावीण कादंबरी यात सत्य कारणस्थानी आहे. कारण भाविणीला भोगाव्या लागणाऱ्या वेदना, परंतु तेच लोक त्या भाविणीला दिवसा ओळख देत नाहीत. परिणाम स्थानी शिव कसे दाखवले, तर ऋषी या तरुणाने भाविणीचा उद्दार केला. या ठिकाणी ही कल्पना महत्त्वाची आहे. उदा: 'बळी' मध्ये मांगगारूडी समाजाचे दु:ख हे सत्य तर शिवस्थानी त्यांना नोकऱ्या द्या, शिक्षण द्या, माणूस म्हणून वागण्याचा अधिकार द्या. परिणामस्थानी ती शरीर का विकते. त्यांना जेवणं मिळाले तर चारित्र्याचा विचार होईल तर त्यात शिवत्व येईल. उदा : 'कोल्हाट्याचे पोर' यात कोल्हाटी समाजात आईचे नाव देण्याची पद्धत आहे. कारण लहान मुलाचा बाप कोण?हेच माहीत नसते. "आमची आई म्हणजे रामदेव जगतापाची रखेली" ज्यांना बापाचे नाव नाकारले त्यांना हीन लेखू नका. त्यांना शिवत्वाच्या पातळीवर न्या. उदा: दलित साहित्यात वेदना, विद्रोह आहे, हे सत्य आहे. परिणाम म्हणून त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून द्या. अनुभव सत्य, परिणाम शिव परंतु आविष्कार सुंदर असणे आवश्यक आहे. साहित्याचे सत्य हे कारणस्थानी तर शिव हे परिणाम स्थानी. आणि आविष्कार सुंदर, ही संकल्पना मर्ढेकर मांडतात.

मर्ढेकर समाज आणि साहित्याचा (कलेचा) काही संबंध नाही असे मानतात. मर्ढेकर हे 'स्वप्नरंजनवादी' होते, हे बरोबर नाही. सत्य, शिव, सुंदरतेचा मेळ घालू नका फक्त सुंदरतेचा विचार करा, असे ते म्हणतात. त्यांना अलौकिक अभिप्रेत आहे. लौकिक नाही. भरतमुनींना ज्याप्रमाणे लोकधर्मी मान्य नव्हत्या त्यांना नाट्यधर्मी मान्य होत्या. उदा: १. श्रावणमासी हर्षमानसी २. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांचे मखमलीचे. ३. आनंदी आनंद गडे त्याचप्रमाणे मर्ढेकरांची संकल्पना होती. नाट्यशास्त्र म्हणजे जीवनदर्शन नव्हे. साहित्यकृतीतून रस निर्माण व्हावा हे त्यांना अभिप्रेत होते. यांच्यासाठी ते सौंदर्य हा शब्द वापरतात.

**भरतमूनी :**

नाट्यशास्त्र म्हणजे जीवनदर्शन नव्हे. साहित्यकृतीतून रस निर्मिती होते. रूची निर्माण होते. यालाच 'सौंदर्य' हा शब्द वापरला असे दिसून येते. साहित्यात 'पात्र' म्हटले जाते. मानव असे म्हटले जाते. पात्र म्हणजे भांडे. नाट्यशास्त्र जीवनापासून वेगळे काढणे महत्त्वाचे. कारण साहित्याची भाषा वेगळी असते. येथे सौंदर्याविष्काराला महत्त्व असते. साहित्य या कलेकडे पाहाताना प्रत्यक्ष म्हणजेच लौकिकाचा विचार

करावयाचा नसतो. तर अलौकिकाचा विचार अभिप्रेत असतो अलौकिक म्हणजेच सत्य शिवापेक्षा वेगळे ते सुंदर.

उदा : "तु असतीस तर झाले असते उन्हाचे गोड खडे !!"

किंवा "तुझा मुखचंद्र पाहून माझ्या ह्रदय सागराला भरती आली.."

किंवा "हिरवे हिरवे गार गालिचे"

किंवा "निळा सावळा झरा वाहतो बेटांबेटातून" (शब्दश: अर्थ नाही)

म्हणजेच सौंदर्याचे रूप-सत्य-शिवापेक्षा वेगळे आहे.

रूपवाद-कलावाद-सौंदर्यवाद यामध्ये सुंदराचे स्पष्टीकरण केले.

१९ व्या शतकात साहित्याच्या, कलेच्या क्षेत्रात परिवर्तन घडून आले. भरताचे नाट्यशास्त्र मागे पडून कलावंताना महत्त्व आले. नावीन्याला महत्त्व आले त्याविषयी आकर्षण वाटू लागले. १९ व्या शतकात परिवर्तन घडल्यामुळे कलावंताना संबंध समाजव्यवस्थेत काय स्थान आहे? हे कळले. उदा. ह. ना. आपटे, वा. म. जोशी, डॉ. केतकर यांना दुहेरी अर्थप्राप्तकारण झाला. एका बाजूने ते साहित्यिक आहेत. साहित्यातून त्यांनी सत्य शिवाची जोपासना केली. तर एका बाजूने त्यांनी साहित्य कलात्मक पातळीवर मांडले. समाज घडविणे हा त्यांचा उद्देश, हेतू होता. सामाजिक वास्तव, प्रखर वास्तव सांगण्याचा हेतू यामागे होता. त्यांनी सत्याचा प्रचार, प्रसार करणे हा हेतू ठेवला. ह. ना. आपटे, आगरकर, वा. म.जोशी, सुर्वे यांनी सत्य, शिवाबरोबर सुंदरतेची कल्पना मांडली.

प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या काळात कलावंताला समाजामध्ये दुय्यमस्थान होते. तर आपल्या समाजात कलावंताना स्थान आहे. साहित्यात अनेक वाद निर्माण होतात. अनेक रसिक लेखकांना भेटतात. संमेलने भरतात. तर प्लेटोनी आदर्श राज्याची संकल्पना मांडून लेखकांची हकालपट्टी केली.

कांटने १८ व्या शतकात कलेला स्वतंत्र स्थान आहे, असे मानले कलावंताना त्यांची आयडेंटी आहे. कलावंताचे खाजगी जीवन पाहू नका, शिक्षण पाहू नका यातूनच रूपवादी समीक्षा जन्माला आली. उदा. शिवाजी सावंत हे व्यसनी आहेत. २४ तास दारू पितात, परंतु त्यांचे साहित्य तर उच्च असेल तर त्यांच्या खाजगी जीवनात ढवळाढवळ करण्याचा आपणाला काय अधिकार आहे उदा : (मृत्युंजय, छावा) उदा. नारायण सुर्वे हे खूप बिड्या ओढतात, रंगाने काळे कुळकुळीत आहेत, हे याठिकाणी महत्त्वाचे नाही तर त्याची कलाकृती श्रेष्ठ आहे, त्यात सौंदर्यमूल्य आहेत, ते आपण पाहणे आवश्यक आहे.

सौंदर्य हे मूल्य काय आहे. त्याचे स्वरूप काय? याचा परामर्श घेतला पाहिजे. सौंदर्यमूल्यांची जोपासना कलेच्या प्रांतात असावी यातून रूपवाद आला. सौंदर्याविष्कार विविध कलामधून होतो. उदा. शिल्प, नृत्य, संगीत. सौंदर्यमूल्य लौकिकापेक्षा वेगळे अलौकिक, स्वायत्त आहे. स्वतंत्र आहे. त्याला आपण कला मानतो. कला, शास्त्र

विकसित झाले, याला आपण सौंदर्यशास्त्र असे म्हणतो. यात नव्या दृष्टिकोणातून सर्व कलांच्या सौंदर्यांचा, स्थितीगतीचा विचार केलेला दिसतो. सौंदर्यशास्त्र हे सर्व कलांचे शास्त्र आहे असे वरील विवेचनातून सिद्ध होते.

सौंदर्यशास्त्र प्रत्येक कलेचे अलग-अलग असू शकते परंतु तदतंर्गत वेगळे शास्त्र असू शकत नाही. उदा. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र असे म्हटले जाते ते चुकीचे आहे. सौंदर्यशास्त्राच्या विषयी नीट ज्ञान नसणे होय.

**सुंदरमूल्ये :**

सुंदर ही संकल्पना संवेदनेशी संबंधित आहे. संवदेना मानवाच्या ह्रदयाशी निगडित आहे. इंद्रियाशी संबंधित आहे. उदा. आपणाला चटका बसला तर ते त्वचेला जाणवते नंतर ह्रदयाशी संबंध येतो. या उलट दुःख झाले तर अगोदर ह्रदयात जाणवते व आतल्या आत कालवाकालव होते. नंतर अश्रू बाहेर पडतात. घसरून पडला की, आपणाला हसू आणि दुःखही होते. कलेसंदर्भात संवेदना असतात. त्या इंद्रियाशी संबंधित आहेत. काही गोष्टी बाह्य गोष्टींशी संबंधित असल्या तरी त्या ह्रदयात पोहचतात. सर्वच बाह्य घटनांचा संबंध प्रत्यक्षात असेलच असे नाही. कलेची उत्तम समीक्षा करावयाची असेल तर तिचे रूप तपासले पाहिजे असा विचार कांट संप्रदायातील विचारवंतांनी मांडला. ललितकला, संगीत, नृत्य, चित्र आणि साहित्य अशा कलांचे उल्लेख केलेले दिसतात. सर्व कला इंद्रियनिष्ठ आहेत. सर्व कलांच्या बुडाशी मानवी अनुभव असतो. सर्व कलांचा आविष्कार माध्यमातून होत असतो. कलांच्या निर्मितीची प्रेरणा सौंदर्याचा आविष्कार असते. अनुभव एकच असला तरी माध्यम वेगळे असते. माध्यमामुळे त्या वेगवेगळ्या वाटतात. संगीत नृत्याच्या छटा वेगवेगळ्या असतात. संकल्पनाचे मुक्त मिलन असते. उदा. संगीताचे माध्यम स्वर, चित्र, शिल्प, रंग/रेषा, शिल्प-आकार आणि रूप, नृत्य-पदन्यास, याप्रमाणे प्रत्येकाचे माध्यम वेगवेगळे असते. तर साहित्याचे माध्यम भाषा असते. या सर्व कलांतून आपणाला आनंद मिळतो.

सर्व कलांत संकल्पनांचे मुक्त मिलन असते. उदा. आई मुलावरचे प्रेम जसे ह्रदयात जपून ठेवते.उदा. मेघाद्वारे प्रेयसीला निरोप धाडणे. कवी कल्पनाविलास करू शकतो. म्हणजेच मुक्त मिलन. साहित्याचा संकल्पनामुक्त रूपापर्यंत जायचे त्याला रूप म्हणावयाचे. (फुल म्हटले की कविता होत नाही. 'राणी' म्हटले तरी कविता नाही. फुलराणी म्हटले की, कविता होते.)

कलांची निर्मिती सकल्पनांचे मुक्त मिलन असते. मुक्त मिलन दोन प्रकारचे असते. १. संकल्पनांचे २. संकल्पनाच्या बाहेरचे म्हणजेच प्रत्यक्षातील आणि अप्रत्यक्षातील सौंदर्य हे बंधनापलीकडे असते. प्रत्यक्षातील मिलन हे बंधनातील असते. आणि अप्रत्यक्षातील मिलन हे बंधनमुक्त असते. म्हणून सौंदर्य हे नेहमी बंधनमुक्त असते.

म्हणजेच एका बाजूला मनातील तर एका बाजूला बाहेरच्या गोष्टींचे मुक्त मिलन असते. उदा: कपडा खरेदी करताना आपण अंतरंग न पाहता बाह्य बाजू पाहतो. फॅशन, सौंदर्याचा विचार करतो, रंगाचा विचार करतो. साहित्यकलेला मर्ढेकर निकृष्ठ कला मानतात तर इतर कलांना श्रेष्ठ मानतात. कारण इतर कला या इंद्रियनिष्ठ आहेत.

साहित्यामुळे कोणत्याही इंद्रियाची तृप्ती होत नाही. कारण साहित्य पाहिल्या बरोबर झटिती प्रत्यय येत नाही. ते सर्वश्रेष्ठ कला म्हणून संगीत कलेला महत्त्व देतात. संगीत शिकताना त्याचा कशाशी संबंध येतो. संगीतांच्या स्वरांवरच आपल्या चित्ताची एकाग्रता होते. या कला एकाएकाच इंद्रियावर आधारणाऱ्या कला आहेत. संगीत, शिल्प, चित्र यामुळे एका एका इंद्रियाची तृप्ती होते. आपले चित्त विचलित होत नाही. सौंदर्यानुभवातून चित्ताची एकाग्रता होते. हे सामर्थ्य अन्य कलांमध्ये आहे.

साहित्य सर्वच इंद्रिय संवेदनांचा संगम करणारे आहे. साहित्यात ध्वनी, रंग, रसरूप हे सर्व घटक अप्रत्यक्ष आहेत तसे संगीतात नाही. त्याठिकाणी प्रत्यक्षता आहे. कारण संगीत ऐकत असतात. नृत्य, चित्र, शिल्प पाहत असतात. पण साहित्यात कल्पना करावी लागते. येथे अप्रत्यक्षता, अनिश्चितता असते.

उदा. 'आई म्हणून कोणी आईस हाक मारी' येथे 'आई' अप्रत्यक्षता आहे. येथे आईबद्दलचा एक गुण कॉमन आहे. आई म्हटले की प्रेमळ. परंतु खेड्यातील आई ही नऊवारी साडीत तर शहरातील आई सहावारी साडीत असेल. शहरात आईली मम्मी म्हटले जाईल म्हणजेच याठिकाणी अप्रत्यक्षता येते. साहित्यात अप्रत्यक्षता असते. ध्वनीने आपण अविचलित झालो तर जे काही लक्षात आहे ते जाते. उदा. 'एकच प्याला' हे नाटक पाहताना कोणाला सिंधूबद्दल दया वाटेल तर कोणाला नाही हे अप्रत्यक्षपणे आपल्यापुढे उभे राहते. म्हणजेच साहित्यात इंद्रिय संवेदनांचा संगम झाला असतो. उलट अन्य कलाबाबत असे होत नाही.

साहित्यात आपणाला कल्पना करावी लागते. उदा. 'नलदमयंती' यामध्ये नलामुळे दमयंती दु:खी होते. ही आपणाला कल्पना करावी लागते. किंवा नलाच्या मुळे दमयंती दु:खी होते. जटायू हा निरोप सांगतो हे सर्व आपण कल्पनेच्या आधारे सांगू शकतो. उदा. 'निळासावळा' झरा वाहतो बेटाबेटातून ही आपण कल्पना करतो, आणि अर्थ लावतो. परंतु इतर कलांत कल्पना केली जात नाही. प्रत्येक कलाकृती वाचत असताना कल्पना केल्याशिवाय कलाकृती समजत नाही. उदा. ज्ञानदेवाच्या विराण्या अतृप्त विरही विराण्या तर तुकारामांच्या विराण्या ह्या तृप्त विराण्या साहित्यात अप्रत्यक्षता असते. अनिश्चतता असते. कल्पना करावी लागते. उदा. 'एकच प्याला' यात सिंधूस पाहून एखाद्यास दु:ख वाटेल तर एखाद्याला नाही. कल्पनेने उभे केलेले वेगवेगळे चित्रे असतात. याठिकाणी ज्याचा-त्याचा दृष्टिकोण कल्पनेने उभा केलेला असतो. उदा. 'एकच प्याला.' म्हणून साहित्य ही संकरित कला आहे. असे मर्ढेकर

म्हणतात. याउलट डॉ. आनंद यादव म्हणतात, की साहित्य ही संकरित कला आहे. हेच त्यातील साहित्य कलेचे सामर्थ्य आहे. अनेक संवेदना त्यात एकत्र येतात. त्यात रंग, गंध, वास हे सर्व एकत्रपणे आपण साहित्यात अनुभवू शकतो. साहित्य कलाही अनेक इंद्रियांशी संबंधित आहे. म्हणून साहित्यकलेची ताकद मोठी आहे. साहित्य ही कला संवेदनानिष्ठ आहे. उदा. एकाच रुपाचे तीन प्रकार आई, मम्मी, बाई हे त्या मुलांसमोर का उभे राहिले. हे संवेदनावर अवलंबून, त्याची मीमांसा रूप याठिकाणी करावी लागते. म्हणून 'रूपा' ची निष्ठा आहे. रूप हेच कसे काय आकाराला येते? याची मीमांसा केली जाते. साहित्यरूप आकार यात फरक आहे. रूपात रेखीवपणा, प्रमाणबद्धता, सुसंगती, लयबद्रता, संवाद, विरोध, तोल असतो. उलट आकारात रेखीवपणा नाही. प्रमाणबद्धता नाही उदा. भटजी म्हटले की, आपणासमोर वेडावाकडा आकार येतो. त्याठिकाणी प्रमाणबद्धता नाही आणि रूप म्हटले की त्या ठिकाणी प्रमाणबद्धता असते. उदा. विश्वसुंदरी स्पर्धा (सुश्मिता सेन), यामध्ये ती युवती रूपवान असते. तिचे वजन, उंची या सारखे काही निकष असतात.

सुंदर हे प्रमाणबद्ध असते. उदा. विश्वसुंदरी, त्याबाबत निकष असतात. कला या रूपवादी आहेत. म्हणजेच त्या सुंदर आकाराच्या आहेत. उदा. सुसंगती ही आवश्यक असते. गॅदरिंग, कवायत उदा. नायक किंवा नायिका डान्स करताना त्यात सुसंगती पाहिजे. वेडेवाकडे हातपाय हालवून डान्स होत नाही

सर्व कला या एका केंद्राभोवती फिरत असतात. प्रमाणबद्धता मोजता येते. कुठल्याही अनुभवकेंद्राशी एकरूप होणे, एकजीव होणे आवश्यक त्यातून रूपसिद्धी होते. उदा. 'पाचोळा' या कादंबरीत 'पार्वती' ही केंद्रस्थानी आहे. आणि तिच्या भोवती इतर पात्र फिरताना दिसतात. हे सर्व पाहताना त्या कादंबरीतील विषय, आशय, आविष्कार कसा झाला. उदा 'झेलझपाट' विषय आदिवासींच्या जीवनातील ससेहोलपट कशी झाली.

अनुभवाचे केंद्र ही मध्यवर्ती कल्पना आहे. मग आपणाला कलेकडून अनुभव व्यक्त करावयाचा आहे. त्याचे रूप शोधायचे आहे. त्यासाठी त्यातील घटक शोधणे. संवाद विरोध, तोल हे घटक पाहणे आवश्यक आहे. पात्र प्रसंग-घटना, कथानक, वातावरण, भाषा हे सर्व घटक पाहणे इष्ट.

पूर्वी साहित्यात आशय, अभिव्यक्ती हे शब्द वापरले जात होते. परंतु आज अनुभव रूप अभिव्यक्तीला रूप असेलच असे नाही. म्हणजेच (आशय म्हणजे अनुभव पण अनुभव म्हणजे रूप नव्हे.) हे शब्द वापरले जातात. 'प्रतिभासाधन' मध्ये प्रा. ना. सी. फडके यांनी जो विचार मांडला त्यात पात्र, प्रसंग, घटना यांचा मेळ घालणे म्हणजे रूप तपासणे होय. पात्र, प्रसंग, अनुभवाच्या केंद्रस्थानी किंवा विषयाशी निगडित पाहिजे.

पूर्वीच्या काळात पात्र, घटना, कथानक व वातावरण हे घटक तपासले जात

होते यांचा मेळ घातला जात नव्हता. हे सर्व घटक 'अनुभव' केंद्राशी कसे एकरूप झाले आहेत. हे सांगितले जात नव्हते.

१९४५ नंतर रूपवादी समीक्षा जन्माला आली. विचार, भावना, कल्पना हे अनुभवाचे घटक गंगाधर गाडगीळांनी सांगितले. अनुभवात काव्य, नाटय, कल्पकता, विनोद असतो. अनुभव म्हणजे कलानुभव होय. साहित्य कलेतील अनुभव यात वरील सर्व घटक समाविष्ठ असतात. तसेच जुने घटकही समाविष्ठ असतात. यात पात्र प्रसंग, कथानक, वातावरण, भाषा हे घटकही येतात. तर काव्य, नाट्य, कल्पकता, विनोद, प्रतिमा, अलंकार हे घटक नवे घटक होत.

प्रतिमा, अलंकार, हे घटक मुळ अनुभवाला पूरक, पोषक ठरतात. जुनी भाषा ही पाल्हाळिक तर नवी भाषा ही प्रमाणबद्ध असते. साहित्यात कोणत्याही एका घटकाला स्वतंत्र महत्त्व नसते. उदा.वि.स.खांडेकर हे आपल्या कादंबऱ्यांतून आदर्शवादी कल्पना मांडतात. यातून ते बुद्धी, भावना या घटकांना एकत्र आणतात. एकत्र आणण्याचा मोह होतो. (कोणत्याही एका घटकाचा वरचष्मा असेल तर तोल बिघडतो मर्ढेकर हे संवाद, विरोध, तोल या घटकांना महत्त्व देतात. संवाद, विरोध हा शब्दांतून व्यक्त होतो. लयबद्ध किंवा चैतत्यपूर्ण अनुभव पाहिजे. त्यात यांत्रिकता नको तर तोल हवा. संवाद, विरोध, तोल रूपवादात महत्त्वाचे आहेत. उदा. 'पाणकळा' मध्ये भुजाबा पाटलाला मारतो या ठिकाणी तो जपूनच टोला का मारतो. मुक्का मार का देतो.?

कलाकृतीत मानवी अनुभवाचा आविष्कार असतो. उदा. 'कीचकवध' या नाटकात दोन पात्रात लेखक विसंवाद दाखवतात कीचक विरूद्ध भीम, भीम सुष्ट तर कीचक दृष्ट आहे. म्हणून विसंवाद उदा. रामविरूद्ध रावण.

रूप-रूपाची सिद्धी पाहताना सर्व घटक एकजीव होणे गरजेचे आहे. रूप शोधताना आपण जीवनाकडे वळतो. म्हणजेच संवाद, विरोध, तोल हा जीवनमूल्यांशी सुसंगत असावा. जीवनमूल्यांशी सुसंगत आहे की नाही हे आपण शोधतो. भाषेचा संबंध मानवनिर्मित आहे. म्हणजेच साहित्य जीवनाशी निगडित आहे.

साहित्यकृती स्वायत्त असू शकत नाही. जीवनमूल्याशी साहित्यकृतीचा संबंध असतो.

साहित्याचे माध्यम भाषा आहे. रंग, रेषा, चित्रकला यांचा मानवी जीवनाशी संबंध नाही. भाषा माणसाने निर्माण केली. ती अर्थ वाहण्यासाठी निर्माण केली. कविता जीवनार्थातून व्यक्त होते. परंतु जीवनाशी बांधील असावीच असे नाही. द्राक्ष मिळत नसलेला कोल्हा बोलत नसतो. स्त्रीला पंख नसतात, तरीही साहित्यात कोल्हा बोलतो. स्त्रीला पंख असतात.

साहित्य कला या जीवनाशी बांधीलच पाहिजे. अप्रत्यक्षपणे साहित्य हे जीवनाशी बांधलेले असते. उदा. मुखचंद्र (भावयुक्त) यातून ध्वनीत काय? ते कशाचे तरी

प्रतीक असते. मानवी भावनांचे प्रतीक आहे. प्रसन्नता ही भावना-भाषा-अर्थपूर्ण असते.

समाजसापेक्षता सोडून देणे अभिप्रेत आहे. जे मिळत नाही त्याचा शोध घेणे? असा रूपवादी समीक्षक विचार मांडतात. मनाची स्फंदने वेगळ्या भाषेत मांडतात. उदा. "उन्हाचे चांदणे झाले असते तू असतीस तर."

समाज व्यवहारात जे मिळत नाही त्या पलीकडच्या भावना त्याचा शोध घेणे येथे महत्त्वाचे असते. साहित्यकृतीची रूपवादी समीक्षा करताना जीवनाला विन्मुख होऊन चालत नाही. सामोरेही जावे लागते. रूपवादी समीक्षा जीवनाच्या आशयापर्यंत पोहचते.

रूपवाद म्हणजे बाह्यरूप पाहणे नव्हे. तर आंतररूप पाहणे त्यापासून फटकून राहणे. मर्ढेकरांना अपेक्षित नाही.

***

## मानसशास्त्रीय समीक्षा

ही एक नवीन अभ्यासशाखा पद्धती आहे. आपल्याकडे तिचा बऱ्यापैकी विस्तार झाला आहे. या पद्धतीमध्ये मानवी मनाचा विचार केला आहे. आपणाला मन आहे त्या आधारे आपण विचार करू शकतो. माणसात कसे रहावे? कसे राहू नये? हे आपणाला समजते. माणूस एका विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रकारे वागतो. उदा. माणूस कधीच सुष्ट, कधीच दृष्ट नसतो. या दृष्टीने कलावंताने जी पात्रे निर्माण केली ती कायम दृष्ट नसतात. उदा. खलनायकाची भूमिका करणारी व्यक्ती किंवा मुले.

१. वाङ्मय हे मानवी प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे एक वैशिष्ट्यपूर्ण अपत्य आहे. कलावंताला एखादे पात्र उभे करताना फार विचार करावा लागतो. त्याची त्या प्रसंगाशी नाळ जोडलेली असते. उदा. 'एकच प्याला' या साहित्यकृतीचा विचार करत असताना लेखकाने त्यात जी काही पात्र, प्रसंग उभे केले आहेत. त्यात सिंधू या व्यक्तिरेखेचा विचार करता तिच्या सर्व मानसिकतेचा विचार केला जातो आणि त्यातून ते पात्र उभे केले जाते. उदा. चित्रपट किंवा नाटक जर सेन्सॉर बोर्डकडे गेले असता त्यातील एकही पात्र, प्रसंग गाळू नये असे वाटते. कारण ते त्याच्याशी एकरूप झालेले असते.

२. वाङ्मयाने मानवी संस्कृतीची उभारणी केली आहे.

आपण म्हणतो की जसा राजा तशी प्रजा असते. म्हणजेच या ठिकाणी राजाला ज्या पद्धतीने राज्य चालावे असे वाटते तशी प्रजा प्रयत्न करते. पेशवे काळात लावणी होती. त्यामध्ये स्त्रीदेहाचे वर्णन केले जात होते. तसेच शिवाजी महाराजांच्या काळात पोवाडा गायिला जाई. ते म्हणत होते की आदर्शाची पूजा करा, परंतु आजची मानवी संस्कृती ही भ्रष्टाचाराची आहे. उदा. सर्व देशात भ्रष्टाचार माजला आहे. जो त्याला विरोध करील त्यावर आरोप केले जातात. (अण्णा) आजची संस्कृती ही माणसे विकली जाण्याची आहे. अलीकडे माणसाची किंमत राहिली नाही. उदा. 'ब्राऊनशुगर' चा व्यापार करणारे लोक पोलिसांना लाच देतात आणि त्यांच्या 'पोलिसव्हॅन' मधूनच तो माल नेतात.

३. तसेच संस्कृतीनेही साहित्याच्या भरण-पोषणास महत्त्वाचा हातभार लावलेला आहे. लेखकाच्या मनात कितीही विकृत विचार आला तरी प्रतिभेच्या जोरावर त्याला

माहीत असते की, मी काय केल्यावर काय होईल. म्हणून तो वाईट लिहीत नाही. समाजास हितकारक अशाच साहित्याची निर्मिती करतो. म्हणजेच संस्कृती, मूल्य जोपासण्याची कामे तो करत असतो. कारण तो समाजातील एक घटक असतो.

४. मानसशास्त्रीय समीक्षा हा समीक्षेचा प्रकार नसून एक दृष्टी आहे. म्हणजेच आपण एका विशिष्ट दृष्टीने कलाकृतीकडे पाहत असतो. उदा. भुजाबाचे घर जाळणारा रंभाजी पाटील. हा पाटील दृष्ट वृत्तीचा आहे. भिल्ल लोक रंभाजीला मारतात तेव्हा तो त्याला जवळ करतो. कारण तो वारकरी आहे, परोपकारी वृत्तीचा आहे. तसे ज्या व्यक्तींनी त्याचे घर लुटले त्यांना धान्य देतो. म्हणजे या ठिकाणी भुजाबा त्या लोकांचे पोट जाणतो. कलाकृतीतील पात्र त्या विशिष्ट पद्धतीत अशी का वागली हे कलाकृतीत पाहायला मिळते. 'मेड इन इंडिया' यात लोक आळशी कसे बनतात हे पाहायला मिळते. तेव्हा बदलती मानसिकता आपल्यापुढे येते. माणसे अशी का वागतात तर विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रकारे माणसांची मानसिकता घडत असते. उदा. "शांतता कोर्ट चालू आहे", "कालचक्र" परंतु आता मानसिकता ही दिशाभूल करणारी आहे. मानसिकतेच्याबाबत विचार करता आता सेवा राहिली नाही उदा. 'डॉ. आणि पेशन्ट'

५. वाङ्मय मानवी मन आणि बुद्धीचा आविष्कार असल्याने मानसशास्त्राचा समीक्षेशी तसा जवळचा संबंध आहे. मानवी मन हे व्यभिचारी आहे. ते अस्थिर असते. मन कुठेही जाते. ते ज्या त्या व्यक्तीवर आधारित आहे.

तर बुद्धिमत्ता स्थिर असते. ती मनाला आवर घालतो. उदा. विमानात बसायचे असे वाटले तर खिशाचा सल्ला घेणे आवश्यक. विहीर खणणे तर पैसा आवश्यक, मानवी मन आणि बुद्धी यांच्यातून रसाविष्कार होतो.

**रससिद्धांत** - त्यातील भाव, विभाव, अनुभाव, स्थायी, व्यभिचारी, संचारी भाव या संकल्पना मानसशास्त्रीय आहेत. यांच्या सर्वांच्या मिलनातून रसनिष्पती होते आणि या सर्व संकल्पना मानसशास्त्रीय परिभाषेशी संबंधित आहे. उदा. एखाद्या कलाकृतीमुळे दुःखाने दुःख होते तर सुखाने सुख होते. आनंदीबाई 'ध' चा 'मा' करते म्हणून आपणास राग येतो. भाव, अनुभाव हे मानसशास्त्राशी निगडित आहेत. रससिद्धांतात जेवढ्या संकल्पना आहेत त्या मानसशास्त्रीय संकल्पना आहेत.

फ्रॉईड - अप्रकट / नेणीवयुक्त मनाची कल्पना मांडली. फ्रॉईडपूर्वी कॉन्शस उर्फ प्रकट मनाचाच विचार केला जाई. मानवी मनाचा नेणीवयुक्त मनाने अधिक भाग व्यापला आहे. एका मानसशास्त्रीय लोककथेद्वारे हे स्पष्ट करता येईल. उदा. एक व्यक्ती मानसशास्त्रज्ञाकडे येते आणि शांत झोप येत नाही म्हणून औषध मागते. तर ते म्हणतात, आपल्या गावात एक सर्कस आली आहे ती पहा, तुमचा गंभीरपणा जाईल. त्या मानसशास्त्रज्ञाविषयी लोक चांगले सांगतात. पुन्हा एकदा एक पेशन्ट येतो. डॉ. तोच उपाय सांगतात. की, एक विदूषक आहे त्याकडे जा. तो हसतो आणि म्हणतो तीच तर अडचण आहे. कारण मीच तो विदूषक आहे, हेच त्याचे अप्रकट

मन होय.

मानवी अंतर्मनात अनेक भावभावना, वासना, सुप्त इच्छा असतात. त्या इच्छा माणूस बोलून दाखवत नाही.

अप्रकट मनातील दबलेल्या ऊर्मी स्वप्नात प्रतीकात्मक रीतीने समूर्त होतात.

अंतर्मनातील ऊर्मींत कामभावनेला फार महत्त्व असते. फ्रॉईड म्हणतो की, मानवी जीवनातील मनाचा सर्वात जास्त भाग कामभावनेने व्यापला आहे. वरवर मी म्हणणाराही त्या पासून दूर राहू शकत नाही. कामभावनेने तृप्त नसतो तो हे सर्व स्वप्नात करतो आणि जी इच्छा दिवसभरात तृप्त होऊ शकत नाही ती स्वप्नात पूर्ण करतो. मनाच्या तीन अवस्था आहेत. १. बाह्य २. अंतर ३. नेणीवयुक्त मन. प्रामुख्याने वरवर पाहता माणूस जसा दिसतो तसा नसतो. उदा. 'नटसम्राट' मधील शारदा जिला एखाद्या रोपट्याप्रमाणे वाढविले, जपले जाते नंतर ती सासू-सासऱ्यांना नाकारते.

**ॲडलर आणि युंग :**

यांनी न्यूनगंड व अहंगंड ह्या संकल्पनांची भर घातली उदा. न्यूनगंड म्हणत असता प्रत्येक गोष्ट मला जमणार नाही. ही भावना असते. मुली/मुले सायकल जमणार नाही. अहंगंड मी केले ही अहंपणाची युगोची भावना.

मनुष्य जन्मत : अतिशय दुबळा व पराधीन असतो. उदा. लहानपणी आई-वडिलांवर नंतर बायकोवर नंतर म्हातारा झाल्यावर मुलांवर अवलंबून असतो.

कार्ल जी युंग याने सहदायित्त्व (कॉन्ट्रिब्यूशन) कल्पना मांडली. व्यक्तीचे जसे अप्रकट मन असते तसे समाजाचे असते. समाज निरनिराळ्या प्रकारच्या दैवतकथा, कहाण्या, लोककथा व्रत-वैकल्ये, सणसमारंभ, उत्सव यांच्याद्वारा जतन करून ठेवतो. उदा. 'संक्रांती' च्या दिवशी आपण तिळगुळ वाटतो. याला लोकजीवनात खूप मोठे स्थान असते किंवा दसऱ्याच्या दिवशी सोने वाटणे होय. मुली सोळा सोमवार करतात. यामागे चांगला नवरा मिळवा असा उद्देश हे समजावे. हे अप्रकट मन होय. याठिकाणी मिळून सर्वांचे एक मन झालेले असते. येळकोट म्हणून खोबरे, भंडार उधळला जातो पण एरव्ही नाही. म्हातारे लोक कीर्तनात नाचतात पण ऐरवी नाही. याठिकाणी सहदायित्त्व असते.

**मानसशास्त्राचा वाङ्मयनिर्मितीवर मोठा प्रभाव :**

वाङ्मय निर्मितीच्या मागे मानवी मन असते. त्याचे स्वरूप स्थलकाल संकल्पनांनी सीमित केलेले असते. उदा. गंगाधर गाडगीळ, आनंद यादव या लेखकांचे मन त्या निर्मितीमागे असते. ते मानवी मन स्थळ-काळाशी निगडित असते. तो लेखक कोणत्या वातावरणात वाढला, जन्मला, त्यावरील संस्कार यातून ते आविष्कार होते.

स्थळ-काळ, प्रदेशाचे संस्कार लेखकांवर होतात. उदा. 'नटसम्राट' निर्मिती किंवा आताचे साहित्यिक दलित जीवन रेखाटतात. पूर्वी हे प्रमाण कमी होते. नागरीभागात साहित्यनिर्मिती होत होती आणि त्यांना तो-तीचे प्रेम दिसत होते.

मानसशास्त्राच्या प्रभावाने वाङ्मय आणि कलांचे अंतरंग आणि बहिरंग बदललेले. उदा. कलावाद प्रमाण मानायचा की जीवनवाद प्रमाण मानायचा हे त्या लेखकावर अवलंबून असते. १. उदा. 'भावीण' मध्ये ऋषी तरुण त्या भावीणीचा उद्धार करतो. तिच्याशी विवाह करतो. म्हणजे याठिकाणी जीवनवादाला महत्त्व आले. मला एखादे चित्र कसे असावे वाटते ते त्या लेखकावर अवलंबून राहते. उदा. 'पाणकळा' मध्ये लेखकाला रंभाजी पाटील जसा भावला/वाटला तसा रेखाटला आहे. तो वाईट आहे.

**काव्यकलांचा फ्राईडने अंतर्मनाशी संबंध जोडला आहे.**

अंतर्मनाच्या खळबळीचे चित्रण (साहित्य हे दुसरे तिसरे काही नसून अंतर्मनाच्या खळबळीचे चित्रण आहे.) उदा. 'हल्या हल्या दुदु दे' यात आमचेच लोक आम्हाला कसे गिळायला निघालेत, हे अंतर्मनातील खळबळीचे चित्रण आले आहे.

ठसठसीत प्रभावी रेखाटन अपेक्षित नाही. गुढार्थाला महत्त्व प्राप्त झाले. उदा. बा. सी. मर्ढेकर यांची 'रात्रीचा दिवस' ही कादंबरी पाहता येईल.

**मानसशास्त्रीय समीक्षा आणि साहित्य :**

१. वाङ्मय हे मनुष्याच्या मनाची जी प्रतिमा निर्माण झाली तिचा शोध घेण्याचे एक शब्दरूप साधन आहे. विसंगतीतून संगती शोधली जाते. उदा. 'मेड इन इंडिया' यामध्ये भ्रष्टाचार आहे. स्वाभाविक जीवन नाही. लोक कसे जुगार, पत्ते खेळतात, कष्टाची सवय नाही. लोक कसे आळशी बनलेले आहेत याचा शोध घेतला जातो.

२. मनुष्याच्या मनातील विचार, भावना, कल्पना, वासना, वर्तन इ. चे मूळ त्यांच्या अंतर्मनात असते. (यातून मानवाच्या, अंतरर्मनातील शोध).

३. वाङ्मयाच्या आविष्कारण पद्धतीवर परिणाम - चलचित्रपटासारखे चित्रण अनेक चित्रांची मालिका-यातून सुसंगती शोधणे. मानसशास्त्राचा परिणाम साहित्यावर झाल्याने आविष्कार शैली बदलली आहे त्याचा आपण शोध घ्यावयाचा आहे. उदा. भुजाबाचा पाटील मार खातो तो मुक्याने मार देतो. तोही मुक्याने मार खातो. उदा. राया प्रेम प्रकरण. ती त्याच्या मागे जाते. का? तर एकनिष्ठ प्रेम.

नैतिकतेपेक्षा कलात्मकतेला जवळचे चिंतन निर्माण झाले. उदा. 'शांतता कोर्ट चालू आहे', 'वाडा चिरेबंदी' यात कलात्मकता आहे. रंजू मास्तर बरोबर पळून जाते. संपूर्ण कुटूंबाची वाताहत होते. परंतु या सर्व ठिकाणी कलात्मकता आली आहे. श्लील, अश्लीलपणा असला तरी तो स्वाभाविक आहे. मुलगा-मुलगी-नात कशी वागली, यापेक्षा कलात्मकता पाहणे आवश्यक आहे.

म्हणून जुनी समीक्षा जीवनानुबंध शोधक आणि तत्त्वशोधक राहिली.

मानसशास्त्रीय समीक्षा कलावादी भूमिकेचा स्वीकार करते. थोडक्यात सौंदर्यवादाला महत्त्व देते.

**काव्य :** मर्ढेकरांनी नवकाव्य आणले. नव मानसशास्त्राचा संस्कार त्यांनी नवकाव्यात पुरेपूर दाखविला आहे.

उदा. 'पिपात मेले ओल्या उंदीर' यातून मानवी जीवन चित्रण आले आहे. मानवी जीवनाचा कोंडमारा कसा झाला. याचा उल्लेख यामध्ये आला आहे.

म्हणून काव्यात प्रतीमा, प्रतिके यांना महत्त्व प्राप्त होते व यातून साहित्यात गुढतेचे दर्शन होते. म्हणून याठिकाणी वास्तवता आणि स्वप्नरंजन यामधील सीमारेषा पुसट झाल्या. उदा. 'नक्षत्रांचे देणे' आरती प्रभू आता ते या कवितेबद्दल सांगत नाही त्यावेळेस आठवले ते तेव्हाचेच होते.

मर्ढेकरांनी शब्दांची मोडतोड केली. अंतर्मनातील जाणिरांना शब्दरूप प्राप्त करून दिले. त्यांच्या कवितेत येणारी दुर्बोधता हा दोष नाही तर काव्यातील सौंदर्याला पोषक आहे.

**नाटक :** वसंत कानेटकरांनी 'वेड्याचं घर उन्हात' मध्ये अंतर्मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'रायगडला जेव्हा जाग येते' मध्ये संभाजी पोरका होतो त्यामागील अंतर्मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**युंगप्रभाव :** मानसशास्त्रीयसमीक्षा वेगळ्या दिशेने विकसित होऊ पाहत आहे. यात युंगने हातभार लावला. त्याने सामूहिक अप्रकट मनाची संकल्पना मांडली. व प्राचीन कथा, पुराण कथा, व्रत-वैकल्ये, कहाण्या लोकवाङ्मयातील विविध कथा यातून मानवी मनाचेचित्रण आले आणि लोकसाहित्याचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कसे स्थलांतर होते, याचे विश्लेषण केले. दुर्गा भागवत, रा. चि. ढेरे, स. रा. गाडगीळ, रा. भा. पाटणकर, प्रभाकर पाध्ये, दि. के. बेडेकर, नरहर कुरूंदकर यांचे ग्रंथलेखन या संदर्भात उल्लेखनीय आहे.

१. मानसशास्त्रीय समीक्षा ही कलाकृती अंतिम न मानता त्यामागील कलावंताचे मन, त्याची धारणा, कविता निर्मितीच्या वेळची मानसिक स्थिती या साऱ्यांतून कलाकृती कशी संभवते, हे शोधण्याचा प्रयत्न करते. उदा. 'सारे प्रवासी घडीचे' हे पुस्तक लिहिणारे जयवंत दळवी 'कालचक्र' हे नाटक का लिहितात. यामागील मानसिकता शोधली पाहिजे (ज्यांना टाकले त्यांचा स्वीकार करावा) या सर्वांच्या आधाराने कलाकृतीचा शोध घ्यावयाचा.

२. मानसशास्त्रीय समीक्षेत कलावंताचे व्यक्तिमत्त्व त्याने साधलेला भावनात्मक तोल इ. चे विवेचन येते. (म्हणजेच त्याने साधलेल्या भावनिक आविष्काराचा शोध घेणे) उदा. व्यंकटेश माडगूळकर 'बनगरवाडी' ही कादंबरी का लिहितात. कारण

गरीब, दु:खी मनाचा त्यांना शोध घ्यावयाचा असतो.

३. मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीत कलाकृतीच्या माध्यमातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या निर्मितीशीलतेचा शोध घेणे महत्त्वाचे असते.

४. कवीची लेखनकालीन मनस्थिती, तिने घेतलेले कवितेचे रूप यांची शब्दचर्चेच्या आधाराने केलेली मीमांसा असते.

५. मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीत सर्जन प्रक्रियेचा जो शोध असतो तो चिकित्सक अवलोकनपर पण कलाकृतीनिष्ठ असतो.

६. सर्जकतेचा शोध घेणारे अंतदर्शन असते. उदा. माधव आचवल यांची समीक्षा

कादंबरी - 'बखर-रघुनाथाची' श्री. ज. जोशी, 'सावित्री' - पु. शि. रेगे, कविता- 'मालवून टाक दीप' सुरेश भट (स्वभावविश्लेषणावर भर -ते वैशिष्टये पूर्ण नसून अंतरंग शोधक असते. साहित्यनिर्मितीचे १. ध्येय २. स्वरूप ३. साहित्याचा आस्वाद ४. रससिद्धांत, कॅथार्सिसचे स्वरूप समजावून घेण्यासाठी मानसशास्त्राचे साहाय्य घेतले जाते.

मानसिकप्रक्रियेतून रसास्वाद घेतला जातो.

१. कलानिर्मितीचे स्वरूप मुळातच विवेचनात्मक असते. लेखकाच्या दबलेल्या वासनांना प्रकट होण्यास वाव मिळाला म्हणजे त्याला आणि अशा चित्रणाने अप्रत्यक्षपणे वाचकांचे विरेचन होऊन वाचकाला अशा दोघांनाही चित्तशांती लाभते.

मानसशास्त्रीय पद्धतीच्या समर्थकात कलेत अश्लीलतेची ओरड करणे निरर्थक आहे. कारण कोणताही कलावंत मानवी मनातील सहजप्रवृत्तीच प्रकट करतो. त्या नैसर्गिक असल्याने त्याविरूद्ध हाकाटी करणे निरर्थक आहे. उदा. 'गिधाडे', 'सखाराम बाईडर', 'अजगर' अशा पुस्तकांबद्दल जेव्हा गजबज होते तेव्हा मानसशास्त्रीय समीक्षा अशा कलाकृतीचे समर्थनच करते. मानवी मनाच्या गूढ व्यापाराची उकल करण्याचा प्रयत्न गेल्या शतकात मोठ्या प्रमाणात झाला, त्याचा फायदा समीक्षक व कलावंत दोघांनाही होत आहे. (कलावंत दबलेल्या भावना व्यक्त करतो तेव्हा त्याचे चित्त प्रसन्न होते. सहज स्वाभाविक आहे. ते आले पाहिजे. श्लील-अश्लील हेच केव्हा-केव्हा त्या कलाकृतीचा आत्मा होऊन बसतात.)

**सामर्थ्य**

१. कलावंत मानवी मनातील नैसर्गिक सहजप्रवृत्ती प्रकट करतो.

२. कलाकृतीवरील टीकेस मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती विरोध करते.

३. मानवी मनाच्या गूढ व्यापाराची उकल करते.

१. कलाकृतीतील नेणिवेचे स्थान : कलानिर्मितीतील रचनातंत्राला किंवा त्यातील कौशल्यास महत्त्व नाही.

जाणिवेतील विचारसरणीत कार्यकारणभाव अपेक्षित असेल पण नेणिवेत मनावर उमटणाऱ्या ठशाबाबत विस्कळितपणाच असणार, असे या पद्धतीत समीक्षक मानतात.

व्यक्तिरेखाटनाबाबतही रूढ निकष त्याज्य ठरत आहेत त्यात आंतरमनाला महत्त्व आणि त्यातील सूक्ष्म संघर्ष व्यक्त करणेच महत्त्वाचे आहे. विशिष्ट पात्राची मनोरचना बनण्यात कोणती परिस्थिती कशी कारणीभूत झाली. त्या पात्राच्या मनाच्या प्रकट बाजू कोणत्या व त्यांच्या मनातील अंतर्गत खळबळ कोणती याचा शोध घेतला जाऊ लागला. अहंगंड, न्यूंनगंड, भयगंड असे मानसशास्त्रातील अनेक पारिभाषिक शब्द यात सर्रास वापरले जाऊ लागले.

**भाषेसंबंधीचा दृष्टिकोण -**

साहित्य अचेतन मनाचे प्रकटीकरण असते. येथे भाषा सौष्ठत्त्वाला महत्त्व नाही. अबोध मनाचे प्रकटीकरण तर्कशुद्ध सुसंगतरीतीने होणे शक्य नाही. त्यामुळे स्वैर स्वरूपाचा संज्ञाप्रवाह आणि त्यानुसार भाषेचे स्वैर स्वरूप हे या भाषेला मान्य आहे. (अचेतन मन असते म्हणून दुर्बोधता अश्लीलता येते)

काव्याची भाषा तर्कसंगत नसून भावसंगत असते. कलेत मुख्यार्थ / सरळअर्थ नव्हे तर व्यंगार्थ / ध्वन्यार्थ महत्त्वाचा असतो उदा. 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात.'

**मर्यादा :**

प्रत्येक कलाकृती ही अचेतनमनाचा आविष्कार मानणे अतिरेकीपणाचे ठरते. भाव कवितेला जवळ येऊ पाहणाऱ्या कथेसारख्या काही वाङ्मयप्रकाराबाबत त्या कलाकृती म्हणजे गूढ मनाची स्फंदने आहेत. असे म्हणणे शक्य आहे.

नाटक, कादंबरी, आत्मचरित्र, हे वाङ्मयप्रकार पूर्वनियोजन सूत्रबद्धता याला स्थान दिले जाते तेथे गूढमनाचे दर्शन घडणारच नाही असेही नाही. (विसंगतीतून सुसंगतीशोधणे नाटक मुळातच सूत्रबद्ध असते.)

**फ्रॉईडच्या विचारसणीचा पगडा :**

मानवी जीवनातील प्रत्येक कृतीचा कामजीवनाशी संबंध असतो, ही फ्रॉईडची विचारसरणी आहे. प्रत्येक कलाकृतीची या दृष्टीने समीक्षा करणे अतिरेकी होईल.

मानवी मनाचा अलीकडे खोलवर विचार झाला तरी त्याची सर्व रहस्य अजून उलगडायची आहेत. त्यामुळे अचेतन मनाच्या गूढ व्यापारालाबद्दल विधाने करणे धाडसाचे ठरेल.

तारतम्याची गरज मानणे या अर्थाने ही पद्धत निरर्थक आणि मूलता चूक नाही. कलानिर्मिती आस्वादप्रक्रिया यांच्या मुळाशी मानसिक व्यापार असतोच, मनाचे काही

व्यापार आकलन कक्षेत येणार असतात. त्याबाबत निश्चित विधाने करता येतात. पण बरेचसे व्यापार सूक्ष्म व्यामिश्र जाणिवा नेणिवेच्या सीमारेषेवरचे किंवा त्यापलीकडचे पण असतात. कवी आपल्या परीने त्याना समोरे जातो. आस्वादाच्यावेळी कलाकृतीतून कोणते रूप (मानवीमनाचे रूप) प्रकट होते? अचेतन मनाचे आव्हान कलावंताला पेलले की नाही. याचा शोध समीक्षक किंवा रसिक घेतो. सर्व प्रक्रियेत मानसशास्त्राच्या शोधाचे अभ्यासाचे सहाय्य नक्की होते. मात्र ही पद्धती स्वीकारताना आपली प्रवृत्ती साशंक व लवचिक ठेवली पाहिजे.

## आदिबंधात्मक समीक्षा

कलानिर्मिती हा मानवी मनाचा महत्त्वाचा व्यापार आहे. कला म्हणजे मानवी मनाचा प्रतिमा-प्रतीकात्मक आविष्कार असे स्थूलपणे म्हणता येईल.या आविष्कारात मानवी मन हे त्याच्या चेतन, अर्धचेतन व निश्चेतन या साऱ्या पातळ्यांवरून कार्यशील होते. मनाच्या चेतन पातळीवरून चालणारा तो व्यापार आहे. जाणिवेच्या पातळीवरून चालणाऱ्या कृतीमागील हिशोबीपणा त्यात नसतो. तरीही कलानिर्मितीही मानवा-मानवाची एक मूलभूत गरज आहे.

ही समीक्षा कलावाद आणि जीवनवाद या दोघींना पोटात घेणारी आहे. डॉ. म. सु. पाटील यांनी ही पद्धती मांडून मनाचे नाते युगायुगाशी जोडले आहे. आदिबंधाचा उपयोग काय? आदिबंध म्हणजे मानवी सहजप्रवृत्ती. मानवी संस्कार म्हणजे सहज प्रवृत्ती (उदा. भाऊबंदकी, 'धा' चा 'मा' करणे-नारायणराव) कलानिर्मिती म्हणजे नेमके काय? तर तो मानवी मनाचा व्यापार होय. उदा. एखादयाला चित्र काढावे असे वाटले तर कला हा मानवी मनाचा प्रतिमा-प्रतीकात्मक आविष्कार आहे. (उदा. लबाड माणूस, कोल्हा-आंबटद्राक्ष).

माणूस इतर प्राण्याहून वेगळा असतो कारण तो प्रतीके निर्माण करत असतो. तेव्हा नेणिवेच्या पातळीवर जाऊन कलानिर्मितीचा इतिहास हा मानवी मनाशी संबंधित आहे. प्रत्येक धर्मांचा आदिबंध ठरलेला आहे. (हिंदू-नमस्कार) काही परंपरा या संकेतांनी ठरतात. लेखक या आदिबंधात घडलेला असतो. तो कोणत्या आदिबंधाचा वारसदार आहे हे त्याच्या निर्मितीवरून ठरते. माणूस इतर प्राण्याप्रमाणे प्राणी आहे. परंतु तो संवेदनशील आहे. इतर प्राणी स्वत:चा विकास करत नाही परंतु मानव प्राणी स्वत:चा विकास करतो. तसेच प्रतीके निर्माण करतो.

कार्लयुंग या मानसशास्त्रज्ञाने मनाचे तीन भाग सांगितले. १. चेतन मन २. वैयक्तिक चेतन ३. सामूहिक चेतन.

हे चेतन मन वैयक्तिक चेतन आणि सामूहिक चेतन यांच्या मदतीने प्रतिमा प्रतीकांची निर्मिती करते. ही होणारी निर्मिती काहीशी दिवास्वप्नांसारखी असू शकते.

त्यातून व्यक्तिगत जीवनातील विसंवाद, आशा-आकांक्षा प्राधान्याने आविष्कृत होतात. व अशा कलाकृतीमधून व्यक्तीचे चेतन मन व निश्चेतन मन यांचा मेळ साधण्याचा प्रयत्न असतो. अशा कलाकृतीला मर्यादा असतात. ती काही व्यक्तींच्या समग्र मनाची आविष्कारक कृती नसते. या दोन पातळ्या पलीकडे अवशिष्ठ असलेला मनाचा बराचसा भाग त्यात येतो असे नाही.

सामूहिक निश्चेतनाचा हा स्तर प्रवृत्तीमूलक वर्तन रूपांशी निगडित असतो. माणूस सामाजिक व्यक्ती म्हणून अधिकाधिक जगू लागला. माणूस समाजमान्य श्रद्धांना, विचारांना, परंपरांना व चालीरीतींना सांकेतिक प्रतिसाद देत वावरत असतो. व त्या प्रतिसादातून सांस्कृतिक गट निर्माण होतात. त्यात एखाद्या गटाबाहेरील माणूस आला तर त्याला किती अवघड वाटते हे आपणाला समजून जाते. त्याला संकोचल्यागत वाटते. त्यातील चैतन्य सुकून जाते.

युंगचे आदिबंध माणसाच्या मनाच्या रचनेमध्येच निहित असतात. म्हणून तो त्याचे वर्णन अनुभवपूर्व जन्मजात, अंत:स्फूर्त संज्ञारूपे असे करतो. मूल जन्माला येताच त्यांच्यावर (अनेक संस्कार होतात) होणाऱ्या संवेदनांच्या माऱ्याला ते सामोरे जाते. ते या अनुभव सामुग्रीनिशी त्याला लहानपणातच अनेक गोष्टी शिकायला मिळतात. त्यामुळे अनुभव विश्व समृद्ध होते. त्याचे मन कोऱ्या पाटीसारखे असते. नंतर जे संस्कार झाले आहेत ते विकसित होतात. (उदा. चोरी करू नये.)

कलाकृतीचा आस्वाद घेत असताना आदिबंधाचा उपयोग होत असतो. आदिबंध म्हणजे सहजप्रवृत्तीचे चित्ररूप होय. सहजप्रवृत्ती आणि आदिबंध यातील फरक त्यांनी सांगितला. ज्यांना आपण खऱ्या अर्थाने सहजप्रवृत्ती म्हणतो त्या शरीरप्रेरणा असतात. आणि त्या ज्ञानद्रियांना जाणवतात. म्हणून आदिबंधाचा आकृतीबंध सहजप्रवृत्तीच्या आकृतीबंधाप्रमाणेच आनुवांशिक, सर्वत्र सारखा व नियमित असतो. उदा. पाने कातरणाऱ्या, मुंग्यांची सहजप्रवृत्तीमूलक कृती म्हणजे झाडाची पाने कुरतडणे (आनुवांशिकता) म्हणी, उखाणे, हे लोकसाहित्यातून आलेले आदिबंध आहेत. (उदा. घरोघरी मातीच्या चुली) हे आकृतीबंध आहेत. ते एका व्यक्तीचे नव्हेत. ते पूर्वीपासून आलेले आहेत. (उदा. दैवतकथा, देवी-चप्पल काढून जाणे ही श्रद्धा)

युंगने आदिबंधाच्या पाच पायऱ्या सांगितल्या.

१. अनिमा २. अनिमस ३. वाईज ओल्डमॅन ४. मदर ५. आर्किटाइप ऑफ कॉनशसनेस.

**१. अनिमा :**

पुरुषाच्या ठायी असलेली स्त्री प्रतिमा व स्त्रीत्वाचे अंग होय. या प्रतिमेच्या मुशीत तो त्याच्या संपर्कात येणाऱ्या स्त्रियांचा अनुभव घेतो. त्यांच्यावर ही प्रतिमा तो प्रक्षेपित करतो. तिचा आविष्कार तरुणी, देवी, देवदूत, एकनिष्ठ सोबती, राजकन्या,

चेटकी, विरांगणा अशा रूपात करतो. गाय, मांजर, जहाज, गुहा वगैरे तिची प्रतीके मानता येतील.

**२. ॲनिमस :**

यामध्ये स्त्रीमधील पुरुष प्रतिमा वा पुरुषत्त्वाचे अंग होय.

**३. व्हाईज ओल्डमॅन :**

वृद्ध आप्त म्हणजे प्रत्येकाच्या ठायी असलेला सल्लागार. तो गुरू, मांत्रिक, वैद्य, इ. च्या रूपात प्रकट होतो. त्याचे स्वात्मरूपाशी नाते असते. स्वात्मरूपाचे आविष्कार विकसित फुल, मुल, सूर्य वगैरे रूपात होताना दिसतात. उदा. नातवाबाबतचे आजोबांचे प्रेम होय.

**४. भूमी (मदर) :**

भूमी, नांगरलेली जमीन, खोल विहीर, कलशाकार भांडी गुलाब, कमळ यासासारखी गर्भाशयाची असलेली प्रतीके आपल्यापुढे मातेच्या रूपातून व्यक्त होतात.

**५. आर्किटाईप ऑफ कॉन्शसनेस :**

बायबलमध्ये सांगितले आहे की, शद्धानेच देवाने जग केले किंवा ब्रह्मदेवाने पृथ्वीतलावरील सृष्टी निर्माण केली. ज्या त्या धर्माचे, संस्कृतीचे, आदिबंध ठरलेले असतात. हे सर्व रूढी, परंपरा, चालीरीती यावर ठरलेले असतात. उदा. लग्न कोणाबरोबर करावे.

आदिबंधात्मक समीक्षा पद्धती ही दुसऱ्याचे बोट धरून चालणारी पद्धती आहे. यापद्धतीमध्ये वेगवेगळे आदिबंध तयार होत असताना जेव्हा जेव्हा संस्कृतीचा नाश होतो. तेव्हा तेव्हा एखादी शक्ती निर्माण होते व या पद्धतीला महत्त्व प्राप्त होते. या आदिबंधात्मक समीक्षापद्धतीला शास्त्राचे आधार नाहीत.

प्राक्कथात्मकांचा निर्देश यामध्ये वीर नायकांची सवय असते. आदिबंध हे आपल्यावरील सहज संस्कार आहेत.

पित्याची हत्या करणारा आणि मातेच्याही मृत्यूस कारणीभूत होणारा राजा इडिपस हा संज्ञा क्षेत्राचाच प्रवासी आहे. या दोघांची मरणे प्रतीकात्मक मानली तर राजा इडिपसची वृत्ती ही अंड्याचे कवच फोडून बाहेर येणाऱ्या पिलासारखी आहे. संज्ञेच्या विकासक्रमात आईवडिलांच्या प्रभाव क्षेत्रातून कोश कीटकाप्रमाणे बाहेर यावेच लागलेल्या कोशाचा भेद करावाच लागतो. पाश्चात्य संस्कृतीत इडिपस हे या प्रकारचे पहिले प्रतीक आहे. त्यास या कृतीने संज्ञेला मुक्त विकासाला अवसर मिळतो आणि त्याबरोबर दु:खेही येतात. त्याचा तो मोठ्या सहनशीलतेने स्वीकार करतो.

त्याच्या हातून घडलेल्या पापाचे तो प्रायश्चित घेतो. तेव्हा त्याच्या माध्यमातून संज्ञाशील होण्याच्या वेदना साकार होतात. त्या भोगीत वणवण भटकताना तो जेव्हा भूगर्भात विलीन होतो. तेव्हा जणू चिरशांती देणारी महामाता त्या थकलेल्या मुलाला आपल्या विश्राब्ध कुशीचा आधार देते. त्याला आपल्या आश्वासक कोशात सामावून घेते. अशा ठिकाणी मृत्यू म्हणजे विनाश, असे समीकरण अभिप्रेत नसते. मृत्यू म्हणजे आपल्या मातेकडे परत जाणे, पुन्हा जन्मण्यासाठी गर्भकोशात विलीन होणे, थकल्या-भागल्या जीवनाला गतिमान करण्यासाठी आपल्या मूलस्त्रोताशी, जीवनकंदाशी संपर्क साधणे होय. अशा प्राक्कथात्मक निर्मितीतून.

संज्ञेच्या आदिबंध आविष्कृत झाल्याचे दिसेल. विकासाशी नाते सांगणाऱ्या आपल्याकडील काही प्राक्कथांचा निर्देश करता येईल. उदा. १) सर्पमाता, कद्रू व गरूडमाता विनता यांच्या कथेत कद्रू हे सहजप्रवृत्तीचे प्रतीक वाटते. तर विनता ही संज्ञाकंदाचे रूप घेते. विनतेला कद्रूचे दास्य भोगायला लावणे या घटनेचा यामुळे अन्वयार्थ लागू शकतो. त्याच विनतेच्या पोटी पहिला मुलगा येतो. तो पांगळा अरूण हा प्रकाशाचा अग्रदूत संज्ञेच्या पहाटेची सूचना देणारा म्हणता येईल. तिचा दुसरा पुत्र गरूड मात्र जन्मत:च आकाशभरारी मारून देवांमध्येही घबराट निर्माण करतो. स्वर्गातून अमृतकुंभ आणतो व विनतेची संज्ञाकंदाची सहजप्रवृत्तींचा दास्यातून सुटका करतो. या पराक्रमामुळे जणू मानवी जीवनात संज्ञासूर्याचा उदय होतो. आपल्याकडील दशावतारांच्या कथा मानवाच्या उत्क्रांतीची कहाणी सांगतात की काय, असे वाटते. त्यापैकी परशुराम हा मातृहत्या करताना दिसतो. राम व श्रीकृष्ण माता-पित्यापासून विलग होऊन वाढत, विकसत जातात. या वीरनायकांचे पराक्रम पाश्चात्य कथांतील "ड्रॅगॉन फाईट"ची आठवण करून देतात.

२. रामाच्या जीवनात भूगर्भातून जन्मलेली म्हणजे सामूहिक अचेतनातून उदित झालेली सीतेसारखी एक रत्नगर्भ जाणीव विलसत राहते. पण कैकयी ही त्याच्या बाबतीत "टेरिबल मदर"चे रूप घेते आणि सीतेसह आणि लक्ष्मणसारख्या "हेल्पफुल स्पिरीट" सह त्याला अचेतनाच्या वनात ढकलते. तेथे त्याला अनेक राक्षसांशी सामना करावा लागतो. शेवटी अनिमाची प्रतिमा असलेल्या सीतेला या अचेतनातून उदित झालेला दहा तोंडाचा रावण ग्रासू लागतो. त्याच्या तावडीत सापडून ती दक्षिणेकडील अचेतनाच्या प्रदेशात लुप्त होत जाते. तेव्हा जन्मल्याबरोबर सूर्याकडे झेपावणारा संज्ञासन्मुख होणारा हनुमान रामाचा वृद्ध आप्त होतो आणि सीतेला शोधून काढतो. या प्रक्रियेत तो रामाचा निश्चेतनाशी तुटलेला संबंध पुन्हा जोडून देतो. त्याचबरोबर कदाचित नरत्वाबद्दल नि:शंकता नसलेल्या प्राण्याला, वानराला नरत्व प्राप्त झाल्याचेही दर्शवितो. रावणाच्या बंदिवासातून मुक्त होताना सीतेला करावे लागणारे अग्निदिव्य म्हणजे निश्चेतनातून चेतन पातळीवर, प्रकाशाच्या जगात येण्याची प्रक्रिया म्हणता येईल. रामाचे तिच्याशी मिलन होताच तो पूर्ण पुरुष होतो खरा, पण

तो व्यक्ती म्हणून जगण्यापेक्षा लोकांसमोर आदर्श राजा म्हणून आपली प्रतिमा उभारून ती सार्थ करीत जगत राहतो. या प्रक्रियेत त्याच्या व्यक्तित्वाची समग्रता टिकून राहत नाही. तो शबलित होतो आणि त्यामुळे निश्चेतनातून उदित झालेली सीता पुन्हा वनवासात जाते आणि मानवी संस्कृतीचे आदिगान गाणाऱ्या जुळ्या संज्ञांकुरांना जन्म देऊन भूगर्भात विलीन होते. लग्नसोहळा विवाह हा कितीही शूद्र व्यक्तीचा असला तरी आपली लोकगीते त्याला रामसीतेच्या वा कृष्ण रूक्मिणीच्या विवाहाची प्रतिष्ठा देतात. गोविंद प्रभूना विवाहप्रवृत्ती झाली असता महदंबा धवळे गाते ते रूक्मिणीच्या विवाहाचे. याचे कारण केवळ पंथीय नाही. त्यातील पंथातील आशयही लक्षात घेतला पाहिजे. तारुण्यात पदार्पण करणारे आपले नायक हे धनुर्गभाचा, कालिया मदनाचा वा कंस वधाचा पराक्रम होणाऱ्या रामकृष्णांच्या प्रतिमेत भावले जातात. कर्णासारखा पोरका नायक स्वपराक्रमाने विकसत जातो आणि संज्ञालाभाच्या साऱ्या वेदना अति संवेदनशील मनाने उराशी बाळगीत जगताना तोल सावरता न आल्यामुळे आत्मविकाराचा धनी होतो. त्याच्या रथाचे चाक शेवटी पृथ्वीने गिळावे, हे या संदर्भात लक्षणीय ठरते.

सामूहिक निश्चेतनातून उदित होणाऱ्या, त्याला झपाटून टाकणाऱ्या, त्याच्या मनगुटीवर बसणाऱ्या भूतांना बांधून टाकतो. म्हणूनच आदिम समाजात अशा माणसांना मांत्रिकाची वा ''शामान''ची प्रतिष्ठा प्राप्त होते. म्हणजेच भूत काढणाऱ्या माणसावर विश्वास ठेवतात.

अशा कलाकृती कोणताही विशिष्ट परिणाम साधण्यासाठी, विशिष्ट हेतूसाठी जन्माला येत नाही. त्या उत्स्फुर्त असतात. त्याचा जन्म एका प्रकारे पाहता जगण्याच्या प्रेरणातून होत असतो. एखाद्या कलाकृतीचा आकृतीबंध आदिबंधात्मक आहे कि नाही हे कसे ओळखायचे, याचे उत्तर देणे कठीण, पण या आकृतीबंधाने युक्त असलेल्या कलाकृतीचे काही विशेष नोंदविता येतील. त्यापैकी एक विशेष असा की, या कलाकृतींना आपण देतो तो प्रतिसाद आदिबंधात्मक असतो.

प्राक्कथा केवळ एका व्यक्तिमनाची निर्मिती नसते. त्यातून समाजाची संवेदनशीलता वस्तुगत झालेली असते.

तसेच ज्यावेळेस जीवनमूल्यांचा नाश होतो, ऱ्हास होतो त्यावेळेस समाज क्रांतिकारक निर्माण होतात. त्यावेळी बंडखोर वीरनायक हा जीवनमूल्यांच्या प्रतिष्ठेसाठी झगडत असतो. त्यातून नव्या जाणिवा, नवी मूल्ये आपले डोके वर काढू लागतात. जीवनांचे क्षितिज रूंदावत जाते. भान वाढू लागते. (उदा. म. फुले, डॉ. आंबेडकर) अशी अशायसूत्रे युगानयुगे आवृत्त होताना दिसतात. ही आवृत्ती त्यांच्या आदिबंधात्मक रूपाची द्योतक आहे. (कविता, नाटक)

यादृष्टीने पाहता आपल्या काळातील सांस्कृतिक मूल्याविरूद्ध वा अधिक अचूक म्हणायचे तर मूल्यविपर्यासाविरूद्ध बंड करून उठलेले ज्ञानदेव वा तुकाराम यांच्या

काव्यांतील प्रतिमा वीरनायकांच्या आकृतिबंधात जाणवू शकतील. हरिभाऊचे गणपतराव वा भाऊ यासारखे नायक या आदिबंधाशी थोडेफार जुळते वाटतील. भालचंद्र नेमाडे यांच्या पांडुरंग सांगवीकर याच जातीचा पण प्रतीनायक असल्याचे जाणवेल. त्याची माफक बंडखोरी आणि शरणागती या दृष्टीने लक्षणीय ठरेल.

या सहजप्रवृत्ती कलाकृतीतून निर्माण होतात. 'गोतावळा' मधील सेल्समन मिशा काढणारा आहे म्हणजे संस्कृती नाकारणारा आहे.

**सारांश :**

तात्पर्य कोणत्याही कलाकृतीचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन करण्यासाठी आपणाला आदिबंधात्मक समीक्षेचा आधार घेता येऊ शकेल. तसेच ही समीक्षा पद्धतीही कलावाद व जीवनवाद यांना कवेत घेते व आपले नाते युगायुगाशी जोडले जाते. हे आपणास वरील विवेचनावरून लक्षात येईल.

***

## चरित्रात्मक समीक्षापद्धती

सात्यिकृतीचा परिचय, आस्वाद, सामर्थ्य जाणून घेण्यासाठी ज्या काळात ती निर्माण झाली. ती जाणून घेणे आवश्यक ठरते. साहित्यकृतीचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन करणे. कलाकृतीचा आस्वाद घेणे व कलाकृतीची श्रेष्ठ कनिष्ठता ठरविणे महत्त्वाचे. कलाकृतीचे आकलन करून घेणे, हा साहित्यकृतीचा उद्देश असतो. ते आकलन कलाकृतीच्या आस्वादाला पूरक असते. त्यासाठी एकाच कलावंताचे पुस्तक वाचून भागणार नाही. सर्व समीक्षा पद्धतींला स्पर्श केला पाहिजे. कलावंताची कलाकृती समजावून घेत असताना कलावंताला समजावून घेतले पाहिजे तरच ती कलाकृती आपल्याला चांगल्या प्रकारे समजेल. त्याचे खाजगी जीवन पाहायचे नाही तर वाङ्मयीन जडणघडण पाहणे -उदा-आनंद यादवांची कलाकृती समाजावून घेताना त्यांची जडण-घडण कशी झाली ते पाहणे. उदा. 'गोतावळा' मध्ये नारबा ही व्यक्तिरेखा रेखाटली आहे. तर हा नारबा दुसरा-तिसरा कोणी नसून तो स्वत:आनंद यादवच आहेत, असे वाटते. किंवा गोखले यांच्या कथा-कादंबऱ्यामध्ये तो-तीचे प्रेम आहे. कारण त्याची जडण-घडण याठिकाणी विचारात घेणे आवश्यक आहे. तात्पर्य यादव समजून घेतल्यानंतर त्यांच्या कलाकृती समजू शकतात.

लेखकाचे चरित्र आणि कलाकृतीचा अन्योन्य संबंध असतो. कलाकृती ही लेखकाचे अपत्य असते. उदा. विभावरी शिरूरकरांचे चरित्र पाहणे आवश्यक आहे. त्याची जडण घडण कशी झाली हे पाहणे आवश्यक आहे. बालपण कसे गेले, कोणाचा प्रभाव पडला. शैक्षणिक जीवन तसेच त्यांनी विधवांच्या शाळेत विद्यादान करण्याचे काम केले म्हणून त्याठिकाणी त्यांना स्त्री समस्या समजल्या. उदा. बलुतं-दया पवारांचे 'बलुतं' पाहताना त्यांचे बालपण कोठे गेले. नगर, अकोला, कावाखाना, आईला कसे-कसे काम करावे लागले कसा-कसा अपमान सहन करावा लागेल. त्याना समाजाकडून कशी वागणूक मिळाली, हे समजल्यानंतरच आपणाला त्याचे 'बलुतं' समजेल.

एखाद्या कलावंताची कलाकृती समजावून घेण्याइतपत त्याचे वाङ्मयीन भावविश्व शोधा. त्याचे खाजगी जीवन शोधत बसू नये. अधिक ढवळा-ढवळ करू नये उदा. 'गडकरी' हे मद्यपान करत होते आणि मग त्यांचे 'एकच प्याला' समजावून घेताना आपण त्यांचे मद्यपान करण्याकडेच जर लक्ष द्यायला सुरुवात केली तर आपणाला त्याचे नाटक समजणार नाही म्हणजेच 'एकच प्याला' नाटक समजण्यासाठी लेखक

समजावून घेतला पाहिजे जर त्यापुढे गेलो तर साहजिकच त्याठिकाणी एकांगीपणा आल्याशिवाय राहणार नाही. वि. स. खांडेकर समजावून घ्यायचे असेल तर त्यांची जडण-घडण पाहणे आवश्यक आहे. त्यांच्यावर गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव होता. गांधीजीने 'खेड्याकडे चला' हा मंत्र दिला होता तसेच खांडेकरांचे खेड्यात वास्तव्य झाले. तेथील माणसांचे गुण-दुर्गुण यातून त्यांची जडण घडण झाली. उदा: 'अमृतवेल' या कादंबरीतील या नायिकेला नंदाला खेड्याकडे जाण्यासाठी सांगतात. त्याठिकाणी तिचे मन रमेल असे ते का म्हणतात? कारण गांधीचा प्रभाव हे आपल्या लक्षात येते.

फ्रेंच टीकाकार ड्राव्हडन-जॉन्सन यांनी या संदर्भात विचार मांडले यामध्ये त्यांनी लेखकाच्या घडणीला महत्त्व दिले. उदा. शिरवाडकर यांनी 'विशाखा' काव्यसंग्रह लिहिला. त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता. तसेच बालकवींना रे. टिळकांनी आश्रय दिला. आणि ठोंबरे हे नाव ठेवले.

लेखकाच्या वाङ्मयीन लेखनाला विशेष महत्त्व दिल्याने कलाकृतीच्या गुणांकडे दुर्लक्ष होते. उदा. 'बळी' कादंबरीचे परीक्षण करताना आपण जर विभावरीलाच महत्त्व दिले. किंवा त्यामधील 'बारणे' हीच व्यक्तीरेखेभोवती फिरू लागलो तर साहजिकच त्या कलाकृतीच्या गुणांकडे दुर्लक्ष होते.

लेखकाच्या कलाकृतीचा शोध आकलन, मूल्यमापनापेक्षा जास्त शोध घेतला तर मूल्यमापनाला उणेपणा येतो.

कलाकृतीचे मूल्यमापन करताना समतोलपणा साधला पाहिजे. व त्याप्रमाणे त्या कलाकृतीचे आकलन, आस्वाद, मूल्यमापन झाले तरच आपणाला सौंदर्याचा अनुभव येईल.

कलावंत आणि कलावंताची कलाकृती यांच्यात असणारे अन्योन्य नाते यासाठी ही समीक्षा उपयोगी पडते. उदा. १. एस. एम. कानडे - 'आनंद यादव व्यक्ती आणि वाङ्मय' २. रवींद्र ठाकूर- 'र. वा. दिघे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' ३. उषा शिंदे - 'विभावरी ४. नागनाथ कोत्तापल्ले - शंकरराव पाटलांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास'.

साहित्यकृतीचा परिचय, आस्वाद, यामध्ये जाणून घेण्यासाठी ज्या काळात ती निर्माण झाली. ती जाणून घेणे आवश्यक ठरते. कारण कवी काळाचे अपत्य असतो. असे कार्लाईल म्हणतो. कवी किंवा कलाकृती यांची पाळेमुळे विशिष्ट कालखंडात रूजवलेली असतात. ती जाणून घेण्यासाठी कलाकृतीची समीक्षा पूर्ण होत नाही. या आग्रहापोटी ऐतिहासिक समीक्षेला महत्त्व आले पण तिने कलाकृतीचे रहस्य व सौंदर्यपुरतेपणी प्रतीत होत नाही. याची जाणीव होऊ लागली. कवी म्हणजे केवळ काळाचे अपत्य नव्हे कविता ही काळाची दस्तऐवज नव्हे. कोणत्याही साहित्यात समाजाचे अगर परिस्थितीचे साद-पडसाद उमटतात. असे निखालसपणाने म्हणता

येत नाही. युद्धांच्या ज्वालांनी भडकलेला कालखंड अजूनही त्याचे चित्रण न करणारी कविता कवी लिहू शकतो म्हणून कलाकृतीचा संबंध काळापेक्षा कलावंताच्या जीवनाशी, जीवनातील घडामोडीशी अधिक असतो. यासाठी कलाकृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने लेखकाच्या जीवनाला, त्यातील घडामोडीला महत्त्व असते. असा अग्रह धरणाऱ्या लोकांनी चरित्रात्मक समीक्षा पद्धतीला प्रतिष्ठा दिली. कलाकृतीच्या संदर्भात कवीचे चरित्र व जीवनक्रम यालाच महत्त्व असते. त्यांच्या आयुष्यात कशा, कोणत्या घटना घडल्या. यावर त्याचा आयुष्यविषयक दृष्टिकोण ठरतो. त्याचा स्वभाव, संगत यातून कलाकृती जन्म घेते. घटना एक असली तरी कलाकृतीत त्याचे वेगवेगळे आविष्कार होतात. याचे कारण कवीचे आयुष्य व व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. म्हणून कलाकृतीच्या आस्वादात ही समीक्षा अधिक उपयोगी ठरते.

रोमॅन्टिक स्वरूपाच्या साहित्यात निर्माता व निर्मिती यात अतूट नाते असते. अथवा शब्दाच्या साह्याने काढलेले गोचर चित्र असते. रोमॅन्टिक साहित्यातून त्याचा निर्माता अधिक व्यक्त झालेला असतो. तो स्वत:च्या जीवनात रंगतो आणि तो रंग साहित्यात उधळतो. (गोविंदाग्रज) विविध माध्यमातून रोमॅन्टिक कवी स्वत:ला व्यक्त करतो. त्यामुळे आत्मनिष्ठ स्वरूपाच्या काव्यात चरित्रात्मक पद्धती उपयोगी ठरते. पटवर्धनांची कविता हे त्यांचे उत्तम उदा. होय. त्यांची कविता म्हणजे व्यापक अर्थाने कवीच्या आयुष्यात कडू व गोड अनुभवांची काव्यात्म अभिव्यक्ती आहे. बालकवींच्या अनेक नैराश्यपूर्ण कविता,गोविंदाग्रजाच्या कविता या अंत्यतिक आत्मनिष्ठेच्या रोमॅन्टिक मनोवृत्तीच्या असल्याने त्यांचा उलगडा व आस्वाद ऐतिहासिक पद्धतीपेक्षा चरित्रात्मक पद्धतीने चांगल्या प्रकारे घेता येतो. गोविंदाग्रज विदर्णबालेस.

**''केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठी ।**
**त्या ऱ्हदयाला तुडवूनी गेलीस, नटव्या थाटांसाठी ।।**
**होईल होईल वाटत होते, तेच अखेरीस झाले ।**
**नाव ठेवण्या वाचूनी आता मनात झुरणे आले ।।**

या ओळी चरित्रात्मक समीक्षेचा आधार घेतल्यावर अधिक स्पष्ट होतील म्हणून चरित्रात्मक पद्धती ही कलाकृतीला अधिक न्याय देऊ शकेल. असा या भूमिकेचा आग्रह आहे.

साहित्य आणि साहित्यिक यात बिंब-प्रतिबिंब संबंध असल्याने किंवा बीज वृक्ष असे नाते असल्याने यातील परस्परसंबंध चरित्रात्मक पद्धतीने प्रस्थापित करता येतो. मोरोपंताच्या श्लोक केकावलीचा आपणास कवी चरित्राशिवाय नीट उलगडा होणार नाही म्हणून ही पद्धती अधिक उपयुक्त मानली जाते.

चरित्रात्मक समीक्षेची प्राणतत्त्वे :

१. सर्वप्रथम लेखकांचा समाज, भोवतालची परिस्थिती यांचा अभ्यास आवश्यक

असतो. त्याचे पूर्वज, नातेवाईक, मित्र, गुरु त्या काळची महाप्रभावी व्यक्ती याचा त्या चरित्राच्या संदर्भात समीक्षक अभ्यास करतो.

२. लेखकाच्या ऐन उमलल्या तारुण्य काळी त्याच्या प्रतिभेला अंकुर फुटण्याच्या काळातील त्याच्या मित्रमंडळींची माहिती करून घ्यावी. (रविकिरणमंडळ) इंग्रजी साहित्याच्या इतिहासात अशी लेखक मित्रमंडळी प्रसिद्ध आहेत.

३. लेखकाचा लैकिक जीवनक्रम तपासून घ्यावा.

४. त्यानंतर साहित्याला पूरक असणारी लौकिक माहिती जाणून घ्यावी.

५. त्याच्या पहिल्या कलाकृतीची तपासणी करून गुण-दोष आजमावणे यातून त्याच्या भावी यशापयशाची अगर दौर्बल्याची बीजे सापडतात. कोलरिजने सेक्सपिअरच्या पहिल्या कृतीचा व जीवनाचा अनुबंध शोधण्याचा प्रयत्न केला होता.

६. लेखकाच्या चरित्राची व जीवन कार्याची माहिती घ्यावी.

७. लेखन व चरित्र यातील घटनांचा अन्वयार्थ स्पष्ट करावा.

८. त्या संगतीद्वारा लेखकाला अभिप्रेत असलेल्या भावविश्वाचा अर्थ स्पष्ट करावा.

या पद्धतीने कलाकृतीतील भाववृत्तीच्या रहस्याचा शोध घेता येत नसेल तेव्हा चरित्रातील कांही घटनांच्या आधारे उलगडा होतो का ते पहावे. नाथमाधवाच्या पहिल्या व नंतरच्या कादंबरीत तो बदल दिसतो. तो त्याच्या चरित्राची माहिती करून घेतल्या खेरीज समजणार नाही. एवढेच नव्हे तर अनेकदा कलेत प्रकटलेल्या भाववृत्तींच्या आधारे लेखकाच्या चरित्राविषयी अनुमान काढता येते. उदा. खांडेकरांच्या साहित्यात ध्येयवादी व त्यागी पात्रे आढळतात. त्या आधारे त्यांच्या चरित्राचे अनुमान करता येते. एखाद्या साहित्यकृतीतून काही गोष्टीविषयी लेखकाचा तिरस्कार स्पष्ट दिसतो. त्याच्या जीवनाची यथार्थ माहिती असल्याशिवाय, हे कळणार नाही. स्त्रीविषय अनुदार चित्रण करणाऱ्या बायनरला त्याच्या व्यक्तिगत आयुष्यातील आलेल्या कडवट भावनांचा भाव होता. गोविंदाग्रजाच्या आयुष्यातील त्यांच्या प्रेमभंगाची छटा त्याच्या कविततेत उमटली. तर ताब्यांच्या कवितेत त्यांच्या जीवन तृप्तीचे वर्णन आहे.

**मर्यादा :**

१. यात लेखकाच्या जीवन निरीक्षणासाठी हवी ती सोय नसते आनुवांशिक संस्कार लेखकावर किती पडतात ते सांगता येत नाहीत. अनेक श्रेष्ठ साहित्यिकांचे जननी जनक, सामान्य-गरीब, माणसे होती. असे दिसते. मिल्टनचा बाप सामान्य मोची होता. तेव्हा प्रतिभावंताच्या वंशातच प्रतिभावंत जन्मतात हे सिद्ध करता येत नाही.

२. काही लेखक आपले चरित्र आपल्या लेखनातून व्यक्त होऊ देत नाहीत. अशा वेळी ही पद्धती उपयुक्त ठरत नाही.

३. लौकिक चरित्र उपलब्ध नाही. पण वाङ्मय उपलब्ध आहे. अशा भूतकाळातील साहित्याबद्दल ही पद्धत उपयोगी ठरत नाही.

४. या पद्धतीत लेखकाच्या चरित्रावर वाजवीपेक्षा अधिक भर दिला जातो. कलाकृतीच्या निर्मितीच्या दृष्टीने हे चूक आहे. कारण कलाकृती म्हणजे समाजाचे नानाविध प्रसंगाचे संवेदनाशील मनाने घेतलेल्या अनुभवांचे चित्रण असते. तिचा शोध केवळ चरित्राच्या आधारावर घेऊ नये.

५. त्यातही एखादा समीक्षक केवळ चरित्रातील दोषांचा आधार होतो. उदा. गडकरी 'धुम्रपान' स्मशान इ.

६. अनेक कलावंत एखादा दृष्टांत अलकार गौण स्वरूपाचा मार्मिक उल्लेख करतो. समीक्षक तोच त्याच्या चरित्राशी जोडण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे या पद्धतीचा वापर करताना तारतम्य ठेवावे.

**सारांश :**

साहित्याच्या अभ्यासात उपयुक्त ठरेल एवढीच लेखकाच्या जीवनाची माहिती समीक्षकाने घ्यावी. अनावश्यक तपशिलात शिरून लेखकांची लक्तरे बाहेर काढू नयेत. कोणताही लेखक आपल्या साहित्यात आपल्या जीवनाचे पूर्ण चित्र उमटवत नाही लेखक म्हणून संपूर्ण आयुष्यात मी कोणाला कळलो नाही असे गडकरी म्हणाले.

एका कवीने म्हटले आहे की, 'माझी किंमत माझ्या पुस्तकांवरून करा.'' विंचेस्टरच्या मते 'जीवनावरून साहित्याचे अनुमान करण्यापेक्षा साहित्यावरून जीवनाचे अनुमान करावे. हे अधिक चांगले ठरेल. लेखकाची मते आधी माहीत झाली तर दृष्टी पूर्वग्रहदूषित होऊन टीकेत न्यायपूर्णता राहत नाही. म्हणून लेखकाच्या जीवनात आवश्यक तेवढेच डोकावण्याचे भान टीकाकारास राहणे हे या पद्धतीत आवश्यक आहे.

***

# ऐतिहासिक समीक्षा

**प्रश्न :** ऐतिहासिक टीका पद्धतीचे स्वरूप:

१. वाङ्मयाचा सामाजिक परिस्थितीशी घनिष्ठ संबंध असतो. भूतकाळातील आकलनासाठी तत्कालीन समाज प्रवाहाचे स्वरूप जाणून घेणे इष्ट असते. एखाद्या कलाकृतीच्या निर्मितीच्या काळी कोणती ऐतिहासिक परिस्थिती होती व कलावंताच्या भोवतालच्या जगात कोणते विचार प्रचलित होते हे पाहून त्या कलाकृतीचा अभ्यास करणे हे ऐतिहासिक समीक्षापद्धतीचे मुख्य कार्य आहे. उदा. १. 'विरहतरंग' मध्ये प्रभाकर आणि इंदू विवाहबद्ध झालेले लेखक दाखवत नाही. कारण त्या काळात एका विधवेने एका अविवाहित तरुणाशी लग्न न करणे ही पद्धत होती. हा निकष समोर ठेवून लेखकावर त्याकाळाची आचारसंहिता कळत नकळत असते. २. गीतारहस्य-सारख्या ग्रंथाची निर्मिती होण्या पाठीमागचे कारण त्या काळात पारतंत्र्य होते. आणि लोकांची जागृती घडवून आणण्याचा उद्देश होता. ३. निबंधमाला (विष्णुशास्त्री चिपळूणकर) समजावून घ्यावयाची असेल तर त्यावेळेची ऐतिहासिक परिस्थिती पाहणे आवश्यक आहे. लोकांना इंग्रजांची गुलामगिरी आवडत होती. त्याठिकाणी लाचारी होती (शलॉट) ४. 'कीचकवध' पाहताना 'कर्झन' इंग्रजाचे वर्तन कीचकासारखे होते. भारतीयांचे शोषण आणि त्याच्याविरूद्ध बंड पुकारणे.

२) तत्कालीन परिस्थितीचा युगधर्माचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. ऐतिहासिक पद्धतीने ते करता येते. एतिहासिक टीकापद्धतीत लेखकाच्या जीवनचरित्राबरोबर तत्कालीन, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक विचारांच्या पार्श्वभूमीवर कलाकृतीचे परीक्षण केले जाते. उदा. 'शारदा' तत्कालीन परिस्थितीमध्ये स्त्रीचे स्थान कसे होते. त्यांचा उद्धार झाला पाहिजे. म्हणून भुजंगरावाला बाजूला सारून कोदंड शारदेबरोबर विवाह करतो. लेखकाच्या निर्मितीवर त्या सामाजिक, धार्मिक परिस्थितीचे परिणाम होतात. उदा. 'झाडाझडती' त्याकाळामध्ये धरणग्रस्तांचे प्रश्न निर्मिती उदा: 'झेलझपाट' (मधूकर वाकोडे) पर्यावरणाचा तोल सावरण्यासाठी अभयारण्ये आवश्यक आहे. (लेखकाची जीवन धारा ही त्या काळात घडलेली असते, परिस्थिती कशी).

३) ड्रायडनच्या मते प्रत्येक समाजाची व काळाची स्वत:ची अशी प्रतिमा असते. अन्न, जलवायू, यांचाही मनुष्य स्वभावावर प्रकाश पडतो. भिन्न काळी, भिन्न प्रदेशात, भिन्न मानसिक प्रवृती असतात. त्याचे साहित्यात प्रतिबिंब पडते. (हायवर्डने

साहित्याचे ऐतिहासिक विवरण केले आहे. महाकाव्य हे दु:खान्त साहित्य तर रागदरबारी जीवनाशी सबंधित काहीवेळा सुखान्त व व्यंगपूर्व असते. कविता नागर जीवनाशी व जानपद काव्य ग्रामीण जीवनाशी सबंधित असल्याचेच दाखवले आहे. उदा: 'पानिपतची बखर' , पेशव्याचा काळ समजावून घेणे आवश्यक आहे. उदा. 'लावणी' समजण्यासाठी पेशवाईचा काळ समजावून घेणे इष्ट ठरेल

**४) कार्लाइल :**

ऐतिहासिक पद्धतीचे टीकाशास्त्रातील महत्त्व प्रथम कार्लाइलने स्पष्ट केले आहे. याबाबत त्याने नवीन प्रतिमा घालून दिली . काव्य म्हणजे सजीव इतिहास कवीची निर्मिती ही समाजाच्या इतिहासातून होते. काव्य म्हणजे राष्ट्राच्या इतिहासाचे अपत्य इ. त्याची मते आहेत. उदा. ' जसा राजा तशी प्रजा' त्याचा आविष्कार समजण्यासाठी काळ समजावून घेणे आवश्यक ठरते.

**५) मॅथ्यू ऑर्नोल्ड :**

उत्कृष्ट निर्मिती केवळ लेखकाच्या प्रतिभेवर अवलंबून नसते. ज्या काळात असामान्य विचारांचा संचार झाला, त्याच काळात महान कालाकृती उदयाला येते. उदा. गो.ब. देवल याचे 'शारदा', उदा. 'बळी' भटके लोक, विकास करायचा तर तुरूंगात ठेवा, नोकऱ्या दिल्या तर चोरी नाही हा असामान्य विचार आहे. उदा. समाजात रूढी, अज्ञान आहे. लोकांना शिकवून शहाणे करणे म्हणून संतसाहित्य हा ऐतिहासिक टप्पा निर्माण झाला.

**६) टी. एस. इलियट :**

गतकाळातील परिस्थिती आणि साहित्य यांचा संबंध लावला आहे. लेखक जसा घडतो. त्यानुसार मूल्यमापन करणे आजच्या निकषाने जून्या कलाकृतीचे मूल्यमापन करणे चूक ठरेल उदा. 'संगीत शारदा'.

**७) तेन :**

याने या पद्धतीचा विशेष विचार केला कलाकृतीच्या आकलनासाठी त्याकाळातील सामाजिक घटकाचे ज्ञान झाले की पुरे तो मनुष्य स्वभावावर जातो एकूण सामाजिक परिस्थिती व विशिष्ट काळ यातील प्रकृतीच्या परिणाम मानतो जातीमुळे शारीरिक व मानसिक स्वभावाची भिन्नता प्राप्त होते. यावर भौतिक व सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडतो. यालाच तो परिस्थिती म्हणतो या दोन्हीमुळे एक समाज दुसऱ्यापासून भिन्न होऊ लागतो चिरकाल होणाऱ्या परकीय हिंदूच्या मनात त्याग अहिंसा हे भाव निर्माण झाले. पहिल्या व दुसऱ्या शक्तीतून युग, विशिष्टकाळ ही तिसरी आक्रमणामुळे

शक्ती निर्माण होते. त्यांच्या मनातील थोडा अतिरेकी भाग सोडल्यावर बराच भाग योग्य वाटतो ऐतिहासिक घटनावरून कवीच्या कृतीचे मर्म व कार्यकारण भाव कळू शकतो.

**८) शि. म. पराजपे :**

शि. म. परांजपे यांच्या वक्रोक्तीचे कारण डॉ.वाळिंबे यांनी इंग्रजांच्या दडपशाही धोरणात दाखविले आहे. कारण वक्रोक्तीच्या मार्गाने बोलले तर ते इंग्रजांना समजणार नाही म्हणून ते वक्रोक्तीचा अवलंब करतात.

**३) हेगेल :**

एखाद्या उपलब्ध कलाकृतीतून त्याकाळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, परिस्थितीचे अनुमान होते.

**ऐतिहासिक टीकेचे गुणविशेष :**

१) विशिष्ट कालखंडाचे ज्ञान प्राप्त झाल्याने मन उदार व व्यापक बनते. ( सर्व कालखंडात जाणे व समजावून घेणे ) २) निरनिराळया बाबतीत विचारांचा परिचय झाल्याने त्याच्या प्रकाशात तो त्या-त्या काळातील वाङ्मयाचे समतोल रसग्रहण करू शकतो. त्या कलाकृतीवर आपण अन्याय करत नाही. विचारातील संकुचितपणा दूर होतो. स्वभाषेतील ग्रंथांचा खोटा अभिमान बाळगत नाही. इतर देशातील उत्कृष्ट वाङ्मयाचा अभ्यास न केल्याने अहंकार निर्माण होतो, हे कळते. म्हणून समीक्षकाने आपल्या क्षेत्राबाहेर दृष्टी नेऊन अनेक परंपरांचा अभ्यास करून ज्ञान निर्माण करावे.

३) भूतकाळातील विचारांची वर्तमानाशी तुलना करून इष्ट अनिष्ठता ठरविता येते. ४) जगातील विशिष्ट राष्ट्राच्या वाङ्मयाचे ज्ञान झाल्याने अहंकार जाऊन दृष्टी नम्र बनते. तुलनाक्षमता वाढते. ५) निरनिराळया कालखंडातील भावविचारांचे भिन्नप्रवाह कळल्याने या पद्धतीमुळे समीक्षक अशास्त्रीय टीकेचा प्रभाव टाळावयास असमर्थ होतो. ६) वर्तमान मूल्यांचा उपयोग करून प्राचीन वाङ्मयाची समीक्षा करण्याची चूक तो करीत नाही. काळाबरोबर वाङ्मयविषयक कल्पना व लोकाभिरूची बदलते. हे त्याने समजून घ्यायचे असते.

७. वाङ्मयाचा इतिहास लिहिण्यास ही पद्धत अतिशय उपयुक्त ठरते, त्यामुळे त्याच्या मनात पूर्वगृह राहत नाही.

**मर्यादा :**

१. एखाद्या कलाकृतीची केवळ विशिष्ट देश, काल, स्थितीचा विचार करून समीक्षा करताना प्रत्येक ललितकृतीच्या असाधारण व अलौकिक स्वरूपाकडे समीक्षकाचे

दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. समीक्षक तिला परिस्थितीच्या साच्यात बंदिस्त समजून तिच्या वेगळ्या वैशिष्ट्याकडे लक्ष देत नाही. त्यामुळे कलाकृतीवर अन्याय होतो.

२. प्रत्येक काळात एखादी कलाकृती स्थळकाल निरपेक्ष व अन्य कारणांनी श्रेष्ठ ठरते. तिचा जनमानसावर प्रभाव होतो. समीक्षा त्या काळातील अन्य कलाकृतीकडूनही तशी अपेक्षा करते.

३. प्रत्येक कलाकृतीच्या अनन्यसाधारणत्वाचा, स्वातंत्र्याचा विचार करून समीक्षा करण्यामुळे या पद्धतीकडे दूर्लक्ष होते. वाङ्मय व यातील भेद विसरून इतिहासावर अधिक जोर देण्याची प्रवृत्ती वाढते.

४. कलाकृतीचा विशुद्ध आस्वाद घेण्याच्या प्रक्रियेत अडथळा येतो.

**सारांश :**

कलाकृतीच्या काळाचा अभ्यास करून समीक्षकाने आपले मत बनवणे महत्त्वाचे ठरते. गतकाळातील साहित्याची वर्तमानकातील साहित्याशी तुलना करू नये. प्रत्येक प्रकाराविषयी ज्ञान असणे आवश्यक आहे. लेखकाची जडणघडण काळ सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक परिस्थिती इ. चे आकलन करून घेणे व त्या पद्धतीने समीक्षण करणे इष्ट ठरेल.

***

# समाजशास्त्रीय समीक्षापद्धती

साहित्याचा विषय समाज की व्यक्ती? याचे उत्तर समाज नव्हे व्यक्ती असे दिले जाते. असे कलावाद्यांच्या मते, साहित्याचे प्रयोजन आनंद देणे होय. हा कलावादी दृष्टिकोण आहे. कलावंताच्यामते कलाकृती जेवढी समाजनिरपेक्ष असेल तेवढी अधिक चांगली. परंतु कलाकृती समाजसापेक्ष होऊ लागली की ती सबळ होते. असे त्यांना वाटते. कलेचे कलापण समाजनिरपेक्षतेत आहे. तीच कलेची फलश्रृती, असे कलावादी मानतात. साहित्याकडे एक सामाजिक स्वरूपाचा दस्तऐवज म्हणून पाहण्याची जी प्रवृत्ती आहे. तिला आळा घालण्याच्या दृष्टीने कलावादयांची ही भूमिका काही प्रमाणात उपकारक ठरते. पण कलेची किंवा साहित्याची बहुपरिणामकारकता विविध प्रयोजने, कलेची व्यापक संस्कारितता विचारात घेतल्यास या सर्वांचा उलगडा करण्याच्या दृष्टीने हा कलावादी दृष्टिकोण अपुरा पडतो. साहित्यातील सर्व प्रश्न तो सोडवू शकत नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून साहित्यकृतीकडे पाहणे उपकारक ठरते. कारण त्यामुळे व्यवहारज्ञान होते जिज्ञासातृप्ती होते. कलाकृतीचे बहूपरिणाम अनेक तऱ्हेने आस्वादावर, वाचनावर होतात. मात्र कलावादी दृष्टिकोण अशा कलाकृती समजून घेण्यास अपुऱ्या पडतात. म्हणून जीवनवादाला महत्त्व प्राप्त होते. मग काही कलाकृतींची सामाजिकता कशी.

कलाकृतीची प्रेरणा कलावादी म्हणतात त्याप्रमाणे व्यक्तिगत मानता येईल. पण तिचे कलावस्तूत रूपांतर झाल्यावर ती कलावस्तू व्यक्तिगत न राहता सामाजिक बनते. उदा. हरपलेले श्रेय, गोष्टी घराकडील गोष्टी (केशवसुत) या साहित्यकृती कलावस्तू म्हणून लिहिल्या यावर व्यक्तिगत पातळीवर काय सांगतात हे महत्त्वाचे नाही तर येथे खेड्यातील मुले, बायको तर शिक्षणासाठी बाहेर पडलेल्या तरुणाचे चित्रण. उदा. सासू आणि सून यात परकेपणा हे सामाजिक आहे. सासू-सूनेला मुलीचे प्रेम देत नाही. कलावस्तूतील अनुभव व्यक्तिगत पातळीवर न राहता सामाजिक पातळीवर होतो. कलाकृती सामाजिक कशी ठरवतात उदा. सिंधू, उदा: नारबा (गोतावळा) हा व्यक्ती म्हणून असा एकटा नसतो असे अनेक नारबा औदयोगिककारणांमुळे लयाला गेलेले आहेत. म्हणून तो सामाजिक ठरतो. समाजशास्त्रीय अंगाने कलाकृतीचे आकलन आस्वाद मूल्यमापन करावयाचे या ठिकाणी आवश्यक आहे.) तिचे रसगृहण, मूल्यमापन, उपयोजन, हा सारा समाजाच्या अखत्यारीतील विषय ठरतो. असे साहित्य

व्यवहारावर नियंत्रण येते. त्यामुळे साहित्याचा विनियोग, अभिरूची, ग्रंथनिर्मिती प्रेरणा, ग्रंथप्रकाशन, ग्रंथप्रदर्शन इ. वर समाजाच्या उमटलेल्या प्रतिक्रिया समजून घेण्याच्या दृष्टीने समाजशास्त्रीय समीक्षेचे विशेषत्त्व महत्त्वाचे आहे.

तेन- समाजशास्त्रीय पद्धतीने कलाकृतीचे मूल्यमापन करताना चार गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. समाजशास्त्रीय भूमिकेवरून साहित्याची प्रत्यक्ष पद्धतशीर पाहणी करण्याचा पहिला मान फ्रेंच विचारवंत 'तेन'याच्याकडे जातो.

१. साहित्य समीक्षेचे काम भोवतालाच्या परिस्थितीचा साहित्याचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणे हे असते असे तो मानतो. कलावंताच्या भोवतालची परिस्थिती कोणती आणि त्या भोवतालच्या परिस्थितीचा साहित्यकृतीशी अन्योन्य संबंध आहे का? उदा. जेव्हा आपण मर्ढेकरांची कथा पाहतो. त्याठिकाणची परिस्थिती कशी, ते शहर कसे, माणसांचा कोंडमारा कसा होतो. उदा. नटसम्राट, बंद दरवाजा संस्कृती, साहजिकच येथे शहरीजीवन येईल. उदा. बनगरवाडी 'पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्या स्थळकाळात माणसे कशी जगतात याचा शोध घेणे.

'भावीण' न्यायाधीशांबरोबर-संबंध हीच पूंजी वार्धक्यात कामाला, हेच त्या परिस्थितीवरून समजते उदा: 'बळी'. चांगुणा सोजिराशी शरीर संबंध ठेवते. या ठिकाणी ती अशी का वागते तर येथे आंर्थिक स्तर कोणता? हे महत्त्वाचे ठरते. शरीर विकणे याठिकाणी आर्थिक स्तर कोणता हे महत्त्वाचे. भोवतालची परिस्थिती काय, राज्यकर्ता कोणत्या विचारसणीचा याचा कळत नकळत जीवनावर परिणाम होतो. यांच्या मूल्यमापनास तेन महत्त्व देतो.

कलाकृतीचे अवलोकन करताना कलावंताने कोणती पाश्वभूमी डोळ्यासमोर ठेवली, हे महत्त्वाचे आहे.

'गबाळ' या अत्मकथनात कुडमुड्याजोशी समाजाचे जीवन चित्रण आहे. 'बळी' मध्ये गुन्हेगार जमातीचे चित्रण केले आहे (मांग -गारूडी)

समाजाची मानसिकता कशी घडली उदा. 'सराई' मधील लोक चोरी करून उदरनिर्वाह करतात. पण पोटासाठी जेवढे आवश्यक आहे, तेवढीच चोरी करतात.

कातोडी लोक मासे धरण्यासाठी लुगडे फाडतात आणि मासे धरतात कारण त्यांची ही मानसिकताच तशी बनली आहे.

मराठवाडा-याठिकाणचे लोक आळशी असतात. कारण या परदेशातील संस्कारातून तो आला आहे.

या सर्व बाबी तो समाज कोणत्या सामाजिक स्थितीतून आला. त्याची मानसिकता कशी घडली आणि कलावंताने कसे मांडले याला महत्त्व दिले जाते.

कलाकृतीतून कोणत्या प्रदेशाचे, समाजाचे चित्रण आले ते पाहणे महत्त्वाचे ठरते. उदा. पडघवली, 'इंधन', 'भाकरी आणि फूल', 'गारंबीचा बापू', 'गारंबीची राधा'.

आर्थिक परिस्थितीनुसार समाजाचा मानस घडतो. हे ह्या समीक्षेचा अभ्यास करताना पाहणे इष्ट ठरते.

२. साहित्यव्यापार, देश, काल, परिस्थितीने, प्रवाहित व नियंत्रित झालेला असतो. साहित्याचा सारा व्यापार देश, काल, रीत, परिस्थितीने प्रेरित प्रवाहित नियंत्रित असतो. असा सिद्धांत मांडला हा सिद्धांत इंग्रजी साहित्यालाही लावण्याचा प्रयत्न त्याने केला. उदा. भोवतालची परिस्थिती कशी आहे वातावरण निर्मिती कशी आहे याला महत्त्व असते. 'नटसम्राट' उद्देश माता-पिता यांना प्रमाण मानले नाही. याठिकाणी राजेशाही नाही किंगलियरप्रमाणे.

काळ कोणता आहे? इंग्रज काळ, पेशवेकाळ की आजचा काळ आहे, हे पाहणे गरजेचे आहे. काळानुसार सामाजिक परिस्थिती बदलत असते. उदा. पूर्वीच्या काळी रामशास्त्री न्यायाधीश हे पगडित होते. परंतु आता पगडी घालीत नाहीत. कारण भारतात इंग्रज आले. त्या ठिकाणच्या जजचा प्रभाव पडलेला दिसून येतो. किंवा पूर्वीच्या स्त्रिया नऊवारी साडी घालत. परंतु आताच्या स्त्रिया सहावारी साड्या परिधान करतात. कारण काळान्वये बदलणे आवश्यक आहे.

परिवर्तनामुळे समाज त्यावर विचार करायला लागला जसा काळ बदलत चालला तसा कलाकृतीतून येणारा विषयही बदलत असतो. काळाच्या ओघात आपण बदल झाला.

स्त्रीमध्ये बदल झाला तो बाह्यरंगात अंतरंगात बदल झाला नाही या कडेही लक्ष देणे महत्त्वाचे ठरते.

कलाकृतीत घटना आणि प्रसंग हे समाजाशी तोलून पहावे लागतात. उदा. 'टारफूला' मध्ये कर्ता पाटील गेला उपरा पाटील आला. करवीर संस्थानातील भाग हा कादंबरीत आला आहे. तर स्वांतत्र्यपूर्वीचा काळ प्रस्तुत कांदबरीत चित्रित झाला आहे. उपरा पाटील स्वातंत्र्यापूर्वी कोणीही स्वीकारला नाही. येथे परिस्थिती पाहणे आवश्यक आहे. विदर्भात आर्थिक स्तर उंचावण्याचा कोठे प्रयत्न होतो का? याचे चित्रण होते का? याचाही विचार केला पाहिजे. उदा. लिंबाचे झाड हे फक्त पश्चिम महाराष्ट्रात आहे. आणि बनगरवाडी मला मारा झाडाला नको. तसेच बाळा धनगराला देवीच्या यात्रेला नाकारले तेव्हा तो म्हणतो मला भंडार लावा ही सामाजिक श्रद्धा आहे. म्हणून जीवन हे परिस्थितीने प्रेरित -प्रवाहित केले आहे असे म्हणतात.

३. साहित्यपूर्णपणे व्यक्तिनिष्ठ असते : या भ्रामक कल्पनेला तेनने धक्का दिला. साहित्याचा समाज व्यापाराशी निकटचा संबंध असतो. हे प्रथम त्याने प्रभावीपणे सांगितले पण त्यातही त्रुटी आहेत. येथे तेन व्यक्तिनिष्ठतेला विरोध करतो. याठिकाणी समाज महत्त्वाचा मानतो. उदा. 'भावीण' मध्ये शेवंता भावीण पाहू नका तर त्या समाज पार्श्वभूमीवर त्यांना पहा भावीण जात/ समाज पाहणे आवश्यक आहे. किंवा

मास्तर जात म्हणून किंवा मास्तर व्यक्ती म्हणून किंवा 'पाचोळा' मधील नुसते पारबतीचे चित्रण पाहू नका तर संपूर्ण शिंपी जात या ठिकाणी महत्त्वाची आहे. दलित आत्मकथनांतून आपले स्वत:चे व्यक्तिगत जीवन सांगत असताना ते संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतात. म्हणजेच याठिकाणी अप्रत्यक्षरीत्या समाजाचीच सुख, दु:ख सांगण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. दलित अत्मकथने.

४. साहित्य हे समाजाचे अपत्य आहे असे त्यांचे म्हणणे आहे. पण हा त्याचा सिद्धांत कोणी मानत नाही. कारण साहित्य हे निसर्गाचे अपत्य आहे असे समजतात. वरील विधान हे अर्ध सत्य आहे. साहित्यिक समाजापुढे जो आरसा धरतो तो हुबेहुब प्रतिबिंब दर्शविणारा नसतो. त्याचे परिमाण वेगळे असते.

लेखक समाजात घडतो, वाढतो. त्यात त्याची मानसिकता घडते त्याच्या प्रेरणाप्रवृती युगप्रवृत्ती त्याठिकाणी घडतात.

या समीक्षेचे पुढील घटक लक्षात घेणे आवश्यक आहे.

१. तत्कालीन समाजाची एकंदर जडणघडण कशी झाली. कलाकृतीतील काल कोणता आहे. समाजाची जडण घडण कशी झाली आहे. हे पाहणे महत्त्वाचे ठरते. उदा: पूर्वी स्वातंत्र्य चळवळी होत होत्या परंतु त्या विचाराचे लोक आज दिसत नाहीत. काळानुरूप बदल झालेले दिसतात.

२. ज्ञानाचा प्रचलित व्यूह निर्माण करणे उदा. रविकिरण मंडळ स्थापना १९२३ साली झाली. कारण त्या काळात कवितेला मरगळ आली म्हणून रविकिरण मंडळाची स्थापना झाली. त्या त्या काळातील हा व्यूह असतो.

३. त्याचबरोबर त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरा, सामाजिक परंपरा तिचे विशेष पाहणे, आवश्यक ठरते. उदा. म्हणी वाक्प्रचार, लोककथा, वेगवेगळे शब्द प्रयोग कसे वापरले जाऊ लागले. याचाही विचार बारकाव्यानिशी पाहणे आवश्यक आहे. म्हणी, लोककथा, चौडकं, हे शब्द त्यावेळी वापरात होते.

४. कलावंताची प्रकृती कोणती आहे? कोणत्या विचारसरणीचा त्याच्यावर प्रभाव आहे? डाव्या विचारसरणीचा की उजव्या विचारसरणींचा हे पाहणे.

५. संस्कृती वितरणाची तत्कालीन माध्यमे कोणती होती. उदा. पूर्वी ओव्या, भारूडे याद्वारे प्रसार केला जात होता. परंतु आता दूरदर्शन प्रसार माध्यम म्हणून आले.

६. श्रोत्यांच्या अभिरूचीची केंद्रे कोणती आहेत.

कालानुरूप आणि सामाजिक परिस्थितीनुसार अभिरूचीही बदलत गेली. परिणामी अभिरूचीलाही महत्त्व प्राप्त झाले.

***

# मार्क्सवादी समीक्षापद्धती

साहित्याचे आकलन करून घेणे आणि ते वाचकांपर्यंत पोहचवणे हे समीक्षेचे एक कार्य आहे,उद्दिष्ट असते. एखाद्या साहित्यकृतीचे स्वत: आकलन करून घेणे व ते इतरांपर्यंत पोहचवणे आणि नंतर त्याचे मूल्यमापन करणे समीक्षा व्यवहारात महत्त्वपूर्ण असते.

साहित्य व्यवहार, साहित्य आकलन करून देण्याघेण्याचा व्यवहार असतो.

साहित्यकृतीचे आकलन करून घेत-देत असतानाच अपरिहार्यपणे मूल्यमापनाचे प्रश्न उपस्थित होत असतात. म्हणूनच प्रत्येक दृष्टिकोणातून केलेली समीक्षा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साहित्यकृतीचे मूल्यमापन करण्याचाही प्रयत्न करीत असते.

मार्क्सवादी समीक्षेचे स्वरूप-सामर्थ्य व मर्यादा :

मार्क्सवादी समीक्षा साहित्याच्या मूल्यमापनासाठी कोणते निकष वापरते आणि साहित्य आकनासाठी ती कशी उपयुक्त ठरते. या पद्धतीमध्ये मार्क्सने पूर्णपणे आपले विचार मांडले नाहीत. विवेचनाच्या ओघात काही मुद्दे आले आहेत. कार्लमार्क्स आणि मार्क्सवादी विचारसरणीच्या व्यक्तींनी सांगितलेला समीक्षाविचार असा अर्थ येथे अपेक्षित आहे. (मार्क्सवादी समीक्षाविचार) कार्लमार्क्स यांनी साहित्य समीक्षेवर स्वतंत्रपणे लिखाण केलेले नाही. कार्लमार्क्स विवेचन करताना काय म्हणतो आणि इतरांनी काय विचार मांडले आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

**मार्क्सच्या तुटक तुटक कल्पना :**

कला हे मानवी वास्तावाचेच एक महत्त्वाचे अंग असल्याने समग्र मानवी वास्तवाचा शोध घेणाऱ्या कार्लमार्क्स यांच्या लेखनात कलाविषयक मूलभूत प्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या काही कल्पना अपरिहार्यपणे आल्या आहेत. (साहित्यात मानवी जीवनाचा संघर्ष असतो आणि जे जीवन चित्रित झाले आहे. त्यावर प्रकाश टाकणे.)

**कार्लमार्क्स :** यांच्या मते आर्थिक संबंध हा समाजाच्या इमारतीचा पाया असतो आणि त्याला पूरक अशी नैतिक, धार्मिक, राजकीय, विचारप्रणालीची अतिरचना उभी राहत असते. (उदा. अंथरून पाहून पाय पसरावे. एखादी गोष्ट करताना खिसाचा

सल्ला घ्यावा लागतो. आर्थिक परिस्थितीने मानवी जीवन व्यापले आहे.)

नैतिकतेचा विचार करताना गरीबाची ही नैतिकता ठरली आहे. पैसा असेल तर तो नैतिकतेने वागेल, धार्मिक कार्य करील. त्यातूनही पैसा उरला तर राजकीय कार्यासाठी खर्च करील. परंतु यासाठी आर्थिक पाया भक्कम पाहिजे. उदा. 'पाचोळा' पारबती म्हणते की, तो होत्याचे नव्हते करून टाकीन. म्हणजे नैतिकता पाहून वागणे आवश्यक आहे. कला ही या अतिरचनेचा भाग आहे. आर्थिक पाया व अतिरचना यांचे संबंध गतिमान असतात. उदा. खेळ ही कला आहे, परंतु त्यासाठी पैसा आवश्यक आहे ते आपल्या खिशाला परवडणारे नाही. तसेच नाटक पाहणे ही कला आहे, परंतु नाटक पाहणे आपणाला परवडत नाही. कारण तिकीट जास्त असते. तर सिनेमाचे तिकीट कमी असते म्हणून आपण इच्छा असूनही त्या पूर्ण करू शकत नाही.

आर्थिक पाया व अतिरचना यांचे संबंध गतिमान असतात. कारण कालांतराने परिस्थिती सुधारू शकेल. नोकरी मिळाली तर परिस्थितीत बदल होईल. चांगले किंवा वाईट, हे गतिमान असते, कारण या गोष्टी घडवण्यासाठी वेळ लागत नाही. थोडक्यात आर्थिक परिस्थितीतील बदल मार्क्सला अभिप्रेत आहेत. समाजात होणारा बदल, सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे. उदा. म्हणजे आपल्या देशात पेशवाई जाऊन इंग्रज आले आहेत व सुधारणा झाल्या म्हणून उदय झाला आणि नंतर इंग्रज घातक हे समजले.

सामाजिक परिवर्तन अंतिम निर्णायक घटक आर्थिक पाया हाच असतो. कार्ल मार्क्सने (Base - super structure) हा सिद्धांत सांगितला. अंतिम निर्णायक घटक आर्थिक पाया आहे. याचे आर्थिक परिस्थितीशी नाते दाखवताना त्याचे विश्लेषण करता येईल. उदा. पूर्वी दलित लोक ख्रिश्चन होऊ लागले. कारण त्यांना समाज नाकारत होता. त्यांना नोकरी मिळत नव्हती आणि ख्रिश्चन लोक त्यांना पैसे देत होते. म्हणून ख्रिश्चन धर्म स्वीकारला जात होता.

कला आणि काम यातील संबंध, कलेचे सामाजिक आणि सर्जक अंग, कलेचा वर्गीय उगम आणि तिची साक्षेप स्वायत्तता, समाज आणि कला यांचा विकास कलाकृतीची स्वायत्तता इ. बाबत मार्क्सवादी विचार मांडतात.

मार्क्सच्या सामाजिक, आर्थिक विचारांच्या आधारावर मार्क्सवादी समीक्षा विचारांचा (मार्क्सवादी समीक्षा-विचारांचा) प्रवास पुढे सुरू झाला आणि साहित्याचे सामाजिक स्वरूप, त्याची वर्गीय लक्षणे इत्यादीचे आकलन करून घेण्यालाच मार्क्सवादी समीक्षेत प्राधान्य मिळाले. साहजिकच साहित्यकृतीचा आशय आणि त्याच्या विश्लेषणासाठी समाजशास्त्रीय संकल्पनांना मार्क्सवादी समीक्षा विचारात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

मार्क्सवादी समीक्षक ल्युनाचार्स्कींने मार्क्सवादी समीक्षेचे वैशिष्ट्ये सांगताना तिचे स्वरूप अपरिहार्यपणे समाजशास्त्रीय असते, असे म्हटले आहे. यामध्ये त्याला

समाजहीत अपेक्षित आहे. समाजास उपकारक ठरतील अशी मूल्ये जोपासली गेली पाहिजेत.

अर्थात त्या समाजशास्त्रीय स्वरूपाचा गाभा मार्क्स आणि लेनिन यांनी पुरस्कारलेले शास्त्रीय समाजशास्त्र असते.

थोडक्यात सांगावयाचे तर लेनिनने जे विचार मांडले ते त्याला अभिप्रेत होते. म्हणून कोणत्याही कलाकृतीचे मार्क्सवादी समीक्षेने आकलन करून घेताना, ती कलाकृती कोणत्या सामाजिक परिस्थितीत जन्मली म्हणजेच तिचा आर्थिक स्तर कोणता आहे, व्यक्त झालेल्या नैतिक आशयाचे स्वरूप काय आहे. उदा: 'बारी'या कादंबरीमध्ये बेरड समाजाचे जीवनचित्रण आले आहे. 'बेरड' समाजाचे जीवनचित्रण कसे आले आहे. 'बेरड' समाज चोरी का करतोय? तर त्याच्या पोटासाठी. तुम्ही जर त्याला माणूस म्हणून वागविले तर तो चोरी करणार नाही. किंवा 'भावीण'मध्ये शेवंता तिच्या मुलीला वेश्या व्यवसाय करायला सांगते कारण हे सर्व घडते परिस्थितीमुळे किंवा 'पाचोळा'मध्ये गरीबांचे कसे शोषण होते श्रीमंताची भीती कशी पारबतीच्या ठिकाणी आहे हे पुढील ओळीतून सूचित होते. 'गरड होत्याचे नव्हते करून टाकीन'. यातून तिला हे सांगायचे आहे की, आपण त्यापुढे पाचोळा आहोत किंवा 'बळी' मध्ये चांगुणा अनैतिक मार्गाने वागते तरी गेन्या त्याकडे दुर्लक्ष करतो का तर फक्त भुकेसाठी. ही त्या साहित्यकृतीतील नैतिकता होय. किंवा 'हल्या हल्या दूध दे' मध्ये तरुण शिकलेल्या पिढीकडूनच कसे शोषण होते. अशाप्रकारे साहित्यात नैतिकतेचे स्वरूप पाहणे. वास्तवाचे कोणते व कसे चित्रण साहित्यात प्रतिबिंबित होते या प्रश्नांच्या विचाराला महत्त्वाचे स्थान असते. उदा. 'शारदा' या नाटकात वास्तवता आहे. ७५ वर्षचा भुजंगराव आणि १४ वर्षाच्या शारदेबरोबर विवाह करण्यास तयार आहे. कोदंड रूपाने विवाह रोखला जातो. या ठिकाणी पुरोगामित्वाचा विचार आला पाहिजे. क्रांतिकारकत्व आले आहे. किंवा निबंधमालेमध्ये नवविचाराला पुष्टी मिळायला हवी. क्रांतिकारकत्व आले आहे. साहित्यकृतीतून व्यक्त होणारा आशय समाजपरिवर्तनाला पोषक असेल त्यातून व्यक्त होणारी नैतिकता तर उदयोन्मुख वर्गाची असेल तर त्या साहित्यकृतीला पुरोगामी व तसे नसेल तर प्रतिगामी म्हटले पाहिजे. उदा: 'भावीण' या कादंबरीत ऋषी हा तरुण एका मुरळीच्या मुलीबरोबर विवाह करतो. यावरून असे लक्षात येते की एका सुशिक्षित व्यक्तीने तिचा उद्धार केला जर पुरोगामित्व नसेल तर त्या साहित्यकृतीला मार्क्सवादाच्या दृष्टिकोणातून पाहता येणार नाही. उदा. 'एकच प्याला' या साहित्यकृतीचे मार्क्सवादी समीक्षेने मूल्यमापन होणार नाही. कारण सिंधू ही जी नायिका आहे. ती तिच्या व्यसनी नवऱ्याला पत्करणारी आहे. ती त्याठिकाणी त्याला फेकून देणारी नाही.

पुरोगामी साहित्यकृती ती चांगली प्रतिगामी ती वाईट असे समीकरण येथे अभिप्रेत असते. म्हणजेच या समीक्षेत पुरोगामित्व, वास्तवता, क्रांतिकारकत्व या इ.

साहित्याच्या मूल्यमापनाचे निकष म्हणून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे वापर केला जात असतो.

मार्क्सवादी जुन्या, परंपरा, रूढी, जतन करण्याचा विचार नाकारतात.

मार्क्सवादी समीक्षा विचाराचे हे रूढ स्वरूप पाहिले की एक गोष्ट सहजपणे जाणवते व ती म्हणजे हा समीक्षा-विचार साहित्यकृतीच्या सामाजिकतेवर भर देतो. माणूस व्यक्ती म्हणून पूर्णपणे स्वतंत्र राहू शकत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण सामाजिक वास्तवातच होते. एवढेच नव्हे तर व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची पूर्तताही सामाजिकतेअभावी अशक्य असते. हा मुद्दा या समीक्षेत मिळतो.

दोष : या ठिकाणी कलावंताचा विचार केला जात नाही. म्हणजेच कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाकडे कळत-नकळत दुर्लक्ष केले जाते. तर कलाकृतीचा विचार तिच्यातील आशय, पुरोगामित्व पाहिले जाते.

समाज सतत गतिशील आणि परिवर्तनशील असल्याने साहित्यातील विचारप्रवाह शैली आणि समाजाची अभिरूचीही बदलते. कारण समाजप्रवाही म्हणून अभिरूचीही बदलते. साहजिकच समाजातील विषमतेतून हा विचार आला आहे. समाजातील विषमता नष्ट व्हावी हा या समीक्षेचा प्रधान हेतू आहे.

समाजात सामाजिक आणि आर्थिक विषमता वाढत असताना प्रतिवादी साहित्याची अपेक्षा तीव्रतेने निर्माण होते.

पहिल्या महायुद्धाने समाजात आणि साहित्यात ज्या जाणिवा निर्माण झाल्या त्यावर मार्क्सवादी साहित्याचा आणि समीक्षापद्धतींची प्रवृत्ती प्रबळ झाली.

कला ही या अतिरचनेचा भाग असते. श्रमजीवी व दलितवर्गाचे भडक चित्रण करून त्यांना वर्गविग्रहासाठी संघटित करते. तेच साहित्य श्रेष्ठ व सुंदर होईल असे मार्क्सवादी टीकाकार सांगतात.

जुन्या साहित्य आदर्शांना ते त्याज्य मानतात. उदा. दलित साहित्यात विद्रोही भावनेला महत्त्व आले. म्हणून याठिकाणी वर्गविग्रहाचे स्वरूप पाहायला मिळते. कारण वर्गविग्रह करणारे साहित्य श्रेष्ठ, जुने साहित्य कनिष्ठ आहे. जुन्या साहित्याची प्रेरणा त्यांना मान्य नाही. कलावाद मान्य नाही.

मार्क्सवादी साहित्यकार जगाचे स्वास्थ्य केवळ भौतिक मानतात. तो कोणत्याही अदृश्य सत्ता मानीत नाही. प्रारब्धवादाला तो दुबळेपणा मानतो. व्यवस्था बदलते तेव्हा त्यातून क्रांती होते. म्हणून साहित्यातून क्रांती घडविण्याची जिद्द तो बाळगतो. त्याचे अंतिम ध्येय वर्गहीन समाजाची स्थापना करणे हे असते. या समीक्षाविचाराचा भर सामाजिकतेवर आहे. यामागे माणसाविषयी आकलन ही भूमिका आहे. कारण माणूस पूर्णपणे स्वतंत्र राहतच नाही. सामाजिक वास्तवात त्याची घडण होते. वास्तविक सामाजिकता व कलावंतांचे व्यक्तित्व व त्याची सृजनशीलता या दोघानांही साहित्याच्या संदर्भात महत्त्व आहे. ही समीक्षा कलावंताच्या अंगाकडे दुर्लक्ष करते व त्यामुळे तिला एकांगी स्वरूप येते. मार्क्सवादी साहित्यकारात, समीक्षकांत दोन वर्ग

आढळतात. १) काही कम्युनिष्ठ पार्टीशी संबंधित २) तर काही स्वतंत्र विचारसरणीचे असतात. पहिल्या वर्गातील साहित्यिक मार्क्सचा सिद्धांत स्वीकारत नाहीत तर दुसऱ्या वर्गातील साहित्यिक मार्क्सचा सिद्धांत स्वीकारतात पण देश काल परिस्थितीनुसार राहू इच्छितात. ते साहित्यात प्रगतीवाद आणि सौंदर्य यांचा समन्वय करू पाहतात. दुसऱ्या मार्क्सवादाची या समन्वयाला मान्यता नसते. त्यांच्यामते सौंदर्यवाद हा भांडवलशाही आणि राजदरबारी वातावरणातून निर्माण झाला आहे. त्यांना श्रमिक साहित्याशी संबंध नाही. त्यांच्या मते साहित्यिक आणि त्याची कलाकृती ही प्रचारक असते. शेक्सपिअरही असाच साम्राज्यवादाचा प्रचारक होता.

यातूनच कलावंताच्या बांधिलकीचे तत्त्व पुढे येते. याचा परिणाम म्हणून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे साहित्याला राजकारणाच्या साहित्याचे स्वरूप प्राप्त होते.

ल्युनाचास्कीच्या मते श्रमजीवीच्या विकासासाठी आणि विजयासाठी ज्यांची मदत होते ते चांगले व जे विघातक ठरते ते वाईट साहित्य. अर्थात हा निकर्ष एकांगी आहे, हे उघडच आहे.

मार्क्सवादी समीक्षेच्या या स्वरूपामुळे कलावंतांची बांधिलकी व स्वातंत्र्य साहित्याची स्वायत्तता ही द्वंद्वे पुढे आली ही जाणीव प्लेकॉनॉव्ह, ट्रॉटस्की या विचारवंताला झाली. त्यामुळे प्लेखॉनॉव्हने आपल्या चर्चेत समाजशास्त्रीय निकषाबरोबर सौंदर्याच्या निकषालाही मान्यता देऊन या द्वंद्वाची सोडवणूक केली.

मर्यादा :

साहित्यकृतीचे कलादृष्ट्या मूल्यमापन करावयाचे झाल्यास त्यासाठी या पद्धतीत वापरण्यात येणारे निकष साहित्याला पुरेसा न्याय देऊ शकत नाही. कलाकृतीच्या रचनेचे विश्लेषण व कलाकृती म्हणून तिचे मूल्यमापन या समीक्षेच्या आधारे करणे शक्य होत नाही. म्हणजे एखादी साहित्यकृती ही कलाकृती आहे काय? याचे उत्तर येथे देता येत नाही.

**सामर्थ्य :**

१) साहित्यातील प्रवृत्तीचे सामाजिकदृष्ट्या स्पष्टीकरण या समीक्षाविचाराने मिळते.

२) साहित्यकृती ही केवळ कलावस्तू नसून ती एक सांस्कृतिक वस्तूही आहे. हे समजण्यास ही समीक्षा उपयोगी ठरते.

३) या समीक्षेमुळे कलाकृतीमागील प्रेरणांचे हेतूचे विश्लेषण करता येते. कलाकृतीच्या संभाव्य परिणामांचा विचार करता येतो.

४) कलेचा संबंध मार्क्सच्या समाजशास्त्राशी नव्हे तर मार्क्सवादातील प्रगल्भ मानवतावादाशी आहे. कला केवळ श्रेष्ठ वास्तवाचे प्रतिबिंब नाही. तर ती मूलतः सृजन आहे. यावर भर देऊन साहित्याचा विचार करणारा मार्क्सवादी विचारही

विकसित होत आहे. आशयाच्या नैतिक स्वरूपावरून कलावंत व कलाकृती यांचे मूल्यमापन करण्याची चूक या पद्धतीने टाळण्यासारखी आहे. पण काही ठिकाणी या विचाराचेही स्वरूप धूसर होते. ते या समीक्षेचे दुसरे रूप आहे. मराठी साहित्य समीक्षेत या समीक्षेची ही दोन रूपे आढळतात.

१) लालजी पेंडसे यांच्या 'साहित्य आणि समाजजीवन' ग्रंथाने महाराष्ट्राला या समीक्षेचा परिचय करून दिला.

२) सुखठणकरांच्या महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य.

३) पु. य. देशपांडे यांच्या लेखनमालेचाही उल्लेख करावा लागतो मात्र हे मार्क्सवादी समीक्षेचे आदर्श नमुने नाहीत.

४) या पद्धतीने साहित्याच्या सांस्कृतिक अंगाकडे कसे पहावे याचा उत्तम नमुना म्हणजे गं. बा. सरदारांच्या 'संतवाङ् मयाची सामाजिक फलश्रुती' हा ग्रंथ होय.

५) दि. के. बेडेकर 'विचारयात्रा' 'साहित्यनिर्मिती व समीक्षा'

६) शरचंद्र मुक्तिबोध 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' हा ग्रंथ तात्त्विक स्वरूपाचा आहे.

७) जोगांनी 'मार्क्सवादी आणि मराठी साहित्य' या प्रबंधात मराठीतील मार्क्सवादाची चिकित्सा केली आहे. मार्क्सवादाच्या मर्यादा लक्षात घेऊनही त्याने मराठी साहित्यातील वास्तववाद, दुर्दम्य आशावाद आणि समाजोन्मुखता या मूल्यांमुळे मराठी साहित्यांचा लाभच होईल असे, जोगांना वाटते हे खरे आहे.

**स्त्रीवादी समीक्षा :**

स्त्रीवादी समीक्षा ही जीवनवादी समीक्षेशी नाते सांगणारी समीक्षापद्धती आहे. समाजशास्त्रीय समीक्षा आणि मार्क्सवादी समीक्षा स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार करत असल्या कारणाने वैचारिक पातळीवर स्त्रीवादी समीक्षा त्यांच्या जवळ जाताना दिसते. स्त्रीवादी समीक्षा ही कलाकृतीतील आविष्कारापेक्षा आशयाला महत्त्व देते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांना कवटाळणारी ही समीक्षा पद्धती आहे.

स्त्रीवादी समीक्षा ज्या साहित्यकृतीमध्ये स्त्रीमुक्तीची बीजे सापडतात, आणि स्त्रीचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, बौद्धिक आणि शारीरिक पातळीवर उन्नयन केले जाते. अशा साहित्यकृतीचा पुरस्कार करते. शतकानुशतके येथील पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीचे सर्वच पातळ्यांवर शोषण केले आहे. स्त्रीच्या एकूणच जडण-घडणीवर पुरुषप्रधान व्यवस्थेने नियंत्रण ठेवले आहे. आणि तिच्या भाषेलाही पुरूषप्रधान व्यवस्थेच्या मायाजालातच गुरफटत ठेवले आहे, असे सॅन्ट्रा गिलबर्ट यांनी नमूद केले आहे. घालून दिलेली चौकट उद्ध्वस्त करून 'स्व'च्या अस्तित्वाचा शोध घ्यावा. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा यांना धक्के देऊन आपल्या अस्तित्वासाठी

बंडाचे निशान उभारून प्रस्थापित व्यवस्थेला नाकारून विद्रोहाची भूमिका घ्यावी अशी ही समीक्षा मानते.

प्रस्थापित पुरुषसत्ताक व्यवस्थेने 'स्व'हीत लक्षात घेऊनच स्त्रीचे मानसशास्त्र घडविले आहे. यासंदर्भात सिमॉन द बोव्हाने म्हटले आहे. "वन इज नॉट बॉर्न अ वुमन वन बिकम्स वन," कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही नंतर ती बाई म्हणून घडविली जाते. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीची केवळ जाणीवच नव्हे तर नेणीवही पुरुषी जीवनमूल्यांनी भरून टाकली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने तिला गिळंकृत केले आहे. लिंगभेदामुळे स्त्रीवर बाईपणाच्या कल्पना लादल्या गेल्या. पुरुष तेवढा सक्षम स्त्री मात्र दुबळी, चंचल, पुरुषासोबत फक्त शय्यासोबत करणारी, तिचे शरीर सौंदर्याचे प्रतीक, तिच्यात भित्रेपणा, गोडवा, नम्रता, विनय, दया हे गुण जन्मत:च असतात. याउलट पुरुष हा कर्तबगार, बुद्धिमान, धीट, अहंकारी, अशा प्रकारे पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री व पुरुषांमध्ये भेद निर्माण केले. या व्यवस्थेने स्त्रीवर दुय्यमत्व लादून तिच्यात गुलामीची बीजे रोवली. स्त्रीवादी समीक्षा पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीच्या निर्माण केलेल्या प्रतिमेला छेद देऊन स्त्रीमुक्तीची वाट चोखाळताना दिसते. ही समीक्षापद्धती अधिक खुली वाङ्मयीन आकारबंध, खुले लेखन, बंदिस्तपणाला आव्हान देणारे विचार, बंदिस्त विचारांना शब्दरूप देणाऱ्या अपूर्ण भाषेला दिलेला निरोप याची निकड स्त्रीवादी समीक्षेला वाटते. स्त्रीवादी समीक्षेमध्ये स्त्रीदृष्टीतून साहित्याचे आकलन करणे त्यादृष्टीने प्रतिसाद देणे आणि साहित्याचे मूल्यमापन करणे होय. जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीला दुय्यम समजले गेल्याने तिचे अस्तित्व पुरुषांच्या विविध आवतरांच्या पुर्ततेसाठी साधनभूत मानले गेल्याने जीवनाप्रमाणेच साहित्यात व साहित्यसमीक्षेतही स्त्रीवादी दृष्टीकोणाला विशेष स्थान नव्हते. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषप्रधान साहित्य आणि पुरुषप्रधान समीक्षाच नावारुपाला आली. उदा : 'शाकुंतल'पासून ते 'एकच प्याला' पर्यंत सर्वच कलाकृतींचे मूल्यमापन पुरुषी दृष्टिकोणातून झाले. परंतु आधुनिकतेच्या काळात स्त्रीच्या व्यवहार आणि विचार क्षेत्रात आमुलाग्र बदल होते गेले. दबलेल्या स्त्रीत्वाचा आवाज जसजसा मुक्त होऊ लागला तसतसा तो स्वतंत्र शक्ती म्हणून पुढे येऊ लागला त्यातूनच स्त्रीमुक्ती चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीचे प्रतिध्वनी साहित्यात उमटू लागले परिणामी स्त्रियांनी आपल्या दृष्टीतून साहित्य मूल्यमापन करण्यास सुरुवात केली आणि साहित्यक्षेत्रात स्त्रीवादी समीक्षेचा पर्याय उभा केला.

मूलत: स्त्रीवादी समीक्षा स्त्रीचे दुय्यमत्व तर नाकारते परंतु पितृसत्ताक व्यवस्थेलाच सुरूंग लावताना दिसते. वास्तविक ही समीक्षा बंडखोर आणि विद्रोही रूप धारण करणारी आहे.

स्त्रीवादी विचारांचा व स्त्रीवादाचा पाया घालण्याचे कार्य युरोपातील दोन विचारवंत लेखिकांनी केले आहे. व्हर्जिनिया वूल्फ. 'सिमॉन बोव्हा' या दोघीच्या लिखानातून स्त्रीजीवन, स्त्रीसाहित्य यांच्या आकलनासाठी वेगळीच दृष्टी आवश्यक आहे. नेहमीच

स्त्रीत्वास अनुसरून असल्याने त्याची समीक्षासुद्धा स्त्रीवादी दृष्टिकोणातून झाली पाहिजे. व्हर्जिनिया वूल्फने 'अ रूम ऑफ वन्सओन' या ग्रंथात स्त्रीचे स्वातंत्र्य, आचार, विचार, आकांक्षा, याबाबत विस्तृत लेखन केले आहे.

स्त्रीने स्वत:चे अस्तित्व निर्माण केले पाहिजे. असे तिला वाटते. एलेन शोवॉल्टरने आपल्या 'फेमिनिस्ट क्रिटिसिझम इन द वाइल्डनेस' या लेखात स्त्रीवादी समीक्षेची तात्त्विक बैठक सांगितली आहे. तिच्या मते स्त्रियांच्या साहित्याचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून विचार व्हायला हवा. स्त्री साहित्याचा आशय, विषय, शैली या सर्व बाबींचा शोध स्त्रीवादी दृष्टिकोणातूनच घ्यायला हवा. स्त्रीवादी समीक्षेला तिने 'गायनोसेंट्रिक क्रिटिसिझम' असे नामाभिदान दिले आहे. या समीक्षेची तिने चार अंगे सांगितली आहेत.

१. स्त्रीशरीरनिष्ठ अनुभवांचे आकलन - जीवशास्त्रीय

२. स्त्रीनिष्ठ मनोविश्लेषण - मानसशास्त्रीय

३. स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्तीचे स्वरूप- भाषावैज्ञानिक

४. स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभवविश्वाचे अर्थनिर्णयन या उपरोक्त चार घटकांच्या आधारे स्त्री साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेतून संभवणाऱ्या समीक्षेला त्यांनी स्त्रीवादी समीक्षा असे म्हटले आहे. ही समीक्षा पद्धती जीवनवादी असल्या कारणाने ती साहित्यकृतीच्या आशयाला विशेष महत्त्व देते. या समीक्षा पद्धतीत स्त्रीची मानव म्हणून प्रतिष्ठा महत्त्वाची मानली जाते. स्त्रीवादी समीक्षा साहित्यशास्त्राचे आराखडे नाकारत नाही. परंतु स्वायत्ततावादी समीक्षेचा आराखडा स्त्रीवादी समीक्षा नाकारू शकते. स्त्रीवादी समीक्षा मार्क्स, फुले, आंबेडकर, गौतम बुद्ध यांच्या विचारांशी नाते सांगताना दिसते.

ही समीक्षापद्धती पुरुषी समीक्षेतील संकल्पनांची चौकट उदध्वस्त करणे तिला महत्त्वाचे वाटते. स्त्रीवादी समीक्षा स्त्रीला मानवाचे असलेले सर्व हक्क मिळावेत. आणि तिला व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आणावे. या अनुषंगाने निर्माण झालेल्या सर्व साहित्याचा पुरस्कार प्रस्तुत समीक्षा करते. ही समीक्षा स्त्रीमुक्तीचे तत्त्वज्ञान स्वच्छपणे उभे करण्याचा प्रयत्न करते. ज्या तत्त्वज्ञानात स्त्रीला दुय्यमस्थान दिले जाते त्या तत्त्वज्ञानाशी प्रस्तुत समीक्षा फारकत घेते. सामाजिक न्यायाची पुनर्प्रतिष्ठापना व्हावी असे या समीक्षा पद्धतीला वाटते. स्त्रीवादी समीक्षा स्वत:ला कोणत्याही नियमांच्यामध्ये बंदिस्त करून घेत नाही. ही समीक्षा पद्धती 'स्त्री' प्रतिष्ठेला जास्त महत्त्व देते. ही समीक्षा आधुनिकतेचा आणि नवतेचा पुरस्कार करणारी आहे.

स्त्रीवादी समीक्षा साहित्यकृतीद्वारे स्त्रीजीवनांचे पदर उलगडताना दिसते. स्त्रीवादी समीक्षा नवीन वाचनसंस्कृती आणि जीवनसंस्कृती घडविताना दिसते. स्त्रीवादी साहित्याचे आकलन आस्वाद आणि मूल्यमापन यासंबंधीचा संस्कार प्रस्तुत समीक्षा करते.

ज्या साहित्यकृतीमध्ये स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रीची अस्मिता, स्त्री-उन्नयन, स्त्रीचा आदर, आणि स्त्री-विश्वाची जननी आहे. हे तारतम्य भावाने चित्रित केले आहे, त्या कलाकृतीला

ही समीक्षा महत्त्व देते. रूढी, परंपरा, मनुवाद अन्याय-अत्याचार या बाबींना ही समीक्षा नकार देते. ही समीक्षा पद्धती जीवनात असणारी स्वातंत्र्य, क्षमता, बंधुता, न्याय या तत्त्वांना महत्त्व देणारी आहे.स्त्रीवादी समीक्षा स्त्रियांचे साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य यात भेद करते. स्त्रीला प्रतिष्ठा प्रदान करणाऱ्या तत्त्वज्ञानाला ही समीक्षा कवेत घेते. गतकालीन आणि समकालीन साहित्याचे पुनर्मूल्यांकन करून नव्याने समीक्षा करणे, येथे अभिप्रेत आहे. स्त्री साहित्याचे मूल्यमापन होताना स्त्रीसाहित्याची भाषा ही समीक्षा महत्त्वाची मानते. कारण स्त्रियांची भाषा ही संयत, सहज आणि स्वीकारशील असते. म्हणून पुरुषप्रधान वाङ्मयप्रकाराद्वारे स्त्री साहित्याचे आकलन होणार नाही.

'नवे साहित्यशास्त्र' या ग्रंथात डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''स्त्रियांच्या साहित्याची भाषा ही स्त्रीवादी समीक्षेला महत्त्वाची वाटते. ''स्त्रियांची भाषा आविष्कारप्रधान, अभिरूचीसंपन्न आणि स्वीकारशील असते. स्त्रियांच्या भाषेकडे पाहण्याची समाजभाषावैज्ञानिक मर्मदृष्टि घेऊन, भाषेच्या माध्यमातून प्रकट होणारा स्त्रीविशिष्ट अनुभव आणि संस्कृतिनिष्ठ स्त्रीवास्तव समजावून घेता येते.. स्त्रीचा म्हणून एक वेगळा अनुभव असतो व तो व्यक्त करण्यासाठी तिला पुरुषप्रधान वाङ्मयप्रकार, वाङ्मयीन संकेत व शैलीचे वळण उपयोगाचे नसते. ह्या खास 'स्त्रीत्त्वा'च्या अनुभवाची अभिव्यक्ती करण्यासाठी तिला उपलब्ध वाङ्मयीन संकेत झुगारून स्त्रीप्रधान वाङ्मयीन संकेत निर्माण करावे लागतात. आणि स्त्रियांच्या अनुभवविश्वासी संवादी अशी स्त्रीलक्षी भाषा वापरावी लागते.'' एकूणच स्त्रीवादी समीक्षा आज तरी आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान स्वच्छपणे निश्चित करू शकली नाही. धर्म, ईश्वर आणि या संबंधीच्या संस्कारविश्वासंबंधी या समीक्षेने स्वच्छपणे भूमिका मांडली नाही. वेगळे अनुभव, वेगळा आशय इतपर्यंतच ही समीक्षा येते आशय आणि रूप यांच्या अनुषंगाने संभवणारी सौंदर्यमूल्ये आणि व्यवस्थाभंजक जीवनमूल्ये या समीक्षेला अजून निश्चित करता आली नाही.

***

# मराठी समीक्षेची वाटचाल

## १. १८७४ ते १९२० :

१८७४ ते १९२० हा कालखंड मराठी साहित्य समीक्षेचा उदयाचा कालखंड होय. याच कालखंडाला अर्वाचीन साहित्याचा कालखंड म्हणतात. या कालखंडाला प्रबोधनाचे युग असेही म्हणतात. याच कालखंडाला भाषांतरित कालखंड असेही बिरूद लावले जाते. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला मराठी साहित्याची खूप मोठ्या प्रमाणात स्वतंत्रपणे निर्मिती झालेली आहे, असे दिसून येत नाही. याला कारणेही तशी पूरकच आहेत कारण पेशवाईचा शेवट, सरंजामशाहीचा अंत आणि याच दरम्यान इंग्रजी सत्तेचा अंमल आणि इंग्रजी शिक्षणाची सुरुवात. अशा एका पाठोपाठ एक घटना अर्वाचीन कालखंडाच्या सुरुवातीस घडल्या गेल्या पुण्यात संस्कृतच्या पाठशाला नंतर हायस्कूल अशी बऱ्यापैकी शिक्षणाची व्यवस्था होत गेली. आणि इंग्रजाबरोबरच मुद्रण कलेचा शिरकावही तितकाच वेगाने भारतात झाला. इंग्रजांच्या आगमनामुळे दळणवळणाची साधने वाढली. मुद्रणकलेमुळे नियतकालिके निर्माण होऊ लागली. सुरुवातीला इंग्रजी विद्येचा संस्कार झालेली एक नवी पिढी अस्तित्वात आली. मुंबई हे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक या सर्व घडामोडींचे उगमस्थान बनले. व्यक्तींच्या आचारविचाराबरोबरच त्याच्या दैनंदिन व्यवहार व पोशाखातही झपाट्याने बदल झाला. एवढेच नव्हे तर साहित्याच्या क्षेत्रातही विलक्षण परिवर्तन घडून आले. या कालखंडात मुद्रणकलेच्या शोधामुळे साहित्याला वाहिलेली निरनिराळी नियतकालिके निर्माण होऊ लागली. नियतकालिकांमधून कथा, कविता, स्फूटलेखन प्रकाशित होऊ लागले आणि याच कथा, कविता, स्फूटलेखनावर नियतकालिकांतूनच पुस्तकांचे परीक्षणही होऊ लागले. अगदी सुरुवातीला अर्वाचीन कालखंडात शालेय पाठ्यपुस्तके, भाषांतरित नाटके, कविता, वृत्तपत्र, मासिके, निबंध, यांची निर्मिती होऊ लागली. ज्ञानाशिवाय समाज विचारप्रवण होणार नाही हे येथील विद्वानांनी हेरले होते म्हणूनच 'तत्कालीन' लोकांना दिशा दाखविण्यासाठी बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' आणि दिग्दर्शन या नावाची वृत्तपत्रे काढली. निरनिराळ्या नियतकालिकांमधून नवनवीन पुस्तकांचा परिचय होऊ लागला. सुरुवातीच्या काळामध्ये फक्त पद्य वाङ्मय होते. परंतु मुद्रण कलेमुळे पद्याची जागा गद्याने घेतली. परिणामी ज्ञानाची कवाडे सर्व

समाजव्यवस्थेसाठी खुली झाली. सुरुवातीला लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, हरि केशवजी, विष्णूशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, स. का. छत्रे, यांनी निरनिराळी वर्तमानपत्रे चालवून त्यात लेखन केले. अनेक संस्कृत आणि इंग्रजी ग्रंथाची मराठीत भाषांतरे होऊ लागली. त्यातून लोकांना नीतिविषयक शिक्षण दिले जाऊ लागले. या काळात भाषांतरित वाङ्मय मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याने या काळाला भाषांतरित कालखंड असे म्हटले जाऊ लागले.

मराठी समीक्षेच्या दृष्टीने विचार केला तर, या कालखंडात कादंबरी, नाटक, चरित्र, कविता, प्रवासवर्णन यासारखे साहित्य निर्माण व्हायलाही ही सुरुवात झाली. १८७४ त १९२० या कालखंडात स्त्रीशिक्षण, धर्मांतर, आंतरजातीय विवाह यासारख्या विषयावर लेखन झाले. समाजामध्ये असलेल्या अनिष्ठ रूढी, परंपरा दूर करण्यासाठी प्रयत्न केले गेले. 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'इंदुप्रकाश', 'प्रभाकर', 'सुधारक', या नियतकालिकामुळे या काळात अनेक नवे कवी, कथाकार, नाटककार जन्माला आले. एवढेच नव्हे तर नियतकालिकामुळेच समीक्षात्मक लेखन व्हायला खूप मदत झाली. या कालखंडात पूर्वीचे जे मौखिक साहित्य होते, त्याचे मुद्रण करण्यात आले. याच दरम्यान प्राचीन मराठी साहित्याचे प्रकाशन व संशोधन सुरू झाले. जुन्या ग्रंथावर टीका टिप्पणी व्हायला लागली. प्रस्तावना लिहिल्या जाऊ लागल्या, पद्याचा सोप्या गद्यात अनुवाद केला जाऊ लागला. आणि यातूनच समीक्षात्मक लेखन सुरू झाले त्यातून पुस्तकांचे परीक्षण व समीक्षा येऊ लागली. या काळात नियतकालिकांनी केवळ पुस्तकांचा परिचयच करून दिला असे नव्हे तर, पुस्तकांचे सडेतोड समीक्षणही केले जाऊ लागले. या काळात संस्कृत आणि पाश्चात्य समीक्षेचा अभ्यास होऊ लागला. आणि मराठी साहित्यात सुद्धा समीक्षेला १९७४ ते १९२० या काळात बहर आलेला दिसतो.

दादोबा पांडूरंग यांनी 'यशोदा पांडूरंगी' (इ.स. १९६५) हे समीक्षात्मक पुस्तक लिहिले. प्रस्तुत समीक्षात्मक पुस्तकातून मोरोपंताच्या काव्यातील गुणदोष दाखविलेले आहेत. याच दरम्यान पाश्चात्य समीक्षेचा परिणाम होऊन काही मराठीत समीक्षा ग्रंथ निर्माण झाले. यामध्ये का. बा. मराठे यांच्या 'नावल व नाटक' या ग्रंथाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. याच कालखंडात 'निबंधमालेत' विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी समीक्षा म्हणजे काय? समीक्षकाच्या अंगी कोणते गुण असावेत यासंबंधी स्वतंत्र निबंध लिहून आपले विचार मांडले आहेत. चिपळूणकरांनी, 'मोरोपंत यांची कविता' या समीक्षात्मक लेखात मोरोपंतांच्या कवितेचा परामर्श घेतला आहे. तुकाराम, मोरोपंत, वामन पंडित, यांच्या साहित्यावर बा. म. हंस यांनी समीक्षा लेखन केले आहे. लो. टिळक यांनी 'ब्राह्मण व त्यांची विद्या' या सारखा लेख लिहिला. तर 'हिंदूधर्म व सुधारणा' या ग्रंथावर कृ. प्र. खाडिलकरांनी समीक्षा लेखन केले आहे.

हरिभाऊ आपटे यांनी कथा, कविता, कादंबरी, नाटक या लेखनाबरोबरच

समीक्षात्मक लेखनही केले आहे. हरिभाऊंनी 'करमणूक' या वृत्तपत्रात अनेक ग्रंथाचा परिचय करून दिला आहे. वा. गो. आपटे यांनी बंगाली भाषेतील निवडक साहित्याचा अनुवाद केला आहे. चि. वि. वैदयांनी 'मुक्तेशवरांचे वनपर्व' व गद्यशैली यावर लेखन केले आहे. वि. का. राजवाडे यांनी 'तुकाराम व रामदास' यांच्यावर समीक्षात्मक लेखन केले. तर हरिभाऊंच्या कांदबरीवर 'कांदबरी' नावाचा एक श्रेष्ठ लेखही लिहिला आहे. मराठी समीक्षेत श्री. कृ. कोल्हटकरांचेही आदराने नाव घ्यावे लागते. त्यांना मराठी विनोदपीठांचे आचार्य मानले जाते. कलावंत व समीक्षक म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. टिळकांचे सहकारी व केसरीचे संपादक न. चिं. केळकर यांनी सर्व वाङ्मयप्रकारात लेखन करून 'साहित्यसम्राट' ही पदवी मिळविली खरी पण त्याचबरोबर केळकरांनी समीक्षालेख व भाषणे आणि अनेक ग्रंथाना प्रस्तावना लिहिल्या व चांगल्या पुस्तकांची परीक्षणे लिहिली. केळकर हे मुख्यता कलावादी असलेतरी साहित्याने नैतिकता जपली पाहिजे, असे त्यांना वाटत होते. 'सविकल्प समाधी'चा सिद्धांत ही केळकरांची मराठी समीक्षेच्या विकासात त्यांनी घातलेली भर होय. त्यांच्या या सिद्धांताची चर्चा नंतरच्या काळात होत राहिली. कोणत्याही प्रश्नाच्या सर्व बाजू पाहणे, समतोल विवेचन करणे पण युक्तिवादपूर्वक आपले म्हणणे पटवून देणे ही त्यांची पद्धत होती.

या कालखंडामध्ये वा. म. जोशी, हरिभाऊ, वि. सी. गुर्जर, केशवसुत, अशा अनेक लेखक कवीनी लेखन आणि समीक्षणही केले आहे. परंतु या काळामध्ये स्त्रियांनी खूप मोठ्या प्रमाणात मनोरंजनातून त्यांनी लघुकथालेखन केले. पण समीक्षेच्या अंगाने लेखनाचा अभाव दिसून येतो.

याच कालखंडात संगीत नाटकाचीही निर्मिती झाली. मराठी रंगभूमीवर संगीत नाटक हा नवा संप्रदाय उदयाला आला. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शांकुतल' या नाटकावर विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी किर्लोस्करांच्या संगीत नाटकांच्या प्रयोगांच्या निमित्तने 'केसरी'त 'नाटके करावी की करू नये' या मथळयाखाली पाच लेख लिहिले. 'सं. शाकुंतल', 'सं. सौभद्र', 'सं. रामराज्यवियोग' (१८८०-८५) या नाटकावर समीक्षात्मक लेखन झालेले दिसते. १८७४ ते १९२० या दरम्यान कवितालेखनही मोठ्या प्रमाणात झालेले आहे. या काळात इंग्रजीतील खंडकाव्याची रूपांतरे केलेली दिसतात. मात्र स्वतंत्र कवितालेखन 'राजा शिवाजीचे' जनक म. मो. कुंटे यांचे कार्य निःसंशय महत्त्वाचे आहे. 'राजा शिवाजी' या काव्याला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी आपले क्रांतिकारक विचार मोठ्या आग्रहाने आणि मोठ्या अभिनिवेशाने मांडले आहेत. एका अर्थाने प्रस्तुत प्रस्तावना ही तत्कालीन काव्याचे समीक्षण करण्यास जास्त पोषक ठरते.

सारांशरूपाने असे सांगता येईल की, १८७४ ते १९२० या कालखंडात विपुल प्रमाणात कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, नियतकालिके,

मासिके, वर्तमानपत्रे, यांची निर्मिती झाली आहे. आणि ललितकृतीच्या निर्मितीवर मोठ्या प्रमाणात नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, काही समीक्षेला वाहिलेली नियतकालिके यांच्याद्वारे मोठ्या प्रमाणात समीक्षालेखन झाले आहे. मराठी समीक्षेचा हा पहिला टप्पा असून त्याला अर्वाचीन कालखंडाची समीक्षा असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

## २. १९२१ - १९४५

१९२१ ते १९४५ या कालखंडास आधुनिकतेचा कालखंड असे संबोधले जाते. या कालखंडामध्ये कथा, लघुकथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, असे विपुल लेखन झाले आहे. १९२६ साली 'रत्नाकर' हे मासिक सुरू झाले. त्यानंतर दोनच वर्षांनी १९२८ साली प्राधान्याने लघुकथेला वाहिलेले 'यशवंत' मासिक सुरू झाले. या दोन मासिकांनी मराठी समीक्षेला हातभार लावला. याच काळातील 'ज्योत्स्ना', 'किर्लोस्कर', 'समीक्षक', 'संजीवनी', 'ध्रूव', 'प्रतिभा', इ. नियतकालिकांनी मराठी लघुकथेचे दालन समृद्ध तर केलेच पण १९२६ ते १९४४ या कालखंडाला यशवंत किर्लोस्कर कालखंड असेही संबोधले जावू लागले या कालखंडात कांदबरीपेक्षा लघुकथेला अधिक लोकप्रियता मिळाली. ना. सी. फडके, खांडेकर, हे या काळातील प्रमुख लेखक समीक्षक असले तरी या दोन काळातील सांधा जोडण्याचे कार्य प्रामुख्याने 'दिवाकर कृष्ण' यांच्या कथालेखनाने केले. त्यांची पहिली कथा मासिक 'मनोरंजन' मध्ये मे १९२२ ला प्रसिद्ध झाली. 'अंगणातील पोपट', 'मृणालिनीचे लावण्य', 'संकष्ट चतुर्थी', 'समाधी', यासारख्या दर्जेदार कथा लिहून वाचकांना आपल्याकडे आकृष्ट केले, 'दिवाकर कृष्णांनी' मराठी लघुकथेला नवीन वळण दिले. त्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घालून मराठी लघुकथा नावारूपाला आणण्याचे काम फडके, खांडेकरानी केले. केवळ लघुकथेच्या क्षेत्रातच नाही तर कांदबरी, लघुनिबंध, टीका याही क्षेत्रात त्यांनी स्पृहणीय कामगिरी केली. या कालखंडाला फडके-खांडेकर कालखंड म्हणण्याची ही प्रथा आहे. प्रा. फडके यांच्या सर्वच वाङ्मयात विशेषता लघुकथा व कादंबरी यात तंत्रावर विशेष भर दिलेला दिसतो. 'प्रतिभासाधन' या समीक्षेला वाहिलेल्या नियतकालिकात किंवा 'लघुकथा तंत्र व मंत्र' या समीक्षाग्रंथात चर्चा करताना तंत्रांचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

याच कालखंडात य. गो. जोशी यांनी 'शेवग्याच्या शेंगा', 'वहिणीच्या बांगड्या', यासारख्या कथा लिहिल्या. वि. वि. बोकील यांनी 'यशवंत' मासिकातून आपले कथालेखन केले. अनंत काणेकर यांनी या दरम्यान कथालेखन केले. ठोकळ, दिघे यांनीही ग्रामीण जीवनावर आधारित कथा व कादंबरी लेखन केले. १९२० ते १९४५ या कालखंडाचा उल्लेख करताना असे म्हणावे लागते की, १९२० ला टिळक युगाचा अस्त झाला. आणि 'गांधीयुगाचा' उदय झाला. 'खेड्याकडे चला' या

मूलमंत्राचा परिणाम सर्वच लेखक समीक्षकावर झाला. मोठ्या प्रमाणात लेखक मंडळी लेखन करू लागली. १९१४ ते १९१८ दरम्यान पहिले महायुद्ध झाले, या दरम्यान झालेल्या घडामोडींचे चित्रण कथा, कादंबरी, नाटक यामधून १९२० नंतरच्या साहित्यात होऊ लागले. नाथमाधवांनी स्वराज्याच्या चळवळीस पोषक ठरेल असे लेखन केले. पारतंत्र्यांमुळे स्वाभिमानशून्य आणि दुर्बल बनलेल्या जनतेच्या मनात अस्मिता व चैतन्य निर्माण करावे हेच हेतू बाळगले. 'स्वराज्याचा श्रीगणेशा', 'स्वराज्याची स्थापना', 'स्वराज्याची घटना', 'स्वराज्याचे परिवर्तन', 'स्वराज्याची दुफळी', 'स्वराज्याची समाप्ती', अशा प्रकारच्या अनेक कादंबऱ्या लिहून त्यातून मराठ्यांचा इतिहास त्यांनी चित्रिला. १९२० ते १९३९ या कालखंडात वा. म. जोशी यानी 'सुशिलेचा देव', 'इंदू काळे सरला भोळे', या कादंबऱ्यामधून मध्यमवर्गीय स्त्रीजीवन व तिला जाणवलेल्या सामाजिक संघर्षाचे चित्रण रेखाटतात. केतकर, ना. सी. फडके, विभावरी शिरूरकर, वि. स. खांडेकर, गं. त्र्यं. माडखोलकर, तर काही स्त्रियांनीही या दरम्यान लेखन केले. 'रणांगण' १९३९ विश्राम बेडेकरची, १९४० र. वा. दिघे 'पाणकळा' १९४२ 'रात्रीचा दिवस' मर्ढेकर यापेक्षा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या जन्माला आल्या. वि. स. खांडेकर यांची 'कौंचवध' या सारख्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

या कालखंडात मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली आणि साहित्याच्या समीक्षेला नवे रूप सुद्धा याच काळात प्राप्त झाले. देशी भाषांनाही याचकाळात महत्त्व प्राप्त झाल्याने १९३० नंतर अनेक समीक्षा ग्रंथ निर्माण होऊ लागले. १९३० पूर्वी लेख, भाषणे अशा लहान स्वरूपात समीक्षा येत होती. मात्र १९३० च्या अगोदर मोठे समीक्षाग्रंथ निर्माण झाले नव्हते. पण संस्कृतला महत्त्व आल्याने व इंग्रजींचा प्रभाव वाढल्याने संस्कृत व इंग्रजी डोळ्यासमोर ठेवून मराठीत अनेक समीक्षा ग्रंथ तयार झाले.

मराठी समीक्षकांनी भरतमूनी, भामह, दण्डी, जगन्नाथ पंडित या संस्कृत मीमांसकांचे आदर्श समोर ठेवून संस्कृतमधील समीक्षा सिद्धांत मराठीत आणण्याचे काम रा. श्री. जोग यांनी केले 'अभिनव काव्यप्रकाश' व 'काव्यविभ्रम' ही दोन त्यांची महत्त्वाची पुस्तके आहेत. याशिवाय समीक्षाक्षेत्रात भरीव कामगिरी करणारे 'काव्यलोचनकार' द. के. केळकर, 'सारस्वत समीक्षा' लिहिणारे य. र. आगाशे यांचाही उल्लेख करावा लागेल काव्यलेखनकार द. के. केळकर यांनी 'रस' हे काव्याचे सर्वश्रेष्ठ तत्त्व मानले. पण काव्यलक्षण विचारात 'रस एंव आत्मा' हा विचार वगळला आहे. संस्कृत साहित्यशास्त्रातील रसव्यवस्था आणि करूणरसानंदमीमांसा हे या काळातील चर्चेचे विषय होते. १९२० ते १९३० या दरम्यान रसव्यवस्थेच्या पुनर्रचनेसबंधी न. चि. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, श्री. जी. चापेकर या मातब्बर समीक्षक विचारवंतानी आपले विचार मांडले आहेत.

१९३० ते १९४० मध्ये रसविचारावर मूलगामी आक्षेप घेतले जाऊ लागले. १९४२ मध्ये के. ना. वाटवे यांचा 'रसविमर्श' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. रसविमर्शानंतर रससिद्धांत आणि रसव्यवस्था यावर आक्षेप घेतले जाऊ लागले. याच काळात बाळूताई खरे यांचा 'अलंकारमजूंषा', रा. श. वाळिंबे यांचा 'साहित्यमीमांसा', स. रा. गाडगीळ यांचा 'काव्यशास्त्रप्रदीप', गोदावरी केतकर यांचा, 'भरताचे नाट्यशास्त्र', तर र. प. कंगले यांचा 'प्राचीन काव्यशास्त्र', यासारखे समीक्षेला वाहिलेले ग्रंथ निर्माण झाले. डॉ. मा. गो. देशमुख आणि डॉ. उषा देशमुख यांनीही संस्कृत व मराठीतील साहित्याचा परामर्श घेतला डॉ. मा. गो. देशमुख यांचा 'मराठीचे साहित्यशास्त्र' हा ग्रंथ यादृष्टीने विचार करण्यासारखा आहे. या काळात आणखी एक विशेष म्हणजे या काळातील समीक्षकांनी पाश्चात्य समीक्षेचा अभ्यास केलेला आहे. परिणामी मराठी समीक्षेवर इंग्रजी समीक्षेचा जास्त प्रभाव जाणवतो. यामध्ये 'प्रतिभासाधन' कार ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, 'टीकाविवेक कर्ते' श्री. के. क्षीरसागर, वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, पु. शि. रेगे, बा. सी. मर्ढेकर यांचा समावेश करावा लागेल.

याकाळातील विशेष बाब म्हणजे या काळातील समीक्षक उत्तम आणि जाणकार असे लेखक ही होते. ह. ना. आपटे, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, न. चि. केळकर, माडखोलकर, या सर्वांनी कलानिर्मिती केली आणि समीक्षालेखनही केले. पाश्चात्य साहित्यप्रभावाने आपल्याकडे अनेक वाद साहित्यात आले. उदा. अस्तित्वाद, अतिवास्तववाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, यांचे समर्थन करणारे समीक्षकही आपल्याकडे निर्माण झाले. या वादाबरोबरच आपल्याकडे गांधीवाद, मार्क्सवाद, कलावाद, जीवनवाद, यांचीही निर्मिती झाली. आणि त्याचा येथील लेखक, वाचकावर मोठा परिणाम झाला. या लेखक, समीक्षकांनी साहित्याच्या बाबतीत जे विचार मांडले ते लोकांनी स्वीकारलेही. श्री. के. क्षीरसागर यांनी 'श्यामची आई' सारखी कलाकृती रडवी, दुबळी व कलेच्या दृष्टीने सामान्य आहे. अशी टीकाही केली. वा. ल. कुलकर्णी यांनी याकाळात मराठी समीक्षेला नवे वळण लावले त्यानी नवकथा, नवकविता यांचे समीक्षेत स्वागत केले. याचकाळात वामन मल्हार जोशी यांचे 'वाङ्मयदर्शन', 'नाटककार खाडिलकर' यांच्यासारखी समीक्षेची पुस्तके निर्माण झाली.

### ३. १९४५ ते १९७५

१९४५ ते १९७५ या काळातील मराठी समीक्षेची वाटचाल लक्षात घेता असे लक्षात येते की, या काळात नवसाहित्यांच्या निर्मितीमुळे नवसमीक्षेचा उदय झाला. या कालखंडावर मर्ढेकरांच्या समीक्षेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. त्यांच्या समीक्षेचा विशेष म्हणजे त्यांच्यावर भारतीय साहित्यशास्त्राचे संस्कार झाले नाही तर

पहिल्यापासून त्यांच्यावर पाश्चात्य समीक्षेचा प्रभाव झालेला आहे. मर्ढेकरांनी सौंदर्याला समीक्षेत केंद्रस्थान मानले. मर्ढेकरांनी 'सौंदर्य आणि साहित्य' 'वाङ्मयीन महात्मता' अशी दोन समीक्षात्मक पुस्तके लिहिली तर प्रभाकर पाध्ये यांच्या 'कलेची क्षितिजे' या ग्रंथाला मर्ढेकरानी प्रस्तावना लिहिली. मर्ढेकरापूर्वीची समीक्षा केवळ तंत्रवादी होती. या समीक्षेत जीवनवाद व कलावाद या विषयीचे ढोबळ विचार होते. परंतु नवसमीक्षेत कलेचे अंतरिक स्वरूप सखोलपणे न्याहाळण्याचा प्रयत्न झाला. साहित्य कलेतील इतर कलांची तुलना केली गेली. कलाकृतीची निर्मिती आत्मनिष्ठ व स्वायत्त असते. तिच्यानिर्मितीमागे कलावंताचे स्वत:चे असे खास अनुभव असतात. ती त्याची स्वतंत्र निर्मिती असते. नवसमीक्षेत कलेच्या माध्यमाचा सखोल विचार केला गेला. बा. सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल यांचे स्थान महत्त्वाचे आहे. या कालखंडातील समीक्षेची बीजे दुसऱ्या महायुद्धाशी निगडित आहेत. या युद्धाने मानवी मूल्याचा जो ऱ्हास केला. माणसाला जीवनाबद्दल विचार करायला भाग पाडले. मनुष्याच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. जो तो व्यक्तिनिष्ठ बनला. परिणामी व्यक्तिनिष्ठ, अस्तित्ववादी, निराशाप्रधान साहित्यकृती जन्माला आल्या. ढासळत्या मूल्यव्यवस्थेच्या पर्यावरणाात माणसाला दिलासा देणारी एकच प्रभावी गोष्ट म्हणजे मानवाची कलानिर्मितीची क्षमता, आणि म्हणूनच या काळात कलेला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले.

१९५० नंतरच्या समीक्षेवर कलावाद आणि जीवनवाद या दोनही वादांचा प्रभाव आढळतो. मर्ढेकर युगापूर्वीचा मर्ढेकर सौंदर्यविचार तसा क्षीणभरच होता. मर्ढेकरांच्या सौंदर्यविचाराने याला वेगळी चालना मिळाली.

नवसमीक्षेच्या प्रवाहाचा विचार करता या काळात प्रभाकर पाध्ये यांनी 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा' रा. भा. पाटणकरांचे 'सौंदर्यमीमांसा' आणि 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्रभाकर पाध्ये यांचा 'सौंदर्यानुभव' हा ग्रंथ शुद्ध कलावादी विचारावर आधारलेला होता. तर शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्य' हा ग्रंथ जीवनवादाचा पुरस्कार करणारा होता. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मार्क्सवाद प्रमाण माणून सौंदर्यशास्त्राचा विचार केला. नवसमीक्षेच्या दृष्टिकोणातून विचार करता. प्रा. गो. वि. करंदीकर यांचा 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' १९५७, गंगाधर गाडगीळ यांचा 'खडक आणि पाणी' १९५०, 'साहित्याचे मानदंड' (१९६२) 'खाडिलकरांची तीन नाटके' असे टीकाग्रंथ या कालखंडात निर्माण झाले. दुसरे नवसमीक्षेचे प्रवर्तक म्हणून माधव आचवल यांचेही समीक्षालेखन विचारात घेण्यासारखे आहे त्यांनी 'रसास्वाद' १९७२, 'जास्वंद' १९७५ या ग्रंथातून नवसमीक्षेची उपयुक्तता व्यक्त केली आहे, नवकथेसंबंधीचे पूर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न गंगाधर गाडगीळांनी केले. दि. के. बेडेकर, द. ग. बेडेकर, कुसुमावती देशपांडे यांनी कलेत सौंदर्याला महत्त्व दिले. पण कला ही जीवनानुभवाशी निगडित असते. या काळातील

समीक्षेला समाजशास्त्र व इतर शास्त्राची जोड असावी, असा विचारही नवसमीक्षकांनी मांडला. १९४५ ते १९७५ या काळातील समीक्षेचा आणखी एक विशेष म्हणजे विद्यापीठाच्या अभ्यासास उपयोगी पडतील अशा समीक्षाग्रंथाची निर्मिती होय. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचा 'टीकाविवेक' १९६५ मे. पु. रेगे 'छांदसी' १९६२, ग. त्र्यं. देशपांडे यांचा 'भारतीय साहित्यशास्त्र' १९५८, र. पं. कंगले यांचा 'भारतीय काव्यशास्त्राची व्युत्पत्ती', प्राचीन काव्यशास्त्र' १९७४, या ग्रंथानीही या काळातील समीक्षेला हातभार लावला. याच काळात डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी 'ज्ञानेश्वरांची विदग्ध रसवृत्ती' १९५३, या समीक्षाग्रंथात संस्कृत आणि इंग्रजी समीक्षादृष्टीचे मिश्रण आढळते. गं. बा. सरदार यांनी १९५० मध्ये लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरांची जीवनदृष्टी' हा ग्रंथ नवकलावाद व जीवनवाद यांचा सुवर्णमध्य साधणारा ग्रंथ आहे. पंडिती कवितेचा नव्या दृष्टीने विचार करण्यासंदर्भात प्रा. के. ना. वाटवे यांचा प्राचीन मराठी पंडित काव्य' १९६४ याही ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. १९४५ ते १९७५ या काळात साहित्यविषयक दृष्टिकोणात खूप मोठे बदल होत गेले. जीवनात नव्या गरजा निर्माण झाल्या होत्या. नवे प्रश्न निर्माण झाले होते. प्रश्न मांडण्यासाठी समीक्षा परिपूर्ण झालेली नव्हती. स्वातंत्र्यप्राप्तीमुळे सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक परिवर्तने होत होती. त्याचा परिणाम म्हणून प्रस्थापित साहित्याबरोबर १९४५ नंतर दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य, जनसाहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य असे वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण होत होते. परंतु या प्रवाहाची योग्य समीक्षा होत नव्हती. प्रस्थापित समीक्षा या दृष्टिकोणातून अपूर्णच म्हणावी लागेल. दलित साहित्य आणि नवसाहित्य यांची समीक्षा प्रस्थापित समीक्षेच्या फुटपट्टीने करणे धोक्याचे होते. कारण दलित साहित्य, जीवनवादी वास्तवाला कवेत घेणारे गावकुसाबाहेरचे आणि क्रांतिकारी साहित्य होते तर नवसाहित्य हे कलावादी, व्यक्तिवादी त्यामूळे दलित साहित्याचा विचार वेगळ्या अंगाने व्हायला हवा होता. तो या काळात झाला असे म्हणता येत नाही.

**सारांश :**

या कालखंडात खूप मोठ्या प्रमाणात साहित्याची समीक्षा करणारे समीक्षा ग्रंथ निर्माण झाले. या कालखंडात जीवनवाद आणि कलावाद यांचाही प्रभावीपणे विचार झाला. इंग्रजी समीक्षेचा अभ्यास करून मराठी समीक्षेच्या विकासास या काळात हातभार लागला. या काळात केवळ नवसाहित्याचेच नव्हे तर मध्ययुगीन मराठी साहित्याचेही समीक्षण करण्यात आले. महाविद्यालयीन व विद्यापीठांतील संशोधनातून मराठी समीक्षेच्या विकासाला चालना मिळाली. मराठीत ग्रामीण दलित, आदिवासी, स्त्रीवादी, प्रादेशिक साहित्यप्रवाह आणि साहित्य यामुळे साहित्य समीक्षेच्या विकासास हातभार लागला.

***

**सारांश :-**

१९२१ ते १९४५ या कालखंडात मराठी समीक्षेला एक नवे स्वरूप प्राप्त झाले हे वरील विवेचनातून लक्षात येते.

***

## संदर्भग्रंथ


१) मनोहर यशवंत - 'नवे साहित्यशास्त्र' विजय प्रकाशन नागपूर ४४००१२.

२) क्षीरसागर श्री. के. - 'टीकाविवेक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९८०.

३) गोडबोले ना. रा., जोगळेकर गं. ना. - 'साहित्यसमीक्षा: स्वरूप आणि विकास' व्हीनस प्रकाशन, पुणे ३० पहिली आवृत्ती सप्टेंबर १९८१.

४) संपा - कुलकणी 'गो.म. नवसमीक्षा- काही विचारप्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, १९८२

५) पाटील म. सु. - 'आदिबंधात्मक समीक्षा', नीहारा प्रकाशन, पुणे, १९८९

६) कुलकणी वा. ल. - 'साहित्य: स्वरूप आणि समीक्षा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९७५.

७) बेडेकर दि. के - 'साहित्य: स्वरूप आणि समीक्षा', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९५४

८) जाधव रा. ग. - 'वाङ्मयीन आकलन', वाङ्मयसेवा प्रकाशन नाशिक रोड

९) धोगडे अश्विनी - 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३

१०) दीक्षित कमलाकर - 'टीका प्रपंच', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे

११) पाटील शोभा - 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा' स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.

१२) धायगुडे सुरेश - 'पाश्चात्य साहित्यशास्त्र सिद्धांत आणि संकल्पना' निर्भय प्रकाशन, पुणे. १९९०

१३) धोंगडे रमेश - 'शैली वैज्ञानिक समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९८

१४) पाटणकर रा. भा. - 'कांटची सौंदर्यमीमांसा', मौज प्रकाशन, मुंबई, १९७७.

१५) आचवल माधव - 'जास्वंद', मौज प्रकाशन, मुंबई, १९७४.

१६) पाध्ये प्रभाकर - 'मर्ढेकरांची सौदर्यमीमांसा', मौज प्रकाशन, मुंबई, १९७६.

१७) कऱ्हाडे सदा - 'साहित्य विश्लेषण', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९.
१८) कुलकर्णी गो. म. - 'मराठी समीक्षेची वाटचाल', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे, १९९८
१९) यादव आनंद - 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया' मेहता पब्लिशिंग, पुणे १९८९
२०) बेडेकर दि. के. - 'साहित्य निर्मिती व प्रक्रिया' - लोकवाङ्मयगृह, मुंबई १९५४
२१) मालशे मिलिंद - 'आधुनिक समीक्षा-सिद्धान्त' मौज प्रकाशनगृह मुंबई, २००७
२२) जाधव रा.ग. - 'वाङ्मयीन परिप्रेक्ष्य' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २००४
२३) ठाकूर रवींद्र- 'साहित्य समीक्षा आणि संवाद' दिलीपराज प्रकाशन पुणे, १९९९
२४) संपा जाधव मनोहर - 'समीक्षेतील नव्या संकल्पना' स्वरूप पकाशन औरंगाबाद, २००१
२५) पाटणकर रा. भा.- 'सौदर्यमीमांसा' मौज प्रकाशनगृह मुंबई, १९७४
२६) महाम्बरे गंगाधर - 'साक्षेपी समीक्षा' दिलीपराज प्रकाशनगृह पुणे, १९९६
२७) पाटील गंगाधर - 'समीक्षेची नवी रूपे' मॅजेस्टिक प्रकाशन पुणे, १९८१
२८) कुलकर्णी वा. ल. - 'साहित्य आणि समीक्षा', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६३

***

## समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप

डॉ. भास्कर शेळके / प्रा. शशिकांत साळवे

समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप या ग्रंथामुळे साहित्य-समीक्षा व्यवहाराची जाण साहित्याच्या अभ्यासकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागावी. या ग्रंथामुळे साहित्य समीक्षेचे संकल्पना व स्वरूप स्पष्ट व्हावे. समीक्षेच्या पध्दती, समीक्षकाची साधना, पथ्यं आणि मराठी समीक्षेची वाटचाल अधोरेखित करणारा हा ग्रंथ साहित्य समीक्षा व्यवहारात मार्गदर्शक ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

शब्दालय प्रकाशन / श्रीरामपूर